



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, बुधवार ३ जून २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


# 2 लाखांपर्यंतचे कर्ज होणार माफ



## अखेर शेतकरी कर्जमाफीवर शिक्कामोर्तब, कॅबिनेट बैठकीत मान्यता

**मुंबई : प्रतिनिधी-**राज्यातील शेतक-यांसाठी आनंदाची बातमी आहे. शेतकरी कर्जमाफीचा मार्ग आता मोकळा झाला आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत शेतकरी कर्जमाफी योजनेला मान्यता मिळाली आहे. त्यामुळे आता २ लाखांपर्यंतचे कर्ज माफ होणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून शेतकरी कर्जमाफीच्या प्रतीक्षेत होते, यासाठी अनेक आंदोलनाही झाली होती. त्यानंतर आता राज्य सरकारने कर्जमाफी योजनेला कॅबिनेट बैठकीत मान्यता दिली आहे. याचा लाखो शेतक-यांना फायदा होणार आहे.समोर आलेल्या माहितीनुसार शेतकरी कर्जमाफी योजनेला आज मान्यता मिळाली आहे. मात्र विधानपरिषद निवडणुकीची आचारसंहिता असल्यामुळे या कर्जमाफीची घोषणा आत्ताच केली जाणार नाही. विधानपरिषद निवडणूक संपल्यानंतर ही घोषणा होणार आहे. आगामी काळात अटी आणि शर्थींबाबत सरकारकडून माहिती देण्यात येणार आहे. या कर्जमाफी निर्णयाचा लाखो शेतक-यांना फायदा होणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील एकूण ५६लाख शेतक-यांना या कर्जमाफी योजनेचा फायदा होणार आहे. या शेतक-यांचे २ लाखांपर्यंतचे कर्ज माफ केले जाणार आहे. तसेच जे शेतकरी वेळेवर कर्ज फेडतात, त्यांना प्रोत्साहनपर रक्कमही दिली जाणार आहे. ऐन मान्सूनच्या तोंडावर आता शेतक-यांना कर्जमाफीचा फायदा होणार आहे. त्यामुळे शेतक-यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. (पान २ वर)

# गुजरातमध्ये महाराष्ट्राच्या 2 बसचा भीषण अपघात

■ 7 जणांचा होरपळून मृत्यू, 41 गंभीर
■ धडकेनंतर बसला लागली आग



■ वाहकाने बेशुद्ध होईपर्यंत प्रवाशांना बाहेर काढले







**सुरत/वृत्तसंस्था :** गुजरातच्या सुरत जिल्ह्यातील बारडोली तालुक्यात आज दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास एक अत्यंत भीषण आणि काळजाचा थरकाप उडवणारा अपघात घडला. बारडोलीच्या उब्रा गावाजवळ महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या दोन एसटी बसची समोरासमोर जोरदार धडक झाली. या हृदयद्रावक घटनेत सात प्रवाशांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून ४१ जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी नउ जणांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना तातडीने सुरत येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उब्रा गावाजवळील महामार्गावर आधीच एक पाण्याचे टॅंकर पलटी झालेले होते. या टॅंकरला धडक टाळण्याच्या प्रयत्नात एका एसटी बसच्या चालकाचे नियंत्रण सुटले. बस वेगात असल्याने तिने दुभाजक ओलांडला आणि विरुद्ध दिशेने भरधाव येणा-या दुस-या महाराष्ट्र एसटी बसला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, एक बस रस्त्यावर दोन-तीन वेळा पलटी झाली आणि काही सेकंदातच तिने पेट घेतला. जामनेरहून सुरतकडे जाणा-या महाराष्ट्र एसटी बसचे जखमी वाहक सोपान नामदेव क्षीरसागर यांनी सांगितले की, समोरील वाहनाने धडक दिल्यानंतर बस रस्त्याखाली गेली. बसमध्ये सुमारे ३५ प्रवासी होते. डिझेल बसला आग लागली होती. त्यांनी महिला, मुले आणि इतर प्रवाशांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र डोक्याला दुखापत झाल्याने ते बेशुद्ध पडले. त्यांनी चालकालाही बसमधून बाहेर काढून रस्त्यावर आणले, पण त्यानंतर काय घडले याची त्यांना माहिती नाही.

### मृतांच्या वारसांना 10 लाख

***या अपघातील मृतांच्या वारसांना महाराष्ट्र सरकारकडून १० लाख रुपयांची, तर केंद्र सरकारकडून पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून २ लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. जखमींना केंद्र सरकाकडून ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.***

जिल्हाधिकारी तेजस पटेल यांनी सांगितले की, हा अपघात दुपारी ४:३० वाजता झाला. सतरा जखमींवर बार्डोली प्राथमिक आरोग्य केंद्र रुग्णालयात उपचार सुरू असून, त्यांच्यापैकी कोणाचीही प्रकृती गंभीर नाही. जखमींना तीन वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये ड?क्टर आणि स्टाफ नर्सेस सर्वांवर उपचार करत आहेत. सात जखमींना सुरत सिव्हिल रुग्णालयात पाठवण्यात आले असून, त्यापैकी तिघांची प्रकृती गंभीर आहे.

**महाराष्ट्राकडे जाणा-या बसला लागली आग-** सुरत जिल्हा पोलिस प्रमुख राजेश गढिया यांनी सांगितले की, एक बस सुरतकडे येत होती तर दुसरी महाराष्ट्राकडे जात होती. महाराष्ट्राकडे जाणा-या बसची पाण्याच्या टॅंकरशी धडक झाली. त्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटले आणि बसने दुभाजक ओलांडून विरुद्ध दिशेने येणा-या दुस-या महाराष्ट्र एसटी बसला जोरदार धडक दिली. धडकेनंतर एक बस उलटली आणि तिला आग लागली. घटनास्थळी पोलिस, बचाव पथके आणि अग्निशमन दलाने तातडीने धाव घेतली.

**प्रवाशाचा सांगितला थरारक अनुभव-**अपघातात जखमी झालेल्या गणेश शिवाजी कुंभारे यांनी सांगितले की, बस वेगात होती आणि प्रवासी आपापसात बोलत होते. अचानक धडक बसली आणि बस दोन-तीन वेळा पलटी झाली. काही समजण्याआधीच बसला आग लागली. लोक एकमेकांवर पडले होते. जखमी अवस्थेत प्रवासी कसेबसे बाहेर पडले. बाहेर पडताच आग आणखी वाढली. स्थानिक नागरिकांनी मदत केली आणि नंतर पोलिस, रुग्णवाहिका व अग्निशमन दल (पान २ वर)

## मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-3 ला गती

# 3500 किलोमीटर रस्त्यांसाठी 6 हजार 429 कोटींना मंजुरी



**मुंबई : प्रतिनिधी-** राज्यातील ग्रामीण संपर्क व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-३ अंतर्गत आशियाई इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक (एआयआयबी) च्या अर्थसहाय्याने सुमारे ३,५०० किलोमीटर लांबीचे रस्ते व पुलांच्या कामांसाठी ६,४२९ कोटी रुपयांच्या तरतुदीस मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या योजनेसाठी एआयआयबीकडून सुमारे ५०० दशलक्ष अमेरिकी डॉलर्स (सुमारे ४,५०० कोटी रुपये) कर्ज स्वरूपात निधी उपलब्ध होणार असून, राज्य शासनाकडून ३० टक्के हिस्सा म्हणून सुमारे २१५ दशलक्ष अमेरिकी डॉलर्स (सुमारे १,९२९ कोटी रुपये) उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या प्रकल्पांतर्गत ग्रामीण मार्ग आणि इतर जिल्हा मार्गांच्या दर्जोन्नतीची कामे करण्यात येणार आहेत. सविस्तर प्रकल्प अहवालानुसार निश्चित होणा-या खर्चाच्या अधीन राहून सुमारे ३,५०० किलोमीटर लांबीचे रस्ते व पुलांची कामे हाती घेण्यात येतील. एआयआयबीकडून प्राप्त होणा-या कर्जाची मूळ रक्कम आणि त्यावरील व्याजाची परतफेड राज्य शासनाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून करण्यात येणार आहे. या कर्जाची परतफेड ५ वर्षांच्या वाढीव कालावधीसह (ग्रेस पिरियड) एकूण २५ वर्षांत केली जाणार आहे. प्रकल्पाच्या आर्थिक व्यवस्थापनासाठी बाह्य हिस्सा (७० टक्के) आणि राज्य हिस्सा (३० टक्के) यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. तसेच एआयआयबीकडून निधी प्राप्त होईपर्यंत प्रगतीपथावरील कामांचा खर्च राज्य निधीतून करण्यात येणार आहे.मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-३ साठी मंजूर करण्यात आलेल्या लांबीपैकी राज्य निधीतून स्वतंत्रपणे २,५०० किलोमीटर लांबीची रस्त्यांची कामे हाती घेण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे राज्यातील ग्रामीण भागातील संपर्क व्यवस्था अधिक सक्षम होणार असून शेतीमालाची वाहतूक, शिक्षण, आरोग्य सेवा, बाजारपेठांपर्यंत पोहोच आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे.

## पहिल्या टप्प्यात सुमारे 1,500 कि.मी. रस्त्यांची कामे हाती घेणार

राज्यातील रस्ते पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि राज्याच्या एक ट्रिलियन डालर अर्थव्यवस्था या उद्दिष्टाला गती देण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते सुधारणा प्रकल्प राबविण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.या प्रकल्पांसाठी आशियाई पायाभूत गुंतवणूक बँक (एआयआयबी) आणि न्यू डेव्हलपमेंट बँक (एनडीबी) यांच्याकडून प्रत्येकी १ अब्ज अमेरिकी ड?लर्सचे अर्थसहाय्य दोन टप्प्यांत घेण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.राज्यातील रस्त्यांची भारतीय रस्ता काँग्रेस मानकांनुसार सुधारणा करण्यासाठी तीन वर्षांच्या कालावधीत हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. एआयआयबी आणि एनडीबी या दोन्ही संस्थांच्या अर्थसहाय्यांतर्गत पहिल्या टप्प्यात ५०० दशलक्ष अमेरिकी डालर इतके बाह्य अर्थसहाय्य आणि २१५ दशलक्ष अमेरिकी डालर इतका राज्य शासनाचा सहभाग मिळून एकूण ७१५ दशलक्ष अमेरिकी डालर (सुमारे ६,२२१ कोटी रुपये) खर्च अपेक्षित आहे. दोन्ही टप्प्यांची एकूण किंमत प्रत्येकी सुमारे १२,४४२ कोटी रुपये असेल.या प्रकल्पांतर्गत मोठी वाहतूक वर्दळ आणि ४० टक्क्यांपेक्षा अधिक व्यावसायिक वाहनांची वर्दळ (पान २ वर)

## तुकाराम मुंढे ॲक्शन मोडमध्ये

# राज्यभर अन्न व औषध प्रशासनाची छापेमारी



**मुंबई /प्रतिनिधी-**अन्न व औषध प्रशासनाने राज्यभरात प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाला विक्रेत्यांविरोधात मोठी मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत प्रशासनाने अवघ्या दोन दिवसांत तब्बल ४० ठिकाणी छापे टाकले असून, यात ३२ आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. या कारवाईच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी गुन्हेगारांना कडक शब्दांत इशारा दिला आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणा-या कोणालाही सोडले जाणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी यापुढील काळात कारवाई अधिक तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत. विशेष म्हणजे, २५ मे रोजी तुकाराम मुंढे यांनी या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. त्यांच्या २१ वर्षांच्या प्रदीर्घ प्रशासकीय कारकीर्दीतील ही तब्बल २५ वी बदली असून, पदभार स्वीकारताच त्यांनी आपल्या नेहमीच्या आक्रमक आणि शिस्तबद्ध कार्यशैलीची चुणूक पुन्हा एकदा दाखवून दिली आहे. पुणे जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासनाने भेसळयुक्त आणि बेकायदेशीर अन्नपदार्थ विक्रेत्यांविरोधात मोठी धडक कारवाई केली आहे. आंबेगाव आणि खेड तालुक्यातील पाच वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून प्रशासनाने गुटखा, पानमसाला, अप्रमाणित सुपारी आणि इतर संशयित अन्नपदार्थांचा तब्बल १९ लाख रुपयांहून अधिक किमतीचा अवैध साठा जप्त केला आहे. बड्या ब्रॅंड्सची आश्वासने आणि मिसलिडिंग जाहिरातींना भुलून ग्राहकांची होणारी फसवणूक थांबवण्यासाठी अन्न व औषध प्रशासन आता आक्रमक झाले आहे. आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने ग्राहकांची दिशाभूल करणा-या कंपन्यांना कडक कारवाईचा इशारा दिला असून, अशा जाहिरातींमध्ये सहभागी होणा-या सेलिब्रिटींवरही यापुढे कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

### पतंजलीवर कारवाई

***खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करणा-यांविरोधात धडक कारवाई हाती घेतल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी शुक्रवारी योगगुरू रामदेव बाबा यांच्या पतंजली या आयुर्वेदिक उत्पादनांवर कारवाई केली. राज्यातील ७ जिल्ह्यांतील १२ पतंजली आयुर्वेदिक औषधांच्या केंद्रांवर कारवाई करण्यात आली असून या कारवाईमध्ये ७३ लाख २४ हजार ६५६ रुपये किमतीची पतंजलीची औषधे जप्त करण्यात आली.***

## नागपूर ठरणार देशात थ्री वर्ल्ड क्लास स्टेशन सिटी

### अजनी, गोधनी व मुख्य स्थानकाचा कायापालट



**नागपूर/प्रतिनिधी :**देशातील रेल्वेच्या नकाशात मध्यबिंदू असलेले नागपूर आता रेल्वे विकासात नवा मानदंड प्रस्थापित करू पाहत आहे. येथील मुख्य रेल्वे स्थानकाचे जागतिक दर्जाच्या ट्रान्सपोर्ट हबमध्ये रूपांतर सुरू असताना, अजनी आणि गोधनी ही दोन स्थानके सॅटेलाइट स्टेशन म्हणून आकार घेत आहेत. विशेष म्हणजे, एकाचवेळी तीन स्थानकांवर तब्बल ८२८.७४ कोटी रुपयांच्या खर्चातून वर्ल्ड क्लास सुविधांची उभारणी सुरू असलेले नागपूर हे देशातील थ्री वर्ल्ड क्लास स्टेशन सिटी ठरणार आहे.४८७.७७ कोटी रुपयांच्या खर्चाचा रेल्वे स्थानकाचा पुनर्विकास हा शहराच्या रेल्वे इतिहासातील सर्वांत मोठ्या प्रकल्पांपैकी एक मानला जातो. स्थानकाची ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ओळख जपत स्थानकाला आधुनिकतेची सांगड घातली जात आहे. स्थानकाच्या दोन्ही बाजूंना इमारती, सर्व प्लॅटफार्मसना जोडणारा मध्यवर्ती उंचावरील कान्कोर्स, विस्तारित पार्किंग व्यवस्था, सुधारित (पान २ वर)

## जम्मूतील किश्तवाडमध्ये 2 ठिकाणी ढगफुटी;रस्ते बंद

**नवी दिल्ली-**जम्मू-काश्मीरमधील किश्तवाड जिल्ह्यात मंगळवारी दोन ठिकाणी ढगफुटी झाली आहे. पहिली ढगफुटी सरथलच्या गहन परिसरात आणि दुसरी माछीपाल परिसरात झाली आहे. काही ठिकाणी भूस्खलनामुळे रस्ते बंद झाले आहेत.अधिका-यांच्या मते, सध्या कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाल्याची माहिती नाही. पोलिस, रेड क्रास, महसूल विभाग आणि इतर एजन्सींची पथके घटनास्थळी



पाठवण्यात आली आहेत.खासदार आणि केंद्रीय मंत्री डा. जितेंद्र सिंह यांनी सांगितले की, स्थानिक लोकांशी सतत संपर्क साधला जात आहे, जेणेकरून गरज पडल्यास तात्काळ मदत पोहोचवता येईल. दरम्यान, राजस्थान आणि मध्य प्रदेशात वादळी वा-यासह झालेल्या पावसामुळे ५ जणांचा मृत्यू झाला. मध्य प्रदेशातील नीमचमध्ये सोमवारी रात्री घराचे छत कोसळून आई आणि मुलाचा मृत्यू झाला. तर, (पान २ वर)

# हातभट्टीची दारू अधिकृत करा, महसूल मिळेल :आठवले



**मुंबई/प्रतिनिधी :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले आपल्या वेगवेगळ्या वक्तव्यांसाठी नेहमीच चर्चेत असतात. सोमवारी भिवंडी दौ-यावर असताना त्यांनी हातभट्टीच्या दारूबाबत अजब मागणी केली आहे. सहज उपलब्ध होणारी हातभट्टीची दारू अधिकृत करा, यामुळे शासनाला महसूल मिळेल आणि गोरगरिबांचे जीव वाचतील, असं वक्तव्य रामदास आठवले यांनी केलं. हे आपलं वैयक्तिक मत असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं.

पुणे येथे नुकतीच विषारी दारू प्यायल्यामुळे २२ जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. या पार्श्वभूमीवर बोलताना रामदास आठवले म्हणाले की, 'हातावर पोट असणारा मजूर आणि कामगार वर्ग प्रामुख्याने स्वस्त असणारी हातभट्टीची दारू पितो. माझं वैयक्तिक मत असं आहे की, सरकारने हातभट्टीची दारू अधिकृत करावी. यामुळे ही दारू सर्वसामान्य मजूर वर्गाला परवडणा-या दरात मिळेल. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, त्यावर शासनाचे कायदेशीर नियंत्रण राहील, ज्यामुळे विषबाधेसारख्या घटना टळतील. यातून शासनाला मोठा महसूलही मिळेल आणि गोरगरीब मजुरांचे जीवही वाचतील.' मराठा आरक्षणासाठी आंदोलनाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिकेवर आणि मराठा आरक्षणावर बोलताना आठवले म्हणाले की, 'आरपीआय पक्षाचा मराठा आरक्षणाला सुरु वातीपासूनच जाहीर पाठिंबा आहे. विदर्भातील कुणबी मराठा समाजाला आधीच आरक्षण आहे. मराठा समाजही कुणबी समाजाप्रमाणेच शेती करतो, त्यामुळे ज्यांच्या जुन्या नोंदी कुणबी म्हणून आढळल्या आहेत, त्यांना ओबीसी दाखला नक्की द्यावा. मात्र, सरसकट सर्व मराठा समाजाला ओबीसी म्हणता येणार नाही.' मराठा समाजाला आरक्षण देताना मूळ ओबीसींवर अन्याय होता कामा नये. त्यामुळे मराठा समाजाचा समावेश १० टक्के ईडब्ल्यूएस (क्ज्ञ्च) गटामध्ये करून त्या माध्यमातून आरक्षण देता येउ शकते. आगामी जनगणनेनंतर सर्व समाजाची खरी आकडेवारी समोर येईल, परंतु तोपर्यंत मराठा आरक्षणाचा निर्णय लवकर व्हावा, अशी आमची भूमिका आहे, असं रामदास आठवले म्हणाले.

**जनगणनेनंतर लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण द्या-** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर राज्य शासनाकडून अनुसूचित जाती-जमातींच्या उपवर्गीकरणाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. यावर बोलताना आठवले म्हणाले, 'आता देशात जनगणना होत आहे, ज्यातून सर्व समाजाची खरी आकडेवारी समोर येईल. त्यामुळे कोणत्याही जातीवर अन्याय न करता, ज्याची जेवढी लोकसंख्या, तेवढे त्याला आरक्षण या तत्त्वाने आरक्षण मिळालं पाहिजे.' मातंग समाजाच्या मनात आपल्यावर अन्याय झाल्याची भावना आहे, हे मान्य करत ते पुढे म्हणाले की, देशात जातीव्यवस्था कायद्याने संपली असली तरी लोकांच्या मनातून ती अद्याप गेलेली नाही. आजही खेड्यापाड्यात दलितांवर अन्याय होत आहेत. ज्या दिवशी मनातून ही जातीव्यवस्था पूर्णपणे नष्ट होईल, (पान २ वर)

# पश्चिम बंगालमध्ये 'शिंदे' पॅटर्न?

## 50 आमदार टीएमसी सोडण्याच्या तयारीत

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगालच्याराजकारणात मोठा भूंकप होण्याची शक्यता असून माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पक्ष तृणमूल कॉंग्रेसमधील ५० आमदार बंडखोरीच्या तयारीत असल्याचा दावा पक्षातून निलंबित करण्यात आलेले राष्ट्रीय प्रवक्तेराष्ट्रीय प्रवक्ते रिजू दत्ता यांनी केला. एवढेच नव्हेतर, हे सर्व आमदार वेगळा गट स्थापन करून टीएमसीच्या अधिकृत चिन्हावर दावा ठोकण्याच्या तयारीत आहेत, असेही त्यांनी म्हटले आहे. रिजू दत्ता यांच्या वक्तव्यानंतर पश्चिम बंगालच्याराजकारणा एकच खळबळ माजली आहे. इंडिया टुडे डिजिटल'शी बोलताना रिजू दत्ता म्हणाले की, 'तृणमूल कॉंग्रेसचे सुमारे ५० आमदार पक्ष सोडून वेगळा गट स्थापन करण्याच्या आणि पक्षाचे अधिकृत



चिन्हावर दावा ठोकण्याच्या तयारीत आहेत. पक्षांतर बंदी कायद्यानुसार कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी आणि पक्षावर ताबा मिळवण्यासाठी बंडखोरांना दोन-तृतीयांश आमदारांची म्हणजेच किमान ५३ आमदारांची गरज असेल.'

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या निकालात गेल्या अनेक वर्षांपासून सत्तेत असलेला ममता बॅनर्जींचा पक्ष बहुमत मिळवण्यात अपयशी ठरला. त्यानंतर नवनिर्वाचित टीएमसी आमदारांचा एक मोठा गट ऋतब्रत बॅनर्जी यांना विरोधी पक्षनेते बनवण्याच्या बाजूने होता. परंतु, ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील पक्षाच्या वरिष्ठ पातळीवरून या पदासाठी शोभनदेव चट्टोपाध्याय यांच्या नावाचा प्रस्ताव पुढे करण्यात आला. यामुळे आमदारांमधील नाराजी तीव्र झाली. यातच आमदारांच्या स्वाक्ष-यांच्या बनावट दस्तऐवजाचा वाद समोर आला, ज्यानंतर पक्षाने ऋतब्रत बॅनर्जी आणि संदीपान साहा या दोन आमदारांना पक्षविरोधी कारवायांचा' आरोप ठेवत पक्षातून बडतर्फ केले. या कारवाईनंतर हा वाद शांत होण्याऐवजी आणखीनच पेटला आहे.

पक्षातून हकालपट्टी झाल्यानंतर ऋतब्रत बॅनर्जी आणि संदीपान साहा यांनी कोलकाता येथील आमदार निवासात इतर काही आमदारांसोबत एक गुप्त बैठक घेतल्याचे वृत्त समोर आले. यानंतर दक्षिण कोलकाता येथील एका हॉटेलमध्येही बंडखोर आमदारांची (पान २ वर)

# पेट्रोल-डिझेल 2.5 ने आणखी वाढणार

**नवी दिल्ली-**आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींच्या पार्श्वभूमीवर भारतातील तेल कंपन्या पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत २.५ रुपयांपर्यंत वाढ करू शकतात. सध्या देशात १५ मे पासून आतापर्यंत पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत प्रति लिटर सुमारे ७.५ ची वाढ झाली आहे. रेटिंग एजन्सी क्रिसिलने मंगळवारी (२ जून) आपल्या अहवालात दावा केला की, जर जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती अशाच वाढत राहिल्या, तर तेल कंपन्या आपले नुकसान कमी करण्यासाठी येत्या काही दिवसांत एकूण वाढ प्रति लिटर १० पर्यंत नेउ शकतात.अहवालानुसार, इंधनाच्या किमतीत प्रति लिटर ७.५ ची ही वाढ थेट किरकोळ महागाईत सुमारे ३६ बेसिस पाइंट्स (०.३६ऽ) वाढ करू शकते. तर, जर ही वाढ प्रति लिटर १० पर्यंत पोहोचली, तर महागाईवरील याचा परिणाम वाढून सुमारे ४८ बेसिस पाइंट्स (०.४८%) होईल. अहवालानुसार, इंधन महाग झाल्याने वाहतूक, लाजिस्टिक्स आणि उत्पादन खर्च वाढेल, ज्याचा थेट परिणाम येत्या काही महिन्यांत खाद्यपदार्थ आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंच्या किमतींवर दिसून येईल. भारतात मालवाहतुकीचा सुमारे ७१ऽ भाग रस्ते वाहतुकीद्वारे होतो आणि वाहतूकदारांच्या एकूण परिचालन खर्चात इंधनाचा (डिझेल) वाटा सुमारे ४२% असतो. किरकोळ इंधन महाग झाल्याने वाहतूक खर्च वाढेल, ज्यामुळे संपूर्ण पुरवठा साखळी प्रभावित होईल. क्रिसिलच्या मते, वाहतुकीवर अवलंबून असलेल्या खाद्य श्रेणी सर्वाधिक प्रभावित होतील.



# शहरातील नामांकित शिक्षण संस्थेचा महाप्रताप

## पालकांना अकरावी प्रवेश करिता अतिरिक्त शुल्काची मागणी

### चार हजार रुपयाची लूट



**दिग्रस/प्रतिनिधीः-** दिग्रस शहरातील नावाजलेली एक शिक्षण संस्था अकरावी प्रवेशा करिता कोणतीही पावती न देता पालकांकडून ४ हजार रुपये घेत असल्याने सध्या संस्थेच्या भोंगळ कारभाराची चर्चा सर्वत्र रंगली आहे.

अकरावी ऑनलाइन प्रवेशाची पहिली फेरी नुकतीच जाहीर झाली आहे, यामध्ये विद्यार्थ्यांनी ऑनलाइन प्रक्रियेमध्ये दिलेला प्राधान्य क्रमानुसार प्रवेश प्राप्त झालेल्या शाळेत जाऊन प्रवेश घ्यावा लागतो, पालक वर्ग त्यांना ऑनलाइन प्रक्रियेमध्ये प्रवेश मिळालेल्या एका बड्या संस्थेत प्रवेशाकरिता जात आहे. परंतु तिथे गेल्यानंतर प्रवेश निश्चित करणाऱ्या संस्थेच्या कर्मचाऱ्याकडून त्यांना प्रवेश निश्चित करण्यापूर्वी चार हजार रुपयाची मागणी करत असल्याचे पालकांनी सांगितले आहे. काही पालकांनी त्या कर्मचाऱ्यांच्या फोन पे स्कॅनर वर सुद्धा पैसे मारल्याचा पुरावा पालकांकडे आहे. वास्तविक पाहता या शाळेची प्रवेश फी ऑनलाईन प्रक्रियेमध्ये नगण्य आहे . इतके असताना सुद्धा संस्थाचालकांना पैसे कमावण्याची ही आयती चालून आलेली संधी वाटत असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. या शाळेमध्ये ८० च्या जवळपास विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे, त्यामुळे संस्था लाखो रुपये कमावणार हे निश्चित. काही जागरूक पालकांनी ४ हजार रुपये संदर्भात मुख्याध्यापकांना विचारणे केली असता, मुख्याध्यापकाने सायकल फी, रिक्षा फी लॅबोरेटरी फी, इत्यादी वेगवेगळ्या फीचे कारणे सांगून अकरावी व बारावी करिता दोन्ही वर्षाकरिता ४ हजार घेत असल्याचे कबूल केले आहे. पालकांकडे यासंदर्भात कॉल रेकॉर्डिंग व फोन पे च्या पावत्या सुद्धा आहे. परंतु मुख्याध्यापकांना पावती संदर्भात विचारणा केली असता पावती मिळत नसल्याचे त्यांनी स्पष्ट सांगितले. त्यामुळे फी चे पैसे नेमके कोणाच्या घशात चालले आहे हे पालकांना समजण्यापलीकडचे झाले आहे. पालक वर्ग शिक्षणाधिकारी माध्यमिक यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे पालकांनी सांगितले आहे.

#### संस्था सचिवांची मुकसंमती

११ वी प्रवेश करिता शाळेकडून चार हजार रुपये घेत असल्याचे पालकांनी सचिवांना सांगितले. परंतु सचिवांनी सुद्धा वेगवेगळ्या फीचे कारणे सांगून भरावेच लागते असे सांगितले. परंतु फीची पावती का देत नाही? असे विचारले असता त्यांनी उत्तर देणे टाळले

# पेरणीपूर्वीच शेतकऱ्यांसमोर समस्यांचा डोंगर

## रासायनिक खते, बियाणे व डिझेलच्या भाववाढीने झाली दुहेरी कोंडी



**नांदगाव खंडेश्वर/ प्रतिनिधीः-** मागील दोन वर्षापासून निसर्गाच्या लहरीपणामुळे नापिकीच्या संकटात सापडलेला शेतकरी यावर्षी रासायनिक खते ,बियाणे व डिझेलच्या भाव वाढी मुळे पूर्णतः कोडमडला असून दुहेरी कोंडीत सापडला. खरिपाच्या पेरणी पूर्वीच शेतकऱ्याला सुलतानी संकटाचा मार सहन करावा लागत असल्याने पेरणीपूर्वीच शेतकऱ्यांसमोर समस्यांचा डोंगर उभा आहे. खरीप हंगामाची पूर्वतयारी अंतिम टप्प्यात आली असली तरी यावर्षी रासायनिक खते बियाणे व डिझेलच्या भाव वाढीमुळे शेतीच्या मशागतीचा वाढलेला खर्च शिवाय यावर्षी पाऊस कमी असल्याचा हवामान खात्याकडून मिळत असलेला संकेत यामुळे खरिपात शेतीची पेरणी करावी की नाही या द्विधा मनस्थितीत अनेक शेतकरी अडकले. आधीच आर्थिक व नैसर्गिक संकटाने बेजार झालेल्या शेतकऱ्यांचे खते बियाणे व शेतीच्या मशागतीच्या भाव वाढीने कंबरडेच मोडले. शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट केल्या जात असल्याची वलगना शासनाकडून केल्या जात असली तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांची परिस्थिती मात्र विदारक आहे. मागच्या वर्षीच्या तुलनेत सोयाबीन बियाण्याचे बॅग च्या किमतीमध्ये सरासरी ४०० ते ५०० रुपयापर्यंत वाढ झाली. रासायनिक खतामध्ये मोठ्या प्रमाणात भाव वाढ होऊन डिझेलच्या भाव वाढीने शेतीच्या मशागतीचा सुद्धा खर्च वाढला. हल्ली शेतीची संपूर्ण कामे ट्रॅक्टरच्या सहाय्याने होत असल्याने ट्रॅक्टरच्या भाडे वाढीचा फटका सुद्धा सहन करावा लागत आहे. शासनाचे कर्जमाफीचे धोरण स्पष्ट होत नाही आणि थकीत शेतकऱ्याला बँक पीक कर्ज देण्यास तयार नाही. त्यामुळे शेतकरी सावकाराच्या दारात असून गरीब शेतकऱ्यासमोर खरीपातील पेरणीचा प्रश्न उभा आहे. शासनाच्या धोरणामुळे एकीकडे शेतमालास योग्य भाव मिळण्याची हमी नाही तर दुसरीकडे शेतमालाचा उत्पादन खर्च दुपटीने वाढला सातत्याने होणारी नापीकी तर सरकारी धोरणामुळे वाढलेली महागाई अशा दुहेरी संकटात शेतकरी अडकला असून यंदाच्या खरीप पेरणीपूर्वीच शेतकऱ्यांसमोर वाढत्या महागाईने समस्यांचा डोंगर उभा असल्यामुळे शासनाप्रती असंतोषाचे वातावरण शेतकऱ्यांमध्ये घुमसत आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### गुजरातमध्ये महाराष्ट्राच्या

घटनास्थळी पोहोचले. त्यांच्या पत्नीच्या हाताला फ्रॅक्चर झाल्याचा संशय असून पाय आणि कंबरेलाही दुखापत झाली आहे. मुलगी मात्र सुरक्षित आहे.

**बसमध्ये ४० हून अधिक प्रवासी-** गणेश कुंभारे यांच्या मते, बसमध्ये ४० हून अधिक प्रवासी होते. बस जवळपास भरलेली होती. अपघात इतक्या कमी वेळात घडला की कोणालाही काय झाले हे समजण्याची संधी मिळाली नाही. ते बसच्या मागील बाजूस बसले होते, त्यामुळे नेमकी धडक कशी झाली हे त्यांना दिसले नाही.

### नागपूर ठरणार देशात थ्री वर्ल्ड

प्रवेशमार्ग, २८ लिफ्ट आणि ३१ एस्कलेटर यांचा त्यात समावेश असेल. याशिवाय स्मार्ट स्टेशन तंत्रज्ञान, सौरउर्जा, पर्जन्यजल संकलन, हरित इमारत संकल्पना आणि शाश्वात कचरा व्यवस्थापनाला देण्यात येत आहे.

**अजनी बनणार, दुसरे प्रमुख केंद्र-** २९७.९७ कोटी रु पयांच्या खर्चातून अजनी रेल्वे स्थानकाचे आधुनिक सॅटेलाइट स्टेशनमध्ये रु पांतर केले जात आहे. स्थानकाच्या पूर्व आणि पश्चिम बाजूंना स्वतंत्र प्रवेशद्वारे, काँग्रेसनगर मेट्रो स्थानकाशी थेट जोडणी, प्लॅटफार्मला जोडणारा प्रशस्त उंचावरील क?न्कोर्स, अत्याधुनिक पिक-अप व ड्राप-ऑफ झोन तसेच २१ लिफ्ट, १७ एस्कलेटर, आणि प्रशस्त पार्किंग सुविधा येथे उभारल्या जात आहेत. येथे १५,३०० चौरस मीटर हरित क्षेत्र विकसित केले जाणार आहे. विमानतळ, आयटी पार्क, एमआयडीसी परिसर, शैक्षणिक संस्था आणि व्यापारी केंद्रांच्या जवळ असल्याने अजनी स्थानक भविष्यात शहराच्या वाहतूक व्यवस्थेतील महत्त्वाचा दुवा ठरणार आहे.अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत ४३ कोटी रु पयांच्या खर्चातून गोधनी स्थानकाचा सॅटेलाइट स्टेशन म्हणून विकास सुरू आहे. काम पूर्ण झाल्यानंतर गोधनी-कळमना क?र्ड लाईनमार्गे अनेक मेल-एक्स्प्रेस गाड्या थेट गोधनीवरू न हाताळता येणार, त्यामुळे नागपूर स्थानकावरील गर्दी आणि परिचालनाचा ताण कमी होईल. अर्थात् हे 'रिलिफ स्टेशन' ठरणार आहे. येथे नवीन स्टेशन इमारत, वातानुकूलित प्रतीक्षागृह, रिटायरिंग रूम, ड?रमिटरी, लिफ्टयुक्त फूटओव्हर ब्रिज, पार्किंग, प्लॅटफ?र्म विस्तार आणि आधुनिक प्रवासी माहिती प्रणाली उभारली जात आहे.

### जम्मूतील किश्तवाडमध्ये

राजस्थानमधील जैसलमेर आणि बाडमेरमध्ये भिंत कोसळून दोन मुलांसह ३ जणांचा बळी गेला. ढग आकाशात तरंगताना दिसणारे पाण्याचे कण किंवा बर्फ असतात. जेव्हा पाण्याची वाफ किंवा बाष्प बनून पाण्याचे खूप लहान कण वातावरणाच्या वरच्या थरावर पोहोचून थंड वा-यांशी मिळतात, तेव्हा त्यांना ढग म्हणतात. ही झाली ढगांची गोष्ट. आता पुढे जाणून घेउया की ढगफुटी म्हणजे नक्की काय असते... जेव्हा एखाद्या लहानशा प्रदेशात खूप कमी वेळात खूप जास्त पाउस पडतो, तेव्हा त्याला आपण ढगफुटी म्हणतो. यात ढग फुटल्यासारखं काही नसतं. होय, असा पाउस इतका जोरदार असतो की जणू काही जास्त पाण्याने भरलेली एक खूप मोठी प?लिथीन आकाशात फुटली आहे. म्हणूनच याला हिंदीत 'बादल फटना' आणि इंग्रजीत 'Cloudburst' असं म्हणतात. हवामान विभागाच्या मते, जेव्हा अचानक २० ते ३० चौरस किलोमीटरच्या परिसरात एका तासात किंवा त्यापेक्षा कमी वेळात १००मिमी किंवा त्याहून अधिक पाउस पडतो, तेव्हा त्याला ढगफुटी म्हणतात. ढगफुटीच्या घटनेबद्दल संपूर्ण माहिती सोप्या भाषेत तुम्ही येथे वाचू शकता खरंच ढग फुटतो का? अमरनाथ-केदारनाथसारख्या प्रदेशात अशी आपत्ती वारंवार का येते?

### हातभट्टीची दारू अधिकृत

त्या दिवशी आम्ही स्वतःहून आरक्षण सोडायला तयार आहोत.पक्ष कार्यकर्त्यांना मोलाचा सल्ला देताना रामदास आठवले म्हणाले की, रिपब्लिकन पक्ष हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेवर चालणारा पक्ष आहे. दलित पँथरनंतर बाबासाहेबांचा हा पक्ष मी देशभर पसरवला आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी पक्षाची शाखा केवळ एका विशिष्ट समाजापुरती मर्यादित ठेवू नये. केवळ एका समाजाच्या मतांवर कोणालाही सत्ता स्थापन करता येत नाही. पक्ष मोठा करायचा असेल तर सर्व जाती-धर्माच्या लोकांना एकत्र घेउन त्यांना न्याय देणे गरजेचे आहे, तरच पक्षाचा विस्तार होईल.

### पश्चिम बंगालमध्ये 'शिंदे'

बैठक झाल्याचा संशय आहे. दुसरीकडे, रविवारी ३१ मे रोजी ममता बॅनर्जी यांनी त्यांच्या निवासस्थानी बोलावलेल्या एका महत्त्वाच्या बैठकीला पक्षाच्या ८० पैकी जवळपास ६० आमदारांनी दांडी मारली. आमदारांच्या या मोठ्या अनुपस्थितीमुळे ममता बॅनर्जी यांना आपल्या सहका-यांना एकत्र ठेवण्यात अपयश येत असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे.

### २ लाखांपर्यंतचे कर्ज

समोर आलेल्या माहितीनुसार शेतकरी कर्जमाफी योजनेला आज मान्यता मिळाली आहे. मात्र विधानपरिषद निवडणुकीची आचारसंहिता असल्यामुळे या कर्जमाफीची घोषणा आत्ताच केली जाणार नाही. विधानपरिषद निवडणूक संपल्यानंतर ही घोषणा होणार आहे. आगामी काळात अटी आणि शर्थीबाबत सरकारकडून माहिती देण्यात येणार आहे. या कर्जमाफी निर्णयाचा लाखो शेतक-यांना फायदा होणार आहे.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील एकूण ५६ लाख शेतक-यांना या कर्जमाफी योजनेचा फायदा होणार आहे. या शेतक-यांचे २ लाखांपर्यंतचे कर्ज माफ केले जाणार आहे. तसेच जे शेतकरी वेळेवर कर्ज फेडतात, त्यांना प्रोत्साहनपर रक्कमही दिली जाणार आहे. ऐन मान्सूनच्या तोंडावर आता शेतक-यांना कर्जमाफीचा फायदा होणार आहे. त्यामुळे शेतक-यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेचे निकष काय?** योजनेची पात्रताः ३० सप्टेंबर २०२५ रोजीपर्यंत थकीत पीक कर्ज माफी कर्जमाफीचा किती फायदाः या योजनेत पात्र शेतक-यांना २ लाख रु पयांपर्यंत कर्जमाफी देण्यात येणार आहे. नियमित कर्ज फेड करणा-या उमेदवारांना प्रोत्साहनः नियमितपणे कर्ज परतफेड करणा-या शेतक-यांना सरकार ५०,००० रूपयांपर्तंचे अनुदान देणार आहे. त्यांचे अतिरिक्त५० हजार कर्ज माफ होईल. सरकारच्या तिजोरीवर आर्थिक भारः या योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर अंदाजे २५ हजार कोटींचा भार पडण्याची शक्यता आहे.दरम्यान, गेल्या वर्षी झालेल्या गारपीटीमुळे शेतक-यांचे मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे कर्जमाफीच्या मागणीसाठी बच्चू कडू आणि इतर नेत्यांकडून आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर सरकारने ३० जून २०२६ पूर्वी कर्जमाफीचा शब्द दिला होता, त्यानुसार आता सरकारने पावले उचलायला सुरुवात केली आहे.

### पहिल्या टप्प्यात सुमारे १,५००

असलेल्या ग्रोथ कारिडारमधील रस्त्यांच्या सुधारणेला प्राधान्य देण्यात येणार आहे. यामुळे राज्यातील प्रमुख आर्थिक, औद्योगिक, कृषी व व्यापारी मार्गिकांमध्ये वाहतुकीची कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार आहे.एआयआयबीच्या अर्थसहाय्यांतर्गत पहिल्या टप्प्यात अंदाजे ७५० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ईपीसी तत्त्वावर स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेद्वारे हाती घेण्यात येणार आहेत. याच धर्तीवर एनडीबीच्या अर्थसहाय्यांतर्गतही पहिल्या टप्प्यात अंदाजे ७५० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे हाती घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.दोन्ही संस्थांकडून प्राप्त होणा-या कर्जसहाय्याची रचना, प्रतिपूर्तीची प्रक्रिया आणि कार्यपद्धती समान स्वरूपाची असून राज्यातील महत्त्वाच्या रस्ते मार्गिकांच्या आधुनिकीकरणासाठी या निधीचा वापर करण्यात येणार आहे.या निर्णयामुळे राज्यातील रस्ते जाळ्याची गुणवत्ता उंचावून वाहतूक अधिक सुरक्षित, वेगवान आणि कार्यक्षम होणार असून मालवाहतुकीचा खर्च कमी होण्यास, उद्योग-व्यापाराला चालना मिळण्यास आणि राज्याच्या आर्थिक विकासाला गती मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

### तपोवन टेकडी परिसरात आढळला

तपासासाठी पाठविण्यात येणार आहे. तपास यंत्रणांच्या प्राथमिक निरीक्षणानुसार मृतदेह जाळण्यामागे मृत महिलेची ओळख लपविण्याचा हेतू असू शकतो. शरीराचा काही भाग जळालेल्या अवस्थेत आढळल्याने पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्याचा संशय अधिक बळावला आहे. त्यामुळे पोलिसांनी हत्येच्या विविध शक्यतांचा विचार करून तपास सुरू केला आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण तसेच गाडगेनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर शहर पोलीस आयुक्त राकेश ओला यांनीही घटनास्थळी भेट देऊन तपासाचा आढावा घेतला आणि अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. मृत महिलेची ओळख पटविण्यासाठी शहरासह जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या बेपत्ता महिलांच्या तक्रारींची पडताळणी सुरू करण्यात आली आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असून, त्यानुसार तपासाची दिशा निश्चित केली जाणार आहे.

दरम्यान, शहराच्या मध्यवर्ती भागाजवळील टेकडी परिसरात अशा स्वरूपाचा मृतदेह आढळल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

### चार बळी घेणारी वाघीण

असल्याची माहिती होताच मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांनी २ जून रोजी परतवाडा येथील ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर येथे भेट देऊन वन्यजीव विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. ते म्हणाले की, मेळघाटात या वाघिणीला सोडण्यात येऊ नये कारण वन्यजीव व नागरिकांचा संघर्ष हा पूर्वीपासुनच सुरु आहे. यापूर्वी बिबट्याने अनेक निष्पाप लोकांचा बळी घेतला आहे. त्यात चंद्रपुरची वाघिण सोडल्यास हा संघर्ष वाढेल अशी भीती व्यक्त करत केवलराम काळे यांनी मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वाघिणीला सोडण्यास विरोध दर्शविला.

चंद्रपूर जिल्हयातील ४ महिलांचा बळी घेणाऱ्या वाघिणीचे ४ बछडे असुन त्यातील २ बछड्यांचा वन्यजीव विभागाने शोध घेत चंद्रपूर येथील वनकुटीत एक बछडे तर दुसरे बछडे नागपुर येथील गोरेगांव येथे ठेवले आहे. परतवाडा येथे असणाऱ्या या वाघीणीस ज्ञानगंगा वन्यजीव भागात व नागपुर गोरेवाडा येथे सोडण्यात यावे. जेणेकरुन या बछड्यांचा सहवास वाघिणीला मिळू शकेल अशी मागणी आ. केवलराम काळे यांनी केली असुन मेळघाटात सोडण्यास विरोध दर्शविला आहे. याप्रसंगी यशवंत काळे, शैलेश म्हाला, वन्यजीव अभ्यासक अल्केश ठाकरे, स्वीय सहाय्यक आकाश खैरकर उपस्थित होते.

### दर्यापूरच्या महिलेने नागपूरात

पोलिसांनी अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील जेनपूर येथून एका महिलेला अटक केली आहे.हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालाय. त्या आधारे पोलिसांनी आरोपी महिलेला अटक केली आहे. कौटुंबिक वादातून झालेल्या कथित अपमानाचा सूड उगवण्यासाठी नातेवाइकाच्या घराबाहेर उभी असलेली कार महिलेनं पेटवून दिल्याचं समोर आले आहे. पुष्पा काशीराम आमले असे अटक करण्यात आलेल्या महिलेचं नाव आहे. ती गोधनी येथील फागोजी ले-आऊटमध्ये राहणाऱ्या बस चालक निखिलेश कृष्णराव राजूरकर यांची नातेवाईक आहे. आर्थिक व्यवहारांवरून दोघामध्ये वाद सुरू असल्याचं पोलिसांनी सांगितलं. पुष्पा पूर्वी पतीसह गोधनी येथे राहत होती. काही वर्षांपूर्वी तिच्या पतीची हत्या झाल्यानंतर ती मूळ गावी परतली. मात्र, नातेवाईकांच्या भेटीसाठी ती नियमितपणे गोधनी येथे येत होती. वारंवार होणाऱ्या वादामुळे निखिलेश आणि त्यांच्या कुटुंबीयांनी तिच्यापासून अंतर ठेवण्यास सुरुवात केली होती.

**सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे महिलेला अटक-**

मानकापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हरीश काळसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यातून संशयिताची ओळख पटली. तपासादरम्यान घटनेच्या दिवशी पहाटेच्या सुमारास पुष्पा एका नातेवाइकाच्या घरातून गावाकडे जात असल्याचं सांगून निघून गेल्याची माहिती समोर आली. तसेच तिच्या मोबाईल फोनचं लोकेशन ही घटनास्थळ परिसरात आढळले. पुराव्यांच्या आधारे पोलिसांचे पथक दर्यापूर येथे रवाना झाले. पुष्पा आमले हिला अटक करून नागपुरात आणले. या प्रकरणाचा पुढील तपास मानकापूर पोलीस करत आहे.

### विप्लव बाजोरिया यांचा

अर्ज बाद करण्याचा निर्णय दिला. यामुळे मोठी खळबळ उडाली. आता अमरावती विधान परिषद निवडणूक क्षेत्रात भाजपाचे प्रवीण पोटे, काँग्रेसचे हर्षजीत देशमुख आणि वंचितचे निलेश विश्वकर्मा यांच्यात तिरंगी लढत होण्याचे स्पष्ट संकेत दिसत आहे.

अपक्ष उमेदवार विप्लव बाजोरिया यांनी सादर केलेल्या ११ पानी प्रतिज्ञा पत्रामध्ये काही आवश्यक माहिती अपूर्ण असल्याचे तसेच प्रतिज्ञा पत्राच्या शेवटी बाजोरिया यांची स्वाक्षरी नसल्याने आक्षेप घेण्यात आले होते. या त्रुटीमुळे बाजोरिया यांच्या नामांकनाच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाला होता. भाजपाचे प्रवीण पोटे, काँग्रेसचे हर्षजीत देशमुख, वंचितचे निलेश विश्वकर्मा व अपक्ष प्रशांत महल्ले यांनी बाजोरियांच्या नामांकना विरोधात अधिकृत आक्षेप दाखल केला होता. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेमध्ये नाट्यमय घडामोड घडली. राज्याचे लक्ष याकडे लागले होते. सायंकाळी पाच वाजता सुनावणी सुरू झाली. विप्लव बाजोरिया यांच्यासह त्यांचे वकील एड. मिलिंद वैष्णव यांनी त्यांचा पक्ष ठेवला. तर आक्षेपकर्ता उमेदवाराच्या वतीने एड. प्रशांत देशपांडे ,एड.संदीप गुप्ता, एड

नितीन कोल्हटकर,एड. चंद्रशेखर डोरले यांनी युक्तिवाद केला. डॉ. निलेश विश्वकर्मा आणि डॉ. प्रशांत महल्ले हे या प्रकरणात प्रतिवादी पक्ष म्हणून सहभागी झाले. सुनावणी दरम्यान दोन्ही पक्षांकडून कायदेशीर बाजू मांडण्यात आली. यामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले होते.

### अमरावती पोलिस दलात मोठा

एकाचवेळी तब्बल १६४ पोलिस शिपायांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले. या मोठ्या बदल्यांनंतर आता विनंती अर्जांवर आधारित बदली प्रक्रियेला सुरुवात होणार असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी यापूर्वीच पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे संकेत दिले होते. त्यानुसार मंगळवारी बदलीस पात्र असलेल्या सर्व १६४ पोलिस शिपायांना पोलीस आयुक्तालयाच्या बेसमेंटमधील सभागृहात बोलावण्यात आले होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आवश्यक कागदपत्रांची पडताळणी, सेवा नोंदींची तपासणी आणि अन्य प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून बदल्यांना अंतिम मंजुरी देण्यात आली. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी अमरावती शहर पोलीस आयुक्तपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर सुमारे सहा महिन्यांत हा पहिलाच मोठा प्रशासकीय फेरबदल मानला जात आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याची चर्चा पोलीस वर्तुळात आहे.

### चांदूर बाजारात १३.७८ लाखांचा

झडती घेण्यात आली. यामध्ये २० मोठ्या पोत्यांमध्ये भरलेला हॉट पान मसाला व सुगंधित तंबाखूचा प्रतिबंधित साठा आढळून आला. जप्त मालाची किंमत ८ लाख ५८ हजार रुपये असल्याचे निष्पन्न झाले.

अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पंचनामा करून पोलिसांनी गुन्हा दाखल केला. यामध्ये आरोपी म्हणून क्लिनर शोएब अली, बोलेरो चालक सज्जू, वाहन मालक पिंटू उर्फ मोहम्मद साबीर मोहम्मद रफीक, तसेच अमरावती येथील शेख अमीन शेख नाजीम, सै. जुनेद सै. जब्बार, विकी मंगलानी आणि आसीफ अशर्फी यांचा समावेश आहे.

या कारवाईत ८.५८ लाख रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, ५ लाख रुपये किंमतीचे बोलेरो वाहन आणि दोन मोबाईल फोन असा एकूण १३ लाख ७८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी शोएब अली याला अटक करण्यात आली असून उर्वरित फरार आरोपींचा शोध सुरू आहे. पुढील तपास चांदूर बाजार पोलीस करीत आहेत.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे, चांदूर बाजारचे पोलीस निरीक्षक अशोक जाधव तसेच पोलीस उपनिरीक्षक नितीन इंगोले व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. अवैध गुटखा तस्करीविरोधातील ही कारवाई जिल्ह्यातील तस्करांसाठी मोठा इशारा मानली जात आहे.

### ग्रामीण पोलिसांची अवैध दारू

कासदेकर (रा. बैतूल, मध्यप्रदेश) आणि अब्दुल अन्सार शेख तुराप (रा. खोमई, मध्यप्रदेश) यांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून २०० लिटर गावठी दारू, ३ हजार लिटर मोहाचा सडवा तसेच गुळ, नवसागर आणि इतर साहित्य असा एकूण १ लाख ५२ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**मंगरूळ चवाळा पारधी बेड्यावर धाड-** मंगरूळ चवाळा पोलिसांनी पारधी बेड्यावर छापा टाकून सपना भोसले, रेशमा भोसले आणि ललित भोसले यांच्याविरुद्ध कारवाई केली. यावेळी २५० लिटर गावठी दारू आणि ४०० लिटर मोहाचा सडवा आढळून आला. पोलिसांनी दारू जप्त केली तर सडवा नष्ट करण्यात आला.

**हातभट्टीवर ब्राम्हणवाडा पोलिसांची रेड-** ब्राम्हणवाडा पोलिसांनी जामवंत टीमाजी धोटे (रा. चिचकुंभ) यांच्या घरावर छापा टाकून ७५ लिटर गावठी दारू आणि दारू निर्मितीचे साहित्य जप्त केले. विशेष म्हणजे घटनास्थळी हातभट्टी सुरू असतानाच पोलिसांनी धाड टाकली. यावेळी २०० लिटर मोहाचा सडवा आढळून आला असून तोही जप्त करून नष्ट करण्यात आला.

**महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवरही कारवाई -** यापूर्वी १ जून रोजी शिरजगाव पोलिसांनी महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवरील मेघा नदीपात्रात छापा टाकून आशिक कासदेकर (रा. सुपाळा, मध्यप्रदेश) याला ताब्यात घेतले होते. त्याच्याकडून १२० लिटर गावठी दारू, २,४०० लिटर मोहाचा सडवा आणि दारू निर्मितीचे साहित्य असा ३ लाख १४ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या संयुक्त मोहिमेत पोलिसांनी ६४५ लिटर गावठी हातभट्टी दारू व ६,००० लिटर मोहाचा सडवा, दारू निर्मितीसाठी लागणारे गुळ, नवसागर व अन्य साहित्य असा एकूण ७ लाख ११ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार आणि अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखा, शिरजगाव, मंगरूळ चवाळा आणि ब्राम्हणवाडा पोलिसांच्या पथकांनी आरसीपी पथकाच्या सहाय्याने ही धडक मोहीम यशस्वी केली.

# युट्युबरची पत्रकाराला अश्लील भाषेत शिवीगाळ

## येवदा पोलिसांत गुन्हा दाखल

**खल्लार/प्रतिनिधीः-** लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेवर सातत्याने दबाव आणण्याचे प्रकार वाढत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. जनतेचे प्रश्न मांडणाऱ्या पत्रकारांना अनेकदा धमक्या, शिवीगाळ आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. असाच प्रकार दर्यापूर येथे (दि. १) रात्रीच्या सुमारास घडला.

युट्युबर असलेल्या गणेश साखरे व त्याचे तीन साथीदार यांनी काल रात्रीच्या सुमारास नागपूरवरुन प्रकाशित होणाऱ्या एका दैनिकाचे नांदरुन येथिल पत्रकार शिलवंत रायबोले यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करून अपमानित केले.याप्रकरणी शिवीगाळ करणारा व्यक्ती व त्याच्या साथीदाराविरुध्द येवदा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माहितीनुसार पत्रकार शिलवंत रायबोले हे सामाजिक, प्रशासकीय आणि जनहिताच्या विविध विषयांवर वृत्तांकन करीत असतात. त्यांच्या पत्रकारितेच्या कार्यामुळे काही गैरप्रकार उघडकीस येत असल्याने संबंधित व्यक्तीने संतापाच्या भरात त्यांच्याशी अर्वाच्य भाषेत बोलून अश्लील शिवीगाळ केली. या घटनेमुळे पत्रकारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

घटनेनंतर शिलवंत रायबोले यांनी संबंधित व्यक्तीविरोधात येवदा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी संबंधिताविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

### मेळघाटातील आरोग्य व्यवस्थेच्या

स्थापन करणे, उपजिल्हा रुग्णालय, दर्यापूर येथील रुग्णालयाचे ५० खाटांवरून १०० खाटांवर श्रेणीवर्धन करणे तसेच तिथे तातडीने ट्रॉमा केअर युनिट, सिटी स्कॅन, रक्तपेढी आणि एमआरआय सुविधा उपलब्ध करून देणे आदी कामांचे प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

बैठकीत नागपूर जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रलंबित प्रस्तावांवर चर्चा झाली. नरखेड ग्रामीण रुग्णालयाचे ३० ते ५० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करून निधीला प्रशासकीय मान्यता देणे, कामठी उपजिल्हा रुग्णालयाकरिता एमएसआयडीसी नागपूर मार्फत प्रस्तावाला मंजुरी देणे, उमरेड येथे ट्रॉमा केअर युनिट आणि नवनिर्मित जिल्हा रुग्णालय नागपूर करिता पदनिर्मिती तात्काळ करणे, प्रधानमंत्री मातृवंदना योजनेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांचा राष्ट्रीय आरोग्य अभियानात समावेश करणे आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांचे शासकीय सेवेत समायोजन करणे, कुही ग्रामीण रुग्णालयाच्या ३० खाटांच्या इमारत बांधकामासाठी ३० कोटींच्या सुधारित प्रस्तावास मान्यता देणे आदी प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली.

### प्रसन्नच्या मृत्यूची निष्पक्ष

कामावर चल पण प्रसन्न ने म्हटले की माझ्या मित्राचे पार्टीसाठी फोन आले आहे म्हणून मी तिथे जात आहे. याच दिवशी सायंकाळी साडेसहा ते सातच्या दरम्यान प्रसन्न विहिरीत पडल्याचा फोन आला. त्यानंतर कुटुंबीय आणि गावकरी घटनास्थळी पोहोचले. विहिरीतून त्याचा मृतदेह पोलिसांनी बाहेर काढला. त्यावेळी त्याचे हात दोरीने बांधले होते. त्याच दोरीला प्लास्टिकची टबकी व फायबर खुर्ची बांधलेली होती आणि त्याचे पाय चिटकून होते. त्याच्या उजव्या डोळ्यातून नाकातून रक्त निघत होते. प्रसन्नला पोहणे येत होते. यावरून आम्हाला संशय आहे की, त्याचे मित्र सुमित विजय कदम, हर्षल संदीप चौधरी, सोहम विलास पोल व अथर्व अजय जगदाळे यांनी घातपात केला असावा. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करून प्रकरणाच्या मागे कुठली कारणे आहे त्याची सखोल तपासणी व्हावी अशी मागणी कुटुंबीयांनी पोलिस आयुक्तांकडे केली आहे. निवेदन देताना प्रसन्न चे वडील किशोर काललकर सह ग्रामस्थ उपस्थित होते.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, ३ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# मुर्तीजापूरात धान्य घोटाळ्याचे धागेदोरे ?
## तपास पथकाच्या हालचालींनी अनेकांची झोप उडाली

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

*अमरावती जिल्ह्यात उघडकीस आलेल्या तब्बल २ कोटी ४० लाख ४८ हजार ७२ रुपयांच्या कथित धान्य गैरव्यवहार प्रकरणाचे लोण आता मुर्तीजापूर तालुक्यापर्यंत पोहोचल्याची चर्चा सुरू झाली आहे. या प्रकरणात निलंबित करण्यात आलेल्या तत्कालीन निरीक्षण अधिकारी चैताली अजय यादव यांच्या कार्यकाळातील व्यवहारांची छाननी करण्यासाठी तपास यंत्रणा सक्रिय झाल्याचे समजत असून, सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अनेक व्यवहार आता तपासाच्या कक्षेत आल्याचे बोलले जात आहे.*

जिल्हा पुरवठा विभागाच्या चौकशीत जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत हजारो क्विंटल धान्याच्या कथित अपहाराचा मुद्दा पुढे आला. २७ मार्च २०२६ रोजी सादर करण्यात आलेल्या अंतरिम अहवालात शासनाला दोन कोटी चाळीस लाख रुपयांपेक्षा अधिक आर्थिक फटका बसल्याचा उल्लेख करण्यात आला. या अहवालानंतर दोन अधिकाऱ्यांविरोधात पोलिसांत तक्रार दाखल झाली, तर काही रेशन दुकानदारांचे परवानेही रद्द करण्यात आल्याने प्रकरणाचे गांभीर्य अधोरेखित झाले आहे.

### अमरावतीतील २.४० कोटींच्या कथित गैरव्यवहाराचे पडसाद; अंतिम अहवालात मोठा गौप्यस्फोट होण्याची चर्चा

**“ मुर्तीजापूरकडे तपासाचा मोर्चा?**

मुर्तीजापूर शहर व तालुक्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील कथित अनियमिततेबाबत यापूर्वी अनेकदा तक्रारी आणि वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्यामुळे जिल्हास्तरीय चौकशीचा रोख आता मुर्तीजापूरकडे वळल्याचे चित्र दिसून येत आहे. तपास पथक वितरण नोंदी, धान्य उचल रजिस्टर, लाभार्थी माहिती, ई-पॉस व्यवहार आणि इतर कागदपत्रांची पडताळणी करीत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

यामुळे धान्याचा प्रवास गोदामातून लाभार्थ्यांपर्यंत झाला की मध्येच कुठेतरी गायब झाला, हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

**“ कोणाच्या छातीत धडकी ?**

तपासाची व्याप्ती वाढत असल्याने तत्कालीन अधिकारी, कर्मचारी आणि काही रेशन दुकानदारांमध्ये कमालीची अस्वस्थता असल्याची चर्चा आहे. अंतिम अहवालात कोणाची नावे समोर येणार, कोणावर जबाबदारी निश्चित होणार आणि कोणावर कारवाईची टांगती तलवार येणार, याबाबत विविध तर्कवितर्क लावले जात आहेत.विशेष म्हणजे, चौकशीचा फास घट्ट होत असताना काही व्यवहारांची सखोल छाननी सुरू असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे अंतिम अहवालात आणखी काही धक्कादायक बाबी उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**अंतिम अहवालात काय दडले आहे?**

तपास पथकाचा अंतिम अहवाल समोर आल्यानंतर कथित गैरव्यवहाराचे स्वरूप, जबाबदार व्यक्ती, प्रशासनातील त्रुटी आणि शासनाला झालेल्या आर्थिक नुकसानीचे नेमके चित्र स्पष्ट होणार आहे. त्यामुळे केवळ मुर्तीजापूर नव्हे तर संपूर्ण अकोला आणि अमरावती जिल्ह्याचे लक्ष या अहवालाकडे लागले आहे.सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर अवलंबून असलेल्या हजारो गरीब कुटुंबांच्या हक्काच्या धान्याचा प्रश्न असल्याने दोषींना संरक्षण न देता कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. आता पाहायचे एवढेच की, अंतिम अहवालातून केवळ काही नावे पुढे येतात की संपूर्ण साखळीच उघडी पडते? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, हक्काच्या धान्यावर डल्ला मारणाऱ्यांपर्यंत कायद्याचा हात खरोखर पोहोचतो का?

**“ गायब डेटा नेमका कुणाच्या फायद्याचा?**

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे २०१९ ते २०२२ या कालावधीतील काही ई-पॉस नोंदी आणि वितरणाचा डेटा अद्याप पूर्णपणे उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. हा डेटा मिळाल्यानंतर चौकशीची व्याप्ती वाढू शकते, असे जाणकारांचे मत आहे. प्रश्न असा आहे की, इतक्या महत्त्वाच्या नोंदी उपलब्ध का नाहीत? तांत्रिक अडचण, निष्काळजीपणा की आणखी काही? याचे उत्तर चौकशीनंतरच स्पष्ट होणार आहे.

# आ. श्याम खोडे यांनी विदर्भ केसरी विजयराज शिंदे यांना घेतले दत्तक
### क्रीडा क्षेत्राला बळ देण्यासाठी अभिनव पुढाकार



■ प्रतिनिधी | वाशिम ■

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त वाशिम-मंगरूळपीर मतदारसंघाचे आमदार श्यामभाऊ खोडे यांनी क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देणारा अभिनव निर्णय घेत विदर्भातील सुप्रसिद्ध पैलवान तथा विदर्भ केसरी विजयराज शिंदे यांना दत्तक घेतल्याची घोषणा केली. वाशिम येथील जनसंपर्क कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात त्यांनी शिंदे यांचा सत्कार करून ११ हजार रुपयांची रोख मदत दिली. तसेच कुस्तीच्या मैदानात सक्रिय असेपर्यंत दरमहा आर्थिक सहाय्य करण्याचे आश्वासन दिले.

पैलवान बाळूभाऊ मुरकुटे, गजानन लांडगे व महादेवराव लाभांडे यांच्या मार्गदर्शनाखाली विजयराज शिंदे यांनी विविध कुस्ती स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. महाराष्ट्र चॅम्पियन, विदर्भ केसरी अचलपूर तसेच तीन वेळा नागपूर केसरी हा मानाचा किताब त्यांनी पटकावला आहे. गेल्या दहा वर्षांपासून ते कुस्ती क्षेत्रात सातत्याने चमकदार कामगिरी करत आहेत.

यावेळी बोलताना आ. खोडे यांनी कुस्ती हा भारतीय संस्कृतीशी जोडलेला स्वदेशी खेळ असून युवकांना क्रीडा क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. यापूर्वीही त्यांनी शिक्षण क्षेत्रातील गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात दिला आहे.

# एससी उपवर्गीकरणाविरोधात विशाल जनआक्रोश मोर्चाची तयारी
### उद्या वाशिम येथे नियोजन बैठक

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती (एससी) उपवर्गीकरणासंदर्भात दिलेल्या निर्णयाच्या निषेधार्थ तसेच शासनाने नियुक्त केलेल्या एक सदस्यीय समितीविरोधात जिल्हाभरातील आंबेडकरी समाजाच्या वतीने विशाल जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्याची तयारी सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर मोर्चाच्या नियोजनासाठी ४ जून रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

संयोजक विशाल पडघान यांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्वोच्च न्यायालयाचा एससी उपवर्गीकरणाबाबतचा निर्णय संविधानविरोधी असल्याचा आरोप करण्यात येत असून, या निर्णयाविरोधात तसेच शासनाच्या भूमिकेचा निषेध करण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यातील आंबेडकरी संघटना व समाजबांधवांनी एकत्र येऊन व्यापक जनआंदोलन उभारण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. यासाठी आयोजित करण्यात आलेल्या विशाल जनआक्रोश मोर्चात सर्व समाजघटकांचा सहभाग वाढावा, मोर्चाचे स्वरूप आणि पुढील दिशा निश्चित करण्यासाठी दि.४ जून रोजी दुपारी १.३० वाजता शासकीय विश्रामगृह, वाशिम येथे बैठक होणार आहे. या बैठकीस जिल्ह्यातील सर्व आंबेडकरी संघटना, पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजक विशाल पडघान यांनी केले आहे.

# पावसाळ्यापूर्वी अनसिंग परिसरातील धोकादायक वीज यंत्रणा तातडीने दुरुस्त करण्याची मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अनसिंग गावासह परिसरातील ग्रामीण भागातील विद्युत यंत्रणेची तातडीने दुरुस्ती, देखभाल व सुरक्षा उपाययोजना करण्यात याव्यात, अन्यथा नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, असा इशारा देत सामाजिक कार्यकर्ते यश सतीश चव्हाण यांनी महावितरणच्या सहाय्यक अभियंत्यांना दिनांक ०२ जून रोजी सविस्तर निवेदन सादर केले. अनसिंग व परिसरात दरवर्षी पावसाळा सुरू होताच वीज पुरवठ्याशी संबंधित विविध समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण होतात. अनेक ठिकाणी वीज खांबांना करंट येणे, तुटलेल्या व जीर्ण झालेल्या विद्युत तारा, झाडांच्या फांद्या तारांवर पडणे, तसेच थोडासा पाऊस किंवा वादळी वारा आला तरी तासन्तास वीज पुरवठा खंडित होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. महावितरणकडून वेळेवर देखभाल व दुरुस्ती न झाल्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अनसिंग गावातील अनेक



वीज खांब, डीपी आणि विद्युत तारा सध्या जीर्ण अवस्थेत असून काही ठिकाणी वीज खांबांना करंट येत असल्याच्या घटनाही घडल्या आहेत. पावसाळ्यात अशा प्रकारच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, लहान मुले तसेच जनावरांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी घेणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.अनसिंग परिसरातील अनेक भागांमध्ये हलका पाऊस किंवा वादळी वारा आला तरी वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असून शेतकऱ्यांच्या कृषी पंपांचा वीज पुरवठा विस्कळीत होतो. व्यापारी व व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान होत आहे. अनेक ठिकाणी तुटलेल्या, सैल झालेल्या तारांमुळे, खराब इन्सुलेटरमुळे आणि झुकलेल्या खांबांमुळे वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.पावसाळ्यापूर्वी महावितरणने विशेष मोहीम राबवून संपूर्ण विद्युत यंत्रणेची सखोल तपासणी करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यामध्ये सर्व वीज खांबांची तपासणी करून खांबांना करंट येत असल्यास तात्काळ उपाययोजना करणे, तुटलेल्या व जीर्ण तारांची दुरुस्ती करून आवश्यकतेनुसार नवीन तारा बसविणे, झुकलेले व धोकादायक खांब बदलणे, डीपी व ट्रान्सफॉर्मरची अर्थिंग तपासून दोष दूर करणे, तसेच विद्युत तारांना स्पर्श करणाऱ्या झाडांच्या फांद्यांची तातडीने छाटणी करणे यांचा समावेश आहे.

# हेल्पलाइन १९६२ व चॅटबॉटद्वारे पशुवैद्यकीय सेवांचे सक्षमीकरण



■ प्रतिनिधी | वाशिम ■

गेल्या पाच वर्षांत, भारत फायनान्शियल इंक्लुजन लिमिटेड, इंडसइंड बँक व पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या १९६२ या टोल-फ्री हेल्पलाइनने राज्यातील पशुवैद्यकीय सेवांचे जाळे बळकट केले आहे. 'मोबाईल व्हेटर्नरी युनिट्स' म्हणजेच फिरत्या पशुवैद्यकीय वाहनांच्या माध्यमातून या उपक्रमाने विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील शेतकऱ्यांना त्यांच्या दारात पशुवैद्यकीय आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली आहे. आतापर्यंत ८ लाखांहून अधिक जनावरांवर उपचार करण्यात आले असून, यामुळे पशुधनाची वेळेवर, सुलभ व विश्वासार्ह काळजी घेणे शक्य झाले आहे.

या उपक्रमाच्या यशानंतर, भारत फायनान्शियल इंक्लुजन लिमिटेड (इंडसइंड बँक) व पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सेवा अधिक गतिमान करण्यासाठी 'व्हॉट्सॲ प-आधारित चॅटबॉट सेवा' सुरू केली आहे. या डिजिटल उपक्रमाचा उद्देश संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांना सेवा मिळवणे सोपे करणे, संवाद सुलभ करणे व रिअल-टाइम (तात्काळ) पशुवैद्यकीय साहाय्य प्रदान करणे हा आहे.

व्हॉट्सॲप चॅटबॉट सेवा शेतकरी ९०६३१४२२९९ या क्रमांकावर संदेश (मेसेज) पाठवून किंवा निश्चित केलेला क्यूआर (क्युआर) कोड स्कॅन करून या चॅटबॉट सेवेचा लाभ घेऊ शकतात. शेतकऱ्यांना त्यांच्या घरातूनच, व्हॉट्सॲपच्या सोप्या व वापरण्यास सुलभ इंटरफेसचा वापर करून जलद व सोयीस्कर पशुवैद्यकीय सल्ला आणि सेवा मिळाव्यात, अशा पद्धतीने हा चॅटबॉट डिझाइन करण्यात आला आहे.

हे कसे काम करते?

शेतकरी ९०६३१४२२९९ या क्रमांकावर व्हॉट्सॲपवर 'Hi' पाठवून खालील सेवा मिळवू शकतातः पशुधनाचे आजार, उपचार आणि लसीकरणाबाबत माहिती मिळवणे. पशुसंवर्धन आणि सरकारी योजनांची सविस्तर माहिती मिळवणे. खालील माध्यमांद्वारे पशुवैद्यकीय डॉक्टरांशी संपर्क साधणे : द चॅट (Chat) द ऑडिओ कन्सल्टेशन (व्हॉईस कॉल सल्ला) द व्हिडिओ कन्सल्टेशन / टेलिकन्सल्टेशन (व्हिडिओ कॉल सल्ला)

प्रमुख वैशिष्ट्ये : पशुवैद्यकीय टेलिकन्सल्टेशन (दूरस्थ सल्ला) सेवा, ऑडिओ व व्हिडिओ कॉलद्वारे सल्ल्याची सोय, पशुवैद्यकीय डॉक्टरांशी थेट संवाद, रुग्णालय व पशुवैद्यकीय सेवा डिरेक्टरीची (मार्गदर्शिका) उपलब्धता, सरकारी योजनांची माहिती, वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) प्रागतिक माहिती (ऑक्टोबर २०२५ ते मे २०२६) ६१५ शेतकऱ्यांनी चॅटबॉटचा वापर करून संवाद साधला आहे.

# सफाई कामगारांवर उपासमारीची वेळ
## वंचितचा नगर परिषदेला अल्टिमेटम



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम शहर स्वच्छ ठेवणाऱ्या सफाई कामगार व कचरा संकलन करणाऱ्या ट्रॅक्टर चालकांना दर महिन्याला नियमित वेतन मिळत नसल्याने त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेश सदस्या सौ. किरणाताई गिऱ्हे यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद वाशिम यांना निवेदन दिले आहे, निवेदनात म्हटले आहे की, शहरातील कचरा संकलन व सफाईची कामे इमाने इतबारे करणाऱ्या या कामगारांच्या पगारावरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. मात्र महिनोन्महिने पगार थकल्याने त्यांचे हाल होत आहेत. त्यामुळे दर महिन्याच्या १ तारखेला या सर्व कामगारांचे वेतन नियमितपणे अदा करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. मागणी मान्य न झाल्यास नगर परिषद कार्यालयासमोर लोकशाही पद्धतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सौ. गिऱ्हे यांनी दिला आहे, वंचितच्या या आक्रमक पवित्र्यामुळे नगर परिषद प्रशासनाच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.यावेळी वंचित बहुजन आघाडी सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अभिषेक सपकाळ, स्वप्निल खांदळे,आकाश पंडित, अक्षय सपकाळ,आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# मान्सूनपूर्व नाल्यांची सफाई करण्याची मागणी

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील शेलूबाजार येथील मुख्य चौकातून अडाण नदीकडे जाणारे नाले सध्या गाळ व केरकचऱ्याने तुडुंब भरले आहेत. पावसाळा तोंडावर आला असताना या नाल्यांची तातडीने सफाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी व्यापारी आणि नागरिकांकडून होत आहे.



नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे पावसाचे पाणी सुरळीत वाहून न जाता थेट रस्त्यावरून वाहते. परिणामी, चौकातील अनेक दुकाने व व्यावसायिक आस्थापनांमध्ये पाणी शिरून व्यापाऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागते. दरवर्षी अतिवृष्टीच्या काळात शेलूबाजार चौक जलमय होत असून, बँका, किरकोळ दुकाने तसेच इतर व्यावसायिक आस्थापनांमध्ये पावसाचे पाणी घुसते. त्यामुळे व्यापाऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. तसेच रस्त्यांवर पाणी साचल्यामुळे नागरिकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. नाले ओव्हरफ्लो झाल्यानंतर गुरुदेव नगर परिसरातील घरांमध्येही पाणी शिरते. त्यामुळे रात्री-अपरात्री नागरिकांना लहान मुलांसह घरातील साहित्य सुरक्षित करण्यासाठी मोठी धावपळ करावी लागते. अनेकदा भीतीच्या वातावरणात रात्र जागून काढावी लागते. स्थानिक प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन पावसाळ्यापूर्वी सर्व नाल्यांची व्यापक सफाई मोहीम हाती घ्यावी. तसेच भविष्यात पाणी तुंबण्याची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी व्यापारी व नागरिकांनी केली आहे.

# कारंजा आगाराच्या ताफ्यात ई-बसेस दाखल
### आ. सई डहाके यांच्या हस्ते लोकार्पण; प्रवाशांना आधुनिक, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक प्रवासाची नवी भेट

■ प्रतिनिधी | कारंजा ■

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कारंजा आगाराच्या इतिहासात आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला असून आगाराच्या ताफ्यात पाच नवीन इलेक्ट्रिक (ई-बस) बसेस दाखल झाल्या आहेत. या अत्याधुनिक व पर्यावरणपूरक बसेसचे लोकार्पण सोमवारी दि. २ जून स्थानिक बसस्थानक परिसरात आमदार सईताई डहाके यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली इंधन बचत, पर्यावरण संवर्धन आणि ऊर्जा स्वावलंबनाला चालना देण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन दिले जात आहे. त्याचबरोबर राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हरित आणि आधुनिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उभारण्यावर भर देण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आमदार सईताई डहाके यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे कारंजा आगाराला या पाच नवीन ई-बस उपलब्ध झाल्या असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

लोकार्पण सोहळ्यात आमदार डहाके यांनी विधिवत पूजन करून बसेस जनतेच्या सेवेत समर्पित केल्या. यावेळी माजी नगराध्यक्ष दत्तराज डहाके यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आगार प्रमुख हेमंत चांदूरकर यांनी केले. त्यांनी नवीन ई-बसमध्ये प्रवाशांना शासन व महामंडळाकडून दिल्या जाणाऱ्या सर्व सवलती लागू राहतील, अशी माहिती दिली.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन लिपिक संदीप ठाकरे यांनी केले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, नगरसेवक-नगरसेविका, भाजप कार्यकर्ते, आजी-माजी लोकप्रतिनिधी, विविध आघाड्या व सेलचे पदाधिकारी, एसटी महामंडळाचे अधिकारी-कर्मचारी, मोर्या ट्रान्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे अधिकारी, प्रवासी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या नवीन बसेसच्या समावेशामुळे कारंजा आगाराच्या ताफ्यातील एकूण बससंख्या ३८ वरून ४३ झाली आहे. यामुळे आगाराची वाहतूक क्षमता वाढणार असून प्रवाशांना अधिक चांगली सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नवीन ई-बस कारंजा – शेगाव, बुलडाणा, नागपूर, नांदेड आणि परतवाडा या महत्त्वाच्या मार्गांवर धावणार आहेत. त्यामुळे या मार्गांवरील प्रवाशांना अधिक आरामदायी, शांत आणि आधुनिक प्रवासाचा अनुभव मिळणार असून वेळेची बचत आणि सेवा गुणवत्ता सुधारण्यास मदत होणार आहे.

लोकार्पण सोहळ्यानंतर आमदार सईताई डहाके यांनी नवीन ई-बसमधून प्रवास करत कारंजा आगार परिसरात उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक ई-बस चार्जिंग स्टेशनची पाहणी केली. यावेळी त्यांनी चार्जिंग सुविधेचे लोकार्पणही केले. या सुविधेमुळे इलेक्ट्रिक बसचे संचालन अधिक कार्यक्षम आणि सुलभ होणार आहे.

इलेक्ट्रिक बसेस या धूरविरहित व पर्यावरणपूरक असल्याने प्रदूषण कमी करण्यास मदत होणार आहे. तसेच डिझेलवरील खर्चात बचत होऊन सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक किफायतशीर बनणार आहे. यामुळे पर्यावरण संरक्षणासोबतच प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी आणि आधुनिक प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

कारंजा आगारात दाखल झालेल्या या पाच नवीन ई-बस केवळ वाहतुकीची सुविधा वाढविणाऱ्या नसून, हरित आणि आधुनिक महाराष्ट्राच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १८६ ■ बुधवार, ३ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# शटर फोडून लाखोंचा डल्ला मारणारे गजाआड

## ■ बिहारपर्यंत पाठलाग; एलसीबीच्या जाळ्यात सराईत चोरट्यांची टोळी

**वर्धा जनमाध्यम** : वर्धा शहरातील म्हाडा कॉलनी येथील शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये धाडसी चोरी करून पोलिसांना आव्हान देणाऱ्या सराईत चोरट्यांच्या टोळीला अखेर स्थानिक गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या. सीसीटीव्ही, सायबर तंत्रज्ञान, ठसे तज्ज्ञांची मदत आणि बिहारपर्यंत केलेल्या पाठलागाच्या जोरावर पोलिसांनी या गुन्ह्याचा उलगडा करत ७ लाख १३ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. विशेष म्हणजे या टोळीत एका अल्पवयीन मुलाचाही समावेश असल्याचे तपासात समोर आले आहे.

फत्तेपुरीया ले-आऊट येथील व्यावसायिक संजय भगवान उदावंत यांनी रामनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. २५ मेच्या मध्यरात्री चोरट्यांनी म्हाडा शॉपिंग कॉम्प्लेक्समधील त्यांच्या दुकानाचे शटर तोडून सुमारे ९ किलो ३६० ग्रॅम चांदीचे दागिने आणि १६ ग्रॅम सोन्याचे दागिने लंपास केले होते. चोरीचा एकूण ऐवज ८ लाख ३० हजार रुपयांच्या घरात होता. एवढ्यावरच न थांबता चोरट्यांनी शेजारच्या आणखी दोन दुकानांमध्येही हात साफ करण्याचा प्रयत्न केला होता.



घटनेनंतर पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांनी प्रकरण गांभीर्याने घेत स्थानिक गुन्हे शाखेची चार विशेष पथके कामाला लावली. सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासातून आरोपींचा माग काढण्यात आला. तपासादरम्यान साहिल धीरज लांजेवार, अफरोज शमशाद अन्सारी, संघर्ष कैलास बागडे आणि एका अल्पवयीन मुलाचे नाव समोर आले.

नागपुरात छापा टाकून साहिल लांजेवारला ताब्यात घेतल्यानंतर त्याने साथीदारांसह चोरीची कबुली दिली. आरोपी दुचाकीवरून नागपूरहून वर्ध्यात आले होते. दरम्यान इतर आरोपी बिहारमध्ये पळाल्याची माहिती मिळाल्यानंतर एलसीबीच्या पथकाने तब्बल ४८ तास त्यांचा पाठलाग केला. आरोपी पुन्हा नागपुरात परतल्याचे समजताच यशोधरानगर परिसरात सापळा रचून त्यांना अटक करण्यात आली. आरोपींकडून चांदीच्या पैंजण, अंगठ्या, चेन, सोन्याचे दागिने व अन्य ऐवज असा ७ लाख १३ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे आरोपींवर यापूर्वीही चोरी व घरफोडीचे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. नागपूर शहर, ग्रामीण भाग तसेच इतर राज्यांमध्येही त्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याचे तपासात उघड झाले आहे.

पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विनोद चौधरी, सहाय्यक पोलिस निरीक्षक आशिषसिंग ठाकूर, योगेश लाडे, पोलिस उपनिरीक्षक विजयसिंग गोमलाडू, ओमप्रकाश नागपूरे व त्यांच्या पथकाने ही उल्लेखनीय कारवाई केली. वर्धा पोलिसांच्या या धडाकेबाज कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### सीसीटीव्ही ठरला 'साक्षीदार'; घरफोड्यांच्या मालिकेचा झाला शेवट

जिल्ह्यातील वाढत्या घरफोड्यांच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली भीती अखेर पोलिसांच्या धडाकेबाज कारवाईने कमी झाली आहे. स्थानिक गुन्हे शाखेने सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे सलग पाच घरफोड्यांचा पर्दाफाश करत दोन आरोपींना अटक केली. या कारवाईत तब्बल ४ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एक मुख्य आरोपी अद्याप फरार आहे. एप्रिल आणि मे महिन्यात सावंगी मेघे व वर्धा शहर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत घरफोड्यांच्या घटना घडल्या होत्या. या घटनांची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी विशेष तपासाचे आदेश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेची दोन पथके तयार करण्यात आली. सीसीटीव्ही फुटेजचे बारकाईने विश्लेषण आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पोचन्ना उर्फ घनश्याम देऊळकर व त्याचा साथीदार यशवंत रामा दांडेकर (१९) यांचा सहभाग उघड झाला. या प्रकरणात यशवंत दांडेकर आणि रविंद्र लोंढे यांना अटक करण्यात आली असून मुख्य आरोपी पोचन्ना उर्फ घनश्याम देऊळकरचा शोध सुरू आहे. अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही उल्लेखनीय कारवाई करण्यात आली.

## 'लक्ष्मी'च्या मोहात
## वर्धा नगरपालिकेत भ्रष्टाचाराचा 'इस्टिमेट' फेल!; दोन लाखांसह अभियंता जेरबंद



**वर्धा जनमाध्यम** : वर्धा नगरपालिकेतील भ्रष्टाचाराच्या कुजबुजीला अखेर मंगळवारी सायंकाळी ठोस पुराव्यांची जोड मिळाली. विकासकामांच्या नावाखाली 'लक्ष्मी दर्शन' घडवून आणण्याचा उद्योग करणारा बांधकाम विभागातील अभियंता संदीप डोईजळ हा तब्बल दोन लाख रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) जाळ्यात अडकला. या धडक कारवाईने नगरपालिका प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे.

प्रशासकीय राजवटीच्या काळात नगरपालिकेतील काही अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराच्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. त्यानंतर लोकप्रतिनिधी सत्तेवर आले, मात्र भ्रष्टाचाराची साखळी तुटली नसल्याचे या कारवाईने स्पष्ट झाले आहे. नागरिकांची कामे, विकासकामांची देयके आणि इस्टिमेट मंजुरीसाठी 'वजन' ठेवावे लागते, अशी ओरड सुरू असतानाच एसीबीने थेट कारवाई करून भ्रष्ट व्यवस्थेच्या चेहऱ्यावरचा मुखवटा फाडला आहे.

माहितीनुसार, एका विकासकामाच्या देयकाचे इस्टिमेट तयार करण्यासाठी डोईजळ यांनी संबंधित ठेकेदाराकडे दोन लाख रुपयांची मागणी केली होती. ठेकेदाराने लाच देण्याऐवजी एसीबीकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची शहानिशा केल्यानंतर एसीबीच्या पथकाने सापळा रचला. मंगळवारी सायंकाळी नागपूरहून आलेल्या अधिकाऱ्यांनी वर्धा नगरपालिका परिसरात कारवाई केली. डोईजळ यांनी लाचेची रक्कम स्वीकारताच एसीबीच्या अधिकाऱ्यांनी त्यांना रंगेहाथ पकडले.

या कारवाईनंतर नगरपालिकेतील इतर संशयास्पद व्यवहारांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. एकच मासा जाळ्यात सापडला की संपूर्ण तळेच गढूळ आहे, अशी चर्चा आता शहरात रंगू लागली आहे. एसीबीच्या कारवाईने भ्रष्ट अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले असून, नगरपालिकेतील इतर प्रकरणांचीदेखील चौकशी व्हावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## वर्दीमागील माणुसकी जपण्याचा संदेश; ठाणेदार मनोज गभणे यांना भावपूर्ण निरोप

**सेलू जनमाध्यम** : सेलू पोलीस ठाण्याचे ठाणेदार मनोज गभणे यांची नागपूर येथे बदली झाल्याने पोलीस कर्मचारी व पोलीस पाटील संघटनेच्या वतीने त्यांचा भावपूर्ण निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. गभणे यांच्या जागी सावंगी (मेघे) पोलीस ठाण्यातील पंकज वाघाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

समारंभाला ठाणेदार मनोज गभणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण महाजन, पोलीस उपनिरीक्षक प्रितम निमगडे, कर्मचारी विक्रम काळमेघ यांच्यासह पोलीस कर्मचारी, पोलीस पाटील, पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना मनोज गभणे म्हणाले, 'पोलीस म्हणून काम करताना अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. मात्र वर्दीच्या आत आपणही एक संवेदनशील माणूस आहोत,



याचे भान कायम ठेवणे तितकेच महत्त्वाचे आहे.' त्यांच्या या विचारांना उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. प्रसंगी किरण महाजन, प्रितम निमगडे, विक्रम काळमेघ व पत्रकार संजय धोंगडे यांनी मनोगत व्यक्त करत गभणे यांच्या कार्यशैलीचे कौतुक केले. तसेच स्थानांतरित सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण महाजन, कर्मचारी विक्रम काळमेघ, सुजाता ताकसांडे व नंदा डबले यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस पाटील कोल्हे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रकाश खंडाळे यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रम भावनिक वातावरणात पार पडला.

## केळझरमध्ये भरदिवसा चोरीचा प्रयत्न; बंद घरावर चोरट्यांचा डल्ला

**सेलू जनमाध्यम** : तालुक्यातील केळझर येथे भरदिवसा अज्ञात चोरट्यांनी बंद घरावर डल्ला मारत चोरीचा प्रयत्न केल्याची घटना सोमवारी (दि. १ जून) उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, योगेश शामराव कांबळे व त्यांची आई रत्नामाला कांबळे हे २८ मे रोजी पुणे येथे मुलाकडे गेले होते. घर बंद असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी सोमवारी दुपारी घरात प्रवेश केला. दरम्यान, परिसरातील काही नागरिकांना दोन संशयित



व्यक्ती घराच्या भिंतीवरून उडी मारून पळून जाताना दिसल्या. यामुळे चोरी झाल्याची शंका व्यक्त करण्यात आली. घटनेची माहिती नागपूर येथे असलेल्या समेक कांबळे यांना देण्यात आली. ते तातडीने घरी पोहोचल्यानंतर चोरीचा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर सेलू पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे. अलिकडच्या काळात बंद घरे हेरून भरदिवसा चोरी करण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज व्यक्त होत आहे.

## अप्पर वर्धा धरणात छिन्नविछिन्न मृतदेह; हत्या करून पुरावे लपविण्याचा संशय

**आष्टी शहीद जनमाध्यम** : आष्टी तालुक्यातील अप्पर वर्धा धरण परिसरात एका अज्ञात इसमाचा छिन्नविछिन्न अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. धरणाच्या प्रवेशद्वाराजवळील मत्स्यबीज प्रक्रिया केंद्र परिसरातील झुडपांमध्ये हा मृतदेह आढळून आला. मृतदेहाची अवस्था अत्यंत विदारक असून धड आणि मुंडके वेगळे झाल्याने ही घटना अपघात नसून हत्येची असावी, असा प्राथमिक संशय व्यक्त होत आहे.

परिसरात दुर्गंधी येत असल्याची माहिती स्थानिकांनी दिल्यानंतर शोधमोहीम राबविण्यात आली. त्यावेळी कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला. मृतदेह मोठ्या प्रमाणात विघटित झाल्याने ओळख पटविणे कठीण झाले आहे. घटनास्थळी तुटलेल्या चपला आढळल्या असून मृताच्या अंगावरील कपडे तुलनेने नवीन असल्याचे दिसून आले.

प्राथमिक अंदाजानुसार मृत्यूला सुमारे महिनाभराचा कालावधी लोटला असावा. घटनास्थळावरील खुणांवरून मृतदेह धरणातून बाहेर काढून काही अंतर ओढत नेल्याचे दिसत असल्याने अन्यत्र हत्या करून पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह येथे आणून टाकण्यात आल्याचा संशय बळावत आहे.

ठाणेदार राजेश जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी पंचनामा करून तपास सुरू केला आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून मृताची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या घटनेमुळे अप्पर वर्धा धरण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### आई'ची जंगलातली झेप

## खड्ड्यात अडकलेल्या दोन बिबट पिलांना मादीने मृत्यूच्या दाढेतून खेचले बाहेर

**आष्टी शहीद जनमाध्यम** : मातृत्वाची ताकद किती विलक्षण असते, याचा प्रत्यय आष्टी तालुक्यातील सुसुंद्रा शेतशिवारात आला. खोल खड्ड्यात अडकलेल्या आपल्या दोन पिलांसाठी एका मादी बिबट्याने जीवाची पर्वा न करता थेट खड्ड्यात उडी घेत दोन्ही पिलांची सुखरूप सुटका केली. हा थरारक प्रसंग वनविभागाने लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून परिसरात या घटनेची जोरदार चर्चा रंगली आहे.

तळेगाव (शा.पं.) वनपरिक्षेत्रातील सुसुंद्रा परिसरात कारंजा (घा.) – साहूर मार्गावरील कालव्याच्या कामामुळे तयार झालेल्या खोल खड्ड्याजवळ ही घटना घडली. वनविभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार, मादी बिबट्याने आपल्या दोन पिलांना रस्त्यालगतच्या एका पाइपमध्ये सुरक्षित ठेवून शिकारीसाठी जंगलात धाव घेतली



होती. मात्र खेळता-खेळता दोन्ही पिले जवळील खड्ड्यात पडली आणि बाहेर पडू शकली नाहीत.

१ जून रोजी दुपारी शेतकऱ्यांना पिलांच्या आर्त ओरडण्याचा आवाज ऐकू आला. शोध घेतल्यानंतर खड्ड्यात दोन बिबट पिले अडकलेली दिसली. माहिती मिळताच वनविभाग, पोलीस पाटील आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पिलांना इजा न होता त्यांची सुटका व्हावी यासाठी वनविभागाने अत्यंत संयमाने पावले उचलली. परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले तसेच मानवी हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात आले. रात्री उशिरा मादी बिबट घटनास्थळी पोहोचली. काही काळ परिसराची पाहणी केल्यानंतर तिने थेट खड्ड्यात उडी घेतली. एकामागून एक दोन्ही पिलांना तोंडात धरून तिने सुरक्षित बाहेर काढले आणि पिलांसह जंगलाच्या दिशेने निघून गेली. वनविभागाच्या नियोजनबद्ध भूमिकेमुळे कोणतीही जीवितहानी टळली. जंगलातील या हृदयस्पर्शी घटनेने 'आई'च्या मायेची आणि वन्यजीवांच्या संवेदनशील नात्याची जिवंत झलक पाहायला मिळाली. परिसरातील नागरिकांनीही या घटनेचे कौतुक करत वनविभागाच्या तत्परतेचे अभिनंदन केले आहे.

## महागाईच्या नावाखाली काँग्रेसचा राजकीय तमाशा

### मोर्च्यातच उघडी पडली गटबाजी, युवकांची उपस्थितीही फुसकी

**वर्धा जनमाध्यम** : नीट पेपरफुटी, वाढती महागाई, पेट्रोल-डिझेलच्या गगनाला भिडलेल्या किंमती आणि खतांच्या दरवाढीच्या निषेधार्थ युवक काँग्रेसने मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढत सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. मात्र आंदोलनापेक्षा मोर्चातील कमी उपस्थिती आणि काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजीचीच चर्चा अधिक रंगली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून निघालेल्या मोर्चाने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांविरोधात संताप व्यक्त केला. नीट पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात ढकलले गेले असून शिक्षणमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. तसेच महागाईमुळे सर्वसामान्य नागरिक आणि शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचा आरोपही करण्यात आला. मात्र काँग्रेस पक्षाच्या नावाने आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात अनेक प्रमुख पदाधिकारी, माजी पदाधिकारी आणि विविध गटांशी संबंधित कार्यकर्ते अनुपस्थित असल्याचे दिसून आले. त्यामुळे हा मोर्चा संपूर्ण काँग्रेसचा होता की एखाद्या विशिष्ट गटाचे शक्तिप्रदर्शन, असा प्रश्न राजकीय वर्तुळात उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे युवक काँग्रेसच्या आंदोलनात अपेक्षित प्रमाणात युवकांची उपस्थिती नसल्यानेही अनेकांच्या भुवया उंचावल्या. महागाई, बेरोजगारी आणि शेतकरी प्रश्नांवर सातत्याने संघर्ष करण्याऐवजी प्रसंगानुरूप आंदोलन करून काँग्रेस जनतेत संदेश देण्याचा प्रयत्न करीत आहे का, अशी चर्चाही रंगली आहे. त्यामुळे हे आंदोलन खरोखरच जनतेच्या ज्वलंत प्रश्नांसाठी होते की आगामी राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर स्वतःची ताकद दाखविण्याचा प्रयत्न होता, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.




मोर्चाचे नेतृत्व काँग्रेस जिल्हाध्यक्ष सुनील कोल्हे व युवक काँग्रेसचे महासचिव राहुल सुरकर यांनी केले. आंदोलनात विपुल तडाम, अमोल उघडे, शुभम आरगुडे, अमित देशमुख, बाळकृष्ण माऊसकर, अमित चाफले, जय जगताप यांच्यासह काँग्रेस व युवक काँग्रेसचे पदाधिकारी सहभागी झाले होते. मात्र आंदोलनानंतर काँग्रेसमधील गटबाजी पुन्हा एकदा उघडपणे समोर आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

## इंदरमारी जंगलात अनोळखी मृतदेह; ओळख पटविण्यासाठी पोलिसांचे नागरिकांना आवाहन

**तळेगाव (शा.पं.) जनमाध्यम** : अमरावती-नागपूर राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या इंदरमारी जंगल परिसरात एका अनोळखी पुरुषाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलीस स्टेशन तळेगाव (शा.पं.) येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून मृताची ओळख पटविण्यासाठी पोलिसांकडून नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे.

माहितीनुसार, २८ मे २०२६ रोजी ओमेश्वर मडकुजी येडे (रा. किन्हाळा) हे त्यांच्या साथीदारांसह तेंदूपत्ता संकलनासाठी इंदरमारी जंगल परिसरात गेले होते. अमरावती-नागपूर महामार्गापासून सुमारे १०० ते १५० मीटर अंतरावर जंगलात उग्र दुर्गंधी येत असल्याने त्यांनी परिसराची पाहणी केली. त्यावेळी त्यांना एका अनोळखी पुरुषाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला. याबाबत त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली.

मृत इसमाचे वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे असून उंची सुमारे साडेपाच फूट आहे. शरीरयष्टी मध्यम, वर्ण सावळा तसेच केस काळे व पातळ आहेत. अंगात भुरकट रंगाची फाटलेली टी-शर्ट, फिकट हिरवट-निळी जीन्स पँट आणि विटकरी रंगाची अंडरवेअर होती. छातीच्या उजव्या बाजूस जय... असे अस्पष्ट गोंदलेले दिसून आले आहे. गळ्यात रंगीत धाग्यासह ताबीज, उजव्या मनगटावर दोरा आणि कमरेला लाल रंगाचा करदोळा असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या वर्णनाशी मिळती-जुळती व्यक्ती बेपत्ता असल्याची माहिती कोणाकडे असल्यास त्यांनी तळेगाव (शा.पं.) पोलिसांशी संपर्क साधून तपासात सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## तोतया पोलिसांचा गंडा; शाळा संचालकाच्या सोन्याच्या अंगठ्या लंपास

**वर्धा** : शहरातील एक्सिस बँक परिसरात १ जून रोजी तोतया पोलिसांनी एका शाळा संचालकाला गंडा घालत ४८ हजार रुपये किमतीच्या दोन सोन्याच्या अंगठ्या लंपास केल्या. याप्रकरणी माधव शिवराम पंडीत (रा. दुर्गा टॉकीजजवळ, वर्धा) यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

दुचाकीवर आलेल्या दोघांनी पोलिस असल्याची बतावणी करून विश्वास संपादन केला व हातचलाखीने अंगठ्या चोरून नेल्या. घटनेनंतर पोलिसांनी गुन्हा नोंदवून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरू केला आहे.

## हरित वर्धासाठी ४,५०० वृक्षांचा संकल्प

**वर्धा जनमाध्यम** : आगामी पावसाळ्यात वर्धा शहराला हरित स्वरूप देण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनाला चालना देण्यासाठी विविध सामाजिक संस्था, पर्यावरणप्रेमी आणि नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य वृक्षारोपण व जलसंधारण मोहिमेचे नियोजन करण्यात आले आहे. यासंदर्भात नगर परिषदेत आयोजित विशेष बैठकीत व्यापक कृती आराखड्यावर चर्चा करण्यात आली.

बैठकीत शहरातील प्रमुख रस्ते, शाळा-महाविद्यालये, शासकीय कार्यालये, स्मशानभूमी तसेच नागरी वस्त्यांमध्ये ४,५०० हून अधिक वृक्षांची लागवड करण्याचा निर्धार करण्यात आला. चिंच, आवळा, जांभूळ, वड, कडुनिंब, करंज, बहावा, गुलमोहर, बेल, शेवगा, पळस आदी स्थानिक वातावरणाशी सुसंगत वृक्षप्रजातींची निवड करण्यात आली. तसेच रस्त्यालगतच्या परिसरात कांचन, टेकोमा, चाफा, जरुल यांसारख्या शोभिवंत वृक्षांची लागवड करण्याचेही ठरले. केवळ वृक्षारोपण न करता त्यांचे संगोपन आणि संरक्षण यावर विशेष भर देण्यात आला. प्रत्येक रोपाला ट्री-गार्ड बसविणे, 'वृक्ष दत्तक योजना' राबविणे आणि नागरिकांच्या सहभागातून झाडांचे संवर्धन करण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय मियावाकी पद्धतीने घनदाट जंगल उभारण्याबाबतही चर्चा झाली.५ जूनच्या जागतिक पर्यावरण दिनापासून ऑक्सिजन पार्क, आयटीआय टेकडी आणि शहरातील विविध ठिकाणी या मोहिमेचा शुभारंभ होणार आहे. यासोबतच 'जलयोद्धा मित्र परिवार'च्या माध्यमातून वॉटर हार्वेस्टिंग, भूजल पुनर्भरण आणि पाणी बचतीबाबत जनजागृती अभियान राबविले जाणार आहे.

**कोर्ट विद्यमान श्री. योगेश शिंदे, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट यांचे न्यायालय**

आपणास याव्दारे सुचीत करण्यांत येते की, अर्जदार शेख नाजिम शेख करीम, रा. सेन्ट्रल वार्ड हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा. यांनी कलम १३ (३) अन्वये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अंतर्गत अर्जदार यांचा जन्म हिंगणघाट येथील असून अर्जदार नामे शेख नाजिम शेख करीम यांची जन्म तारीख ०१/०८/१९८६ ची नोंद नगरपरिषद कार्यालय हिंगणघाट यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तीकेमध्ध घेण्याचा आदेश होण्याबाबत अर्ज / प्रकरण सादर केलेला आहे.

वर नमुद जन्म नोंदणीबाबत हितसंबधीत व्यक्तीचे आक्षेप / हरकती असल्यास ते त्यांनी स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी मार्फत पुराव्यासह कार्यालयीन वेळेत जाहीरनामा प्रसिध्दी दिनांकाचे ८ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावे. उशिरा प्राप्त होणारे किंवा पुरावे नसणारे आक्षेप / हरकती ग्राहय धरल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण :-
दिनांक :-१४/०५/२०२६

**(योगेश शिंदे)**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट**

**कॉर्ट विद्यमान श्री. योगेश शिंदे, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट यांचे न्यायालय**

आपणास याव्दारे सुचीत करण्यांत येते की, अर्जदार शेख कदीर शेख करीम, रा. सेन्ट्रल वार्ड हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा. यांनी कलम १३(३) अन्वये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अंतर्गत अर्जदार यांचा जन्म हिंगणघाट येथील असून अर्जदार नामे शेख कदीर शेख करीम यांची जन्म तारीख ०३/०६/१९७० ची नोंद नगरपरिषद कार्यालय हिंगणघाट यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तीकेमध्ये घेण्याचा आदेश होण्याबाबत अर्ज/ प्रकरण सादर केलेला आहे.

वर नमुद जन्म नोंदणीबाबत हितसंबधीत व्यक्तीचे आक्षेप / हरकती असल्यास ते त्यांनी स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी मार्फत पुराव्यासह कार्यालयीन वेळेत जाहीरनामा प्रसिध्दी दिनांकाचे ८ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावे. उशिरा प्राप्त होणारे किंवा पुरावे नसणारे आक्षेप / हरकती ग्राहय धरल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण
दिनांक :-१४/०५/२०१४

**(योगेश शिंदे)**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल स्थिती

## पुढील ४८ तासांत केरळमध्ये तर महाराष्ट्रात मान्सूनपूर्व पावसाचा इशारा

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय हवामान विभागाने दिलेल्या ताज्या अंदाजानुसार, नैऋत्य मोसमी वारे अर्थात मान्सूनच्या पुढील ४८ तासांत केरळमध्ये आगमनासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. दक्षिण अरबी समुद्र आणि लगतच्या भागात मान्सूनची प्रगती सुरू असून, येत्या दोन ते तीन दिवसांत तो केरळमध्ये अधिकृतपणे धडकण्याची दाट शक्यता आहे. केरळमध्ये मान्सून दाखल झाल्यानंतर साधारणपणे दहा ते बारा दिवसांच्या कालावधीत तो महाराष्ट्रात पोहोचतो. त्यानुसार, जून महिन्याच्या दुस-या आठवड्यात म्हणजेच १० ते ११ जून दरम्यान मान्सून महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर आगमन करेल असा प्राथमिक अंदाज हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन होण्यापूर्वीच राज्यात मान्सूनपूर्व पावसाची हालचाल दिसून येत आहे. सध्या राज्याच्या विविध भागांत, विशेषत? विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वा-यासह



पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचा इशारा दिला असून, काही ठिकाणी सोसाट्याच्या वा-याचा वेग ताशी ४० ते ६० किलोमीटरपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. या पावसामुळे तापमानात २ ते ४ अंशांची घट होण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उत्तर आणि मध्य भारतासह महाराष्ट्रातही आगामी आठवड्यात पावसाचा जोर वाढू शकतो. ३ आणि ४ जून रोजी राज्यातील विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत पावसाची तीव्रता अधिक असू शकते. अनेक ठिकाणी वादळी वा-यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मान्सूनच्या या प्रवासात कोणतेही मोठे अडथळे नसल्यास तो वेळेवर राज्यात दाखल होईल, असा विश्वास हवामान अभ्यासकांकडून व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर शेतक-यांनी आपल्या शेतीची कामे पावसाचा अंदाज घेउनच नियोजित करावीत आणि काढणीस आलेल्या पिकांची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## परशुराम, वीर शिरोमणी महाराणा प्रताप, श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळांसाठी पदनिर्मिती

**मुंबई/प्रतिनिधी :**परशुराम आर्थिक विकास महामंडळ, वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ आणि श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळासाठी विविध पदांची निर्मित करण्यास मंत्रिमंडळ बैठकीस मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या महामंडळांतर्गत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा व गट कर्ज व्याज परतावा योजना राबवल्या जातात. महामंडळाच्या योजना जास्तीत जास्त गरजूंपर्यंत पोहचाव्यात तसेच कामकाज प्रभावीपणे चालावे यादृष्टीने या महामंडळांसाठी प्रत्येकी ४ नियमीत व ५ बाह्यस्त्रोताद्वारे भरावयाच्या पदांना मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये व्यवस्थापकीय संचालक, महाव्यवस्थापक, सहायक व्यवस्थापक-प्रशासन, सहायक व्यवस्थापक-वित्त व लेखा ही पदे प्रतिनियुक्ती भरली जाणार. तर मल्टी टास्किंग स्टाफची सेवा बाह्यस्त्रोतांद्वारे घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यासाठी या तीनही महामंडळांना वार्षिक अंदाजे रु.१.१८ कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्याचबरोबर ही महामंडळे स्थापन करण्यासंबंधीच्या २३ सप्टेंबर २०२४ च्या मंत्रिमंडळ निर्णयातील विषय क्रमांक ३३ मधील क्रमांक (२) प्रस्तावित महामंडळाला राज्य शासनाने रु. ५० कोटी भागभांडवलास मान्यता देण्यात यावी' यामध्ये 'हे महामंडळ कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ८ अंतर्गत शासकीय हमी असलेली व भागभांडवल नसलेली कंपनी असेल' असा बदल करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या महामंडळांना योजना राबविण्यासाठी व आवश्यक तो प्रशासकीय स्वरुपाचा खर्च भागविण्यासाठी शासनाकडून दरवर्षी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

## हैद्राबाद कॉलेजिएट समूह विद्यापीठामध्ये आणखी 5 महाविद्यालयांचा समावेश

**मुंबई/प्रतिनिधी :**मुंबईतील हैद्राबाद(सिंध) नॅशनल कालेजिएट समूह विद्यापीठामध्ये आणखी पाच महाविद्यालयांचा घटक म्हणून समावेश करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. हैद्राबाद(सिंध) नॅशनल कॉलेजिएट समूह विद्यापीठामध्ये प्रमुख महाविद्यालय म्हणून हसाराम रिजूमल वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय आणि घटक महाविद्यालये म्हणून किशनचंद चेलाराम, चर्चगेट, आणि बॉम्बे अध्यापक प्रशिक्षण महाविद्यालय, कुलाबा यांचा समावेश आहे. आता या समूह विद्यापीठात प्राचार्य के. एम. कुंदनानी औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय, कफ परेड, किशनचंद चेलाराम विधि महाविद्यालय, चर्चगेट आणि श्रीमती मिठीबाई मोतीराम कुंदनानी वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय,वांद्रे-पश्चिम, ऋषी दयाराम आणि सेठ हसराम नॅशनल आणि सेठ वासियामुल्लु असोमुल्लु विज्ञान महाविद्यालय, वांद्रे-पश्चिम आणि थडोमल शाहनी अभियांत्रिकी महाविद्यालय अशा पाच महाविद्यालयांचा समावेश होणार आहे.

## शेतक-यांच्या प्रश्नांवर काँग्रेस आक्रमक



**नांदेड : प्रतिनिधी-** शेतक-यांच्या प्रश्नांवर काँग्रेस पक्ष आक्रमक झाला आहे. सरकार आमच्या सारखं वागू नका अशा आशयाचे बॅनर चक्क गाढवाच्या पाठीवर लावून मुदखेड तहसील कार्यालयावर काँग्रेसने आक्रोश मोर्चा काढला.नांदेड जिल्ह्यातील हजारो शेतकरी अजूनही पीक विम्यापासून वंचित आहेत. या शेतक-यांना विमा मिळावा,वाढती महागाई, खत, बी-बियाण्यांचे वाढलेले दर, मशागतीसाठी डिझेलचा तुटवडा या मागण्यांसाठी मुदखेड तहसीलवर मंगळवारी काँग्रेसच्या वतीने शेतक-यांचा आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात सरकार आमच्या सारखं वागू नका अशा आशयाचे बॅनर गाढवाच्या अंगावर टाकण्यात आले होते. या गाढवांसहित तहसील कार्यालयावर मोर्चा काढून प्रशासनाने लक्ष वेधले. खा. रवींद्र चव्हाण यांची या मोर्चाला उपस्थित राहून भाजप सरकारवर हल्लाबोल केला. या मोर्चात प्रवक्ता बालाजी गाडे यांच्यासह अनेक पदाधिकारी, काँग्रेस कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## महिला कर्मचा-याकडे शरीरसुखाची मागणी

### सांगलीत एसटीतील वरिष्ठ लिपिकास चपलेने चोपले

**सांगली/प्रतिनिधी :** एसटीच्या विभागीय कार्यालयातील महिला कर्मचा-याकडे शरीरसुखाची मागणी करणा-या सांख्यिकी विभागातील वरिष्ठ लिपिक विनायक कदम (रा. विजयनगर) याला नातेवाइकांनी कार्यालयात चपलेने चोप देत बेदम मारहाण केली. एसटीच्या वर्धापनदिनाचा कार्यक्रम झाल्यानंतरच हा प्रकार घडला.



कदम याला चोप दिल्याचा व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाल्यामुळे राज्यभर खळबळ उडाली आहे. या प्रकारानंतर सांगली शहर पोलिसांनी कदम याला ताब्यात घेतले आहे. सायंकाळी उशिरा कदम याच्याविरुद्ध पीडित महिलेने गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांनी आणि पीडितेच्या नातेवाइकांनी दिलेली माहिती अशी, पीडित महिला एसटीच्या विभागीय कार्यालयात काम करते. संशयित वरिष्ठ लिपिक विनायक कदम हा सांख्यिकी विभागात वरिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत आहे. कदम हा पीडित महिलेकडे गेल्या अनेक दिवसांपासून वाकड्या नजरेने बघत होता. या प्रकारामुळे पीडित महिला घाबरली. वरिष्ठ अधिकारीच असा प्रकार करत असल्यामुळे तिने नातेवाइकांना हा प्रकार सांगितला. १६ मे २०२६ रोजी सकाळी ९.३० च्या सुमारास संशयित कदम हा पीडित महिलेजवळ गेला. तू मला आवडतेस, माझ्याबद्दल काय विचार करायचा ठरवले आहेस अशी विचारणा केली. तसेच पीडितेकडे शरीरसुखाची मागणी केली. या प्रकारामुळे पीडिता घाबरली. कदम याच्याविषयी पीडितेने तक्रार केली. परंतु त्याची दखल घेतली नाही. सोमवारी एसटीच्या वर्धापनदिनाचा कार्यक्रम विभागीय कार्यालयात होता. सर्व अधिकारी एकत्र जमले होते. कार्यक्रम संपल्यानंतर त्याला जाब विचारण्यासाठी पीडित महिलेचे नातेवाईक आले. त्यांनी कदमला घेउन चोप देण्यास सुरुवात केली. त्यामुळे कार्यालयात एकच गोंधळ उडाला. संतप्त नातेवाइकांनी त्याला शिव्यांची लाखोली वाहत चपलेचा देखील प्रसाद दिला. कदम याला बेदम चोप दिल्यानंतर कार्यालयातील इतर कर्मचा-यांनी संतप्त नातेवाइकांची कशीबशी समजूत काढून त्यांना आवरले. सांगली शहर पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी कार्यालयात येउन कदम याला ताब्यात घेतले. सायंकाळी पीडित महिलेने शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार कदम विरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे.

**विनायक कदम वादग्रस्त अधिकारी-** सांख्यिकी विभागातील काही कर्मचा-यांना कदम याने वेठीस धरले होते. वेगवेगळ्या कारणातून तो त्रास देत होता. तेथील महिलांच्या तक्रारी घेउन एसटी कामगार संघटनेने विभाग नियंत्रकांकडे तक्रार केली होती. परंतु त्यावर निर्णय घेतला नाही. पुन्हा एकदा हाताखालील सर्व कर्मचा-यांनी विभाग नियंत्रकांकडे तक्रार करून अन्य विभागात बदलीची मागणी केली होती. त्याकडेही दुर्लक्ष करण्यात आले.

**अधिका-यांनी दखल घेतली नाही-** वादग्रस्त अधिकारी विनायक कदम याच्याविरुद्ध प्रशासनाकडे तक्रार करण्यात आली होती. परंतु दोनवेळा तक्रार करूनही त्याची दखल घेतली नाही. त्यामुळे आम्ही येथे येउन कदम याला चोप दिला आहे, असे पीडितेच्या नातेवाइकांनी सांगितले.

## आदिवासी पारधी जमातीचे प्रलंबित प्रश्न सोडवणार-आदिवासी विकास मंत्री

**मुंबई** : आदिवासी पारधी जमातीचे विविध प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून, या समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबविण्यात येतील, अशी ग्वाही आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके यांनी दिली. आदिवासी पारधी महासंघाच्या प्रतिनिधींशी मंत्रालयात झालेल्या बैठकीत वुईके बोलत होते. यावेळी आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, दूरदृश्य प्रणालीद्वारे टीआरटीआयच्या आयुक्त मंजिरी मनोलकर, संबंधित वरिष्ठ अधिकारी तसेच समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते. मंत्री वुईके म्हणाले की, पारधी जमात ही समाजातील वंचित आणि उपेक्षित घटकांपैकी एक असून, या समाजाला शिक्षण, निवारा, जमीन, रोजगार, जातीचे प्रमाणपत्र आणि शासकीय योजनांचा लाभ मिळविताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या सर्व प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेउन टप्प्याटप्प्याने कार्यवाही केली जाईल. पारधी समाजातील कुटुंबांना शेतीसाठी जमीन उपलब्ध करून देणे, घरकुल योजनांचा लाभ मिळवून देणे, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक सुविधा निर्माण करणे, शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेश सुलभ करणे आणि विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

## ऊद्योगपती अनिल अग्रवाल यांच्या वेदांता ग्रुपवर ईडीचे छापे

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था-** वेदांता ग्रुपचे चेअरमन आणि प्रसिद्ध अब्जाधीश उद्योगपती अनिल अग्रवाल यांच्या विविध ठिकाणांवर अंमलबजावणी संचालनालयाने आज अचानक छापे टाकले आहेत. परकीय चलन व्यवस्थापन कायद्याच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी केंद्रीय यंत्रणेने ही धडक कारवाई सुरू केली आहे. सोमवारपासूनच ही शोधमोहीम सुरू असून अद्याप कंपनीकडून यावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.वेदांता ग्रुपने आपल्या व्यवसायाचे ६ स्वतंत्र कंपन्यांमध्ये विभाजन करण्याच्या योजनेला कर्जदारांकडून मंजुरी मिळवल्यानंतर महिनाभरातच ही मोठी कारवाई झाल्याने कार्पोरेट जगतात खळबळ उडाली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, वेदांता ग्रुपने आपल्या मूळ परदेशी कंपनीला केलेल्या रायल्टी पेमेंटच्या व्यवहारांशी हे छापे जोडलेले आहेत. परकीय चलन व्यवस्थापन कायद्याच्या नियमांचे उल्लंघन करून या रकमा परदेशात हस्तांतरित झाल्याचा संशय केंद्रीय यंत्रणेला आहे.भारताबाहेर होणा-या परकीय चलनाच्या व्यवहारांवर लक्ष ठेवणे हा फेमा कायद्याचा मुख्य उद्देश आहे. जेव्हा एखादी कंपनी किंवा व्यक्ती बेकायदेशीरपणे परदेशात पैसे पाठवते (हवाला), परदेशात अवैध संपत्ती जमा करते किंवा परकीय गुंतवणुकीच्या नियमांचे पालन करत नाही, तेव्हा ईडीकडून या कायद्यांतर्गत कडक कारवाई केली जाते. दरम्यान, या छाप्यांविषयी वेदांता समूहाकडून अद्याप कोणतेही अधिकृत वक्तव्य जारी करण्यात आलेले नाही. विशेष म्हणजे, ही कारवाई अशा वेळी झाली आहे जेव्हा वेदांता ग्रुप आपल्या इतिहासातील सर्वांत मोठ्या पुनर्रचनेच्या अंतिम टप्प्यात आहे. गेल्याच महिन्यात एका प्रसिद्ध वृत्तवाहिनीला दिलेल्या विशेष मुलाखतीत वेदांता ग्रुपचे चेअरमन अनिल अग्रवाल यांनी कंपनीच्या मोठ्या योजनेचा खुलासा केला होता.




# 114 हजार पुरूषांकडून पैसे वसूल होणार

**मुंबई / प्रतिनिधी-**लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी पडताळणीत तब्बल ८० लाख महिला अपात्र ठरल्यानंतर त्यांना आतापर्यंत देण्यात आलेली हजारो कोटी रुपयांची मदत परत घेतली जाणार का, असा प्रश्न उपस्थित झाला होता. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत सरकारची भूमिका स्पष्ट करत अपात्र ठरलेल्या महिलांकडून कोणतीही रक्कम वसूल केली जाणार नसल्याचे सांगितले. मात्र, योजनेचा गैरफायदा घेणा-या १४ हजार पुरुषांकडून संपूर्ण रक्कम परत घेतली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.




महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी जून २०२४ मध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेचा निवडणुकीत महायुतीला मोठा राजकीय लाभ झाल्याचे मानले जाते. सुरुवातीला सुमारे २.४७ कोटी महिलांना दरमहा दीड हजार रुपयांचे मानधन देण्यात येत होते. मात्र सत्तास्थापनेनंतर लाभार्थ्यांच्या पात्रतेची पडताळणी सुरू झाल्यानंतर अनेक महिलांची नावे यादीतून वगळण्यात आली. राज्य सरकारने सप्टेंबर २०२५ पासून लाभार्थ्यांसाठी ई-केवायसी अनिवार्य केली होती. ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी एप्रिल २०२६ पर्यंत अनेकदा मुदतवाढही देण्यात आली. मात्र, मुदत संपल्यानंतर मोठ्या प्रमाणात महिला या योजनेसाठी अपात्र ठरल्याचे समोर आले.

दरम्यान ८० लाखांचा आकडा केवळ ई-केवायसी न करणा-या महिलांचा नसल्याचे महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी स्पष्ट केले. त्यांच्या माहितीनुसार, त्यामध्ये ई-केवायसी अपूर्ण असलेल्या महिलांबरोबरच वार्षिक अडीच लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या सुमारे ११ ते १२ लाख महिला, ६५ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या साडेचार ते पाच लाख महिला, तसेच इतर निकषांमध्ये न बसणा-या लाभार्थ्यांचाही समावेश आहे.याशिवाय सुमारे १४ हजार सरकारी कर्मचारी महिलांची नावेही योजनेत आढळून आली आहेत. त्यांच्याकडून रकमेची वसुली सुरू असल्याचे तटकरे यांनी सांगितले. काही महिला लाडकी बहीण योजनेसह नमो शेतकरी योजना किंवा संजय गांधी निराधार योजनेचा दुहेरी लाभ घेत असल्याचेही पडताळणीत समोर आले आहे. अशा लाभार्थीना दोनपैकी एका योजनेचाच लाभ मिळणार आहे. तसेच जवळपास सव्वा तीन लाख लाभार्थ्यांकडे वाहन असल्याचेही आढळून आले आहे. दरम्यान, ई-केवायसी पूर्ण करूनही लाभापासून वंचित राहिलेल्या महिलांच्या प्रकरणांची फेरतपासणी सुरू असल्याची माहितीही तटकरे यांनी दिली.

**सरकारी कर्मचारी महिलांचाही समावेश**

लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात घटल्याने विरोधकांकडून सरकारवर वारंवार टीका करण्यात येत आहे. या पडताळणीत महिलांच्या नावाने अर्ज करून लाभ घेणारे १४ हजार पुरुष आढळून आल्याचे सांगितले. याशिवाय साधारण ५ लाख सरकारी कर्मचारी महिला, १० लाख प्राप्तिकर भरणा-या महिला आणि घरात चारचाकी वाहन असलेल्या ५ लाख महिला योजनेसाठी अपात्र असल्याचे सांगितले. तसेच ई-केवायसी सक्तीची करण्यात आल्यानंतरही अनेक लाभार्थीनी प्रक्रिया पूर्ण केली नाही. त्यामुळे पात्रतेच्या निकषांमध्ये न बसणा-या लाभार्थ्यांचे मानधन थांबविण्यात आले. केवायसी करताना त्रुटी झालेल्या साधारण २५ लाख महिलांना माहिती दुरुस्त करण्याची संधीही देण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी एका कार्यक्रमात बोलताना सांगितले.

**अपात्र महिलांना एकवेळची माफी**

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) यांच्याकडून योजनेचे लेखापरीक्षण होणार असून अपात्र लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या निधीबाबत प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता आहे. मात्र, पुरुष लाभार्थी वगळता अपात्र ठरलेल्या महिलांकडून यापूर्वी मिळालेली रक्कम वसूल केली जाणार नाही. त्यांना एकवेळची माफी देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

८० लाख अपात्र महिलांना सरकारी तिजोरीतून पैसे देउन मते विकत घेतली आहेत. अपात्र महिलांना सरकारी तिजोरीतून पैसे दिलेत, हे सिद्ध झाले आहे. कुणावर गुन्हा दाखल करणार? सरकारी तिजोरीतून अपहार झाल्याचा गुन्हा दाखल होणे गरजेचे आहे. मोदी युगात हे होणार असेल तर आम्ही त्याचे स्वागत करू असे खा.राऊत म्हणाले.

## लाडक्या बहिणींच्या खात्यात 6000 जमा होणार

**मुंबई :**राज्यातील काही पात्र लाडक्या बहिणींना मागील ४ महिन्यांपासून एकही हप्ता खात्यावर जमा झाला नाही. या लाडक्या बहि-णींच्या खात्यावर ६ हजार रुपये जमा होणार आहेत. फेब्रुवारी, मार्च, एप्रिल आणि मे या ४ महिन्यांचे हप्ते रखडले आहेत. पात्र महिलांच्या खात्यात २ टप्प्यांत आता ६ हजार रुपये जमा होणार असल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे. ई-केवायसीनंतर राज्यातील लाडकी बहीण योजनेत ८० लाखांपेक्षा जास्त महिला अपात्र ठरल्याची आकडेवारी समोर आली आहे. पण यामध्येच काही महिला पात्र असतानाही त्यांच्या खात्यावर मासिक लाभ जमा झाला नाही. त्या महिलांना आता लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २ दिवसांत पहिल्या टप्प्याचे ३ हजार रुपये जमा होण्यास सुरुवात झाली आहे. तर पुढील काही दिवसांत उर्वरित २ महिन्यांचा हप्ता त्या महिलांना मिळेल, असे सांगण्यात येत आहे.सामाजिक न्याय आणि आदिवासी विभागाकडून पैसे वर्ग झाले नाहीत, त्यामुळे अनेक महिलांच्या खात्यात हप्ता जमा झाला नाही, अशी माहिती समोर येत आहे. राज्यातील ८० लाख महिला ई-केवायसीनंतर अपात्र ठरल्या आहेत. पण त्याचवेळी अनेक महिलांच्या खात्यात पात्र असताना आणि ई-केवायसी केली असतानाही पैसे जमा झाले नाहीत.

## छाननीअंती 8 उमेदवारांचे अर्ज वैध

**नांदेड / प्रतिनिधी-** नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी दाखल करण्यात आलेले ८ उमेदवारांचे नामनिर्देशन अर्ज छाननी अंती वैध ठरले आहेत. यामुळे सध्या तरी निवडणूक अटळ मानली जात आहे. दरम्यान उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ४ जून रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. त्यानंतर अंतिम उमेदवाराची यादी जाहीर करण्यात येणार आहे. राज्यातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक होणार आहे. महायुतीविरुद्ध महाविकास आघाडी अशी थेट लढत होणार असल्याचे चित्र आहे. नांदेड विधान परिषद निवडणुकीसाठी २५ मे पासून अर्ज खरेदी व दाखल करण्यास सुरुवात झाली होती. १ जून रोजी नामनिर्देशन अर्ज भरण्याची अंतिम तारीख होती.या कालावधीत काँग्रेसचे रामदास पाटील सुमठाणकर, महायुती तथा भाजपकडून अमरनाथ राजुरकर, राष्ट्रवादी प्रविण पाटील चिखलीकर, अपक्ष माधवराव पवार, कृष्णा नागेश पाटील, ज्योतिबा खराटे, पंकज गायकवाड, प्रशांत इंगोले यांनी त्यांचे उमेदवारी अर्ज दाखल केले. २ जून रोजी या अर्जांची छाननी झाली असून सर्व ८ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. ४ जून रोजी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख असून दुपारी ३ वाजेपर्यंत निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.



## शिवकुमारांनी शपथविधीपूर्वी मानले गांधी परिवाराचे आभार

**बेंगळुरू /वृत्तसंस्था :** कर्नाटकचे भावी मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी गांधी परिवाराबद्दल तीव्र कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या राजकीय प्रवासात त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे म्हटले आहे. एक्स (पूर्वीचे ट्विटर) या सोशल मीडिया प्लॅटफार्मवर त्यांनी एक सविस्तर आणि भावनिक संदेश शेअर करत आपल्या राजकीय कारकिर्दीतील विविध टप्प्यांची आठवण करून दिली.शिवकुमार यांनी सांगितले की, एका सामान्य कार्यकर्त्यापासून राज्याच्या नेतृत्वापर्यंतचा प्रवास घडताना गांधी परिवाराचा विश्वास, पाठिंबा आणि प्रेरणा सतत मिळत राहिली.माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचे स्मरण करताना त्यांनी म्हटले की, तरुण कार्यकर्ता असताना त्यांच्या क्षमतेची पहिली ओळख राजीव गांधींनी करून दिली. त्या काळातील विश्वास आणि प्रोत्साहनानेच त्यांचा आत्मविश्वास वाढला आणि सार्वजनिक जीवनात मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा मिळाली, असे ते म्हणाले. काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांच्याबद्दल बोलताना शिवकुमार यांनी म्हटले की, खरे नेतृत्व कठीण काळातही विश्वास टिकवून ठेवण्यात असते आणि सोनिया गांधी यांनी त्यांच्या राजकीय प्रवासात हेच दाखवून दिले. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे त्यांनी मार्गदर्शक आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून कौतुक केले. तसेच काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका गांधी वद्रा या साध्या आणि कार्यकर्त्यांशी जोडलेल्या नेत्या असल्याचे त्यांनी नमूद केले.आपल्या संदेशाच्या शेवटी शिवकुमार यांनी सांगितले की, गांधी कुटुंब हे नेतृत्व, विश्वास आणि लोकसेवेचे प्रतीक आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कर्नाटकच्या जनतेच्या आशीर्वादाने ते राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी पूर्ण समर्पणाने काम करतील.



## हात-पाय तोडले तरच लोकांना कायद्याचा धाक बसेल; कर्नाटक ऊच्च न्यायालय

**बेंगळुरू /वृत्तसंस्था :** गुन्हेगारांचे हात-पाय तोडले, तरच कदाचित लोकांना कायद्याचे पालन कसे करावे हे समजेल. आपल्या देशात लोकशाही असल्याने प्रत्येक जण कायद्याला गृहीत धरत आहे, अशी टिप्पणी कर्नाटक उच्च न्यायालयाने केली आहे. एका अभियांत्रिकी विद्यार्थ्याच्या जामीन अर्जावरील सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती आर. नटराज यांनी ही तोंडी निरीक्षणे नोंदवली.न्यायमूर्ती आर. नटराज यांनी पुढे बोलताना स्पष्ट केले की, सध्या गुन्हेगार अतिशय सहजतेने आणि उजळ माथ्याने गुन्हे करत आहेत, कारण त्यांना कायद्याचा किंवा शिक्षेचा कोणताही धाक उरलेला नाही. गुन्हेगारांना जरब बसेल अशी अद्दल घडवली जात नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले. आपल्या वक्तव्याचे समर्थन करताना त्यांनी पश्चिम आशियाई देशांचे (आखाती देशांचे) उदाहरण दिले. तिथे गुन्ह्यांसाठी दिल्या जाणा-या अत्यंत कठोर आणि अंगावर काटा आणणा-या शिक्षांचा दाखला देत, भारतासारख्या देशातही कायद्याची कडक अंमलबजावणी करण्याची किती गरज आहे, यावर त्यांनी भर दिला.हे संपूर्ण प्रकरण मणिपाल येथील एका नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयातील



आहे. आरोपी विद्यार्थी आणि पीडित तरुणी हे दोघे एकाच वर्गात शिकत होते. पीडितेच्या तक्रारीनुसार, १२ सप्टेंबर २०२३ रोजी आरोपीने तिला मैत्रीबाबत चर्चा करण्याच्या बहाण्याने एका अपार्टमेंटमध्ये बोलावले आणि तिथे तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. या प्रकरणी पीडितेने आधी राष्ट्रीय महिला आयोगाकडे दाद मागितली होती, त्यानंतर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी गेल्या दोन महिन्यांपासून न्यायालयीन कोठडीत आहे.

**न्यायालयातील दोन्ही बाजूंचा युक्तिवाद-** सुनावणी दरम्यान आरोपीच्या वकिलांनी असा दावा केला की, आरोपी विद्यार्थ्याने कोणताही गुन्हा केलेला नाही आणि ही घटना तीन वर्षांपूर्वीची आहे, तरीही त्याला दोन महिन्यांपासून तुरुंगात ठेवण्यात आले आहे. मात्र, न्यायालयाने या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत तूर्तास जामीन देण्यास नकार दिला आहे. उच्च न्यायालयाने या प्रकरणी राज्य सरकारला नोटीस बजावली असून, पुढील सुनावणी ८ जून रोजी निश्चित केली आहे. कर्नाटक उच्च न्यायालयाच्या या विधानामुळे आता देशात गुन्हेगारांना मिळणारी शिक्षा आणि कायद्याची कडक अंमलबजावणी यावर पुन्हा एकदा नवीन चर्चा सुरू झाली आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## दिलासादायक निर्णय

केंद्र सरकारने बहुचर्चित 'ऊस (नियंत्रण) आदेश २०२६' चा मसुदा तूर्त मागे घेण्याचा निर्णय घेतला. उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रासह देशातील ऊस उत्पादक, साखर कारखानदार, गूळ खांडसरी उत्पादक आणि छोटी गाळप केंद्रे यांच्यासाठी हा निर्णय दिलासादायक आहे. तब्बल ६० वर्षे जुन्या या आदेशाच्या जागी एक नवी आणि आधुनिक नियामक व्यवस्था आणण्याचा केंद्र सरकारचा मानस होता; मात्र या मसुद्यातील काही अटींवरून राज्य सरकारे, ऊस उत्पादक शेतकरी, साखर कारखाने आणि खांडसरी उद्योग यांनी तीव्र आक्षेप नोंदवले होते. त्यांची दखल घेत अन्न मंत्रालयाने फेरआढावा घेण्यासाठी दोन पावले मागे जाण्याची भूमिका घेतली हे बरेच झाले.कोणतेही धोरण अमलात आणताना त्या धोरणाने प्रभावित होणाऱ्या घटकांच्या सूचना, हरकती, सल्ले, आक्षेप यांचा साकल्याने विचार न केला गेल्यास वाद, विरोध, निषेध, संघर्ष अटळ असतो. राज्यकर्त्यांनी अशा काळात लवचिकता दाखवल्यास संघर्षाचे प्रसंग टळतात. इथे मुद्दा हार-जीतचा नसून योग्य-अयोग्य आणि सुधारणांचा असतो. 'ऊस (नियंत्रण) आदेश १९६६' हा भारतातील साखर उद्योगाचा पाया मानला जातो. १९६० च्या दशकात तत्कालीन परिस्थिती आणि साखर क्षेत्रातील अनागोंदी यांमुळे केंद्र सरकारला हा ऐतिहासिक निर्णय घ्यावा लागला होता. १९६२ चे भारत-चीन युद्ध आणि १९६५ चे भारत-पाकिस्तान युद्ध यांमुळे अर्थव्यवस्थेवर प्रचंड ताण आला होता. १९६४ ते १९६६ दरम्यान दोन वर्षे भीषण दुष्काळ पडला. अन्नधान्याचे उत्पादन घटले. साखर उत्पादन घटल्यामुळे बाजारात तुटवडा निर्माण होऊन किमती सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेल्या. उपलब्ध ऊसावरून साखर कारखाने आणि पारंपरिक गुऱ्हाळे किंवा खांडसरी उद्योग यांच्यात तीव्र स्पर्धा सुरू झाली.कारखान्यांना सरकारचे नियम लागू होते आणि त्यांना साखरेचा काही हिस्सा (लेव्ही शुगर) सरकारला स्वस्त दरात द्यावा लागायचा. गूळ आणि खांडसरी बनवणाऱ्यांवर कोणतेही कडक नियंत्रण नव्हते. त्यामुळे ते उसाला कारखान्यांपेक्षा जास्त भाव देऊ शकत होते.परिणामी, शेतकरी आपला ऊस कारखान्यांऐवजी गुऱ्हाळांना देऊ लागले. यामुळे कारखान्यांना गाळपासाठी ऊस मिळेनासा झाला आणि साखर उत्पादन आणखी धोक्यात आले. साखर उत्पादन आणि पुरवठा सुरळीत करायचा असेल, तर उस वितरण आणि त्याच्या किमतीवर नियंत्रण गरजेचे आहे, हे लक्षात आल्याने सरकारने १६ जुलै १९६६ रोजी 'ऊस (नियंत्रण) आदेश १९६६' जारी केला. सहा दशके या आदेशांतर्गत ऊस नियंत्रण व्यवस्था चालत राहिली; पण केंद्र सरकारने त्यामध्ये बदलाच्या अनुषंगाने नवीन मसुदा मांडला. यानुसार, ज्या युनिटमध्ये दहापेक्षा अधिक कामगार आहेत आणि ज्यांची दैनिक गाळप क्षमता सुमारे ५०० टन आहे, त्यांना 'खांडसरी युनिट' म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित होते. सध्याच्या नियमांनुसार, २० किंवा त्याहून अधिक कामगार असलेल्या आणि गाळप क्षमतेची कोणतीही मर्यादा नसलेल्या घटकाला खांडसरी मानले जाते. केंद्राच्या नव्या व्याख्येमुळे ग्रामीण भागातील छोटे आणि मानवी श्रमावर चालणारे पारंपरिक खांडसरी उद्योग थेट सरकारी नियंत्रण म्हणजेच नोकरशाहीच्या कचाट्यात आले असते. खांडसरी उद्योग हा साखर कारखानदारीला समांतर पर्याय आहे. गळीत हंगामात पेमेंटला बरेचदा उशीर होतो आणि शेतकरी अडचणीत येतो. अशावेळी खांडसरी किंवा गुऱ्हाळे शेतकऱ्यांच्या मदतीला धावून येतात. अनेकदा कारखान्यांपेक्षा खांडसरी उद्योगांकडून उसाला तातडीने आणि अधिक चांगला दर मिळतो. नव्या नियमांमुळे खांडसरी उद्योग संकटात येऊन त्याचा थेट फटका शेतकऱ्यांच्या खिशाला बसला असता. हाच धागा पकडून शेतकरी संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला. या कायद्यातील सुधारणांना सरसकट विरोध नसून त्यात योग्य त्या दुरुस्त्या व्हाव्यात अशी मागणी आहे.आज उसापासून साखरेबरोबरच इथेनॉल, मळी, सहवीजनिर्मिती आणि प्रेसमड तयार होतात. कारखान्यांचे आर्थिक उत्पन्न केवळ साखरेवर राहिलेले नसून ते या उपपदार्थांवर बव्हंशी आधारित आहे. त्यामुळे ऊसाची एफआरपी निश्चित करताना या सर्व उपपदार्थांच्या विक्रीतून मिळणारे उत्पन्न आणि त्यांची पूर्ण किंमत गृहीत धरली पाहिजे,ही शेतकऱ्यांची मागणी आहे. केंद्र सरकारचा या मसुद्यामागील मुख्य हेतू इथेनॉल आणि खांडसरी क्षेत्राला एका केंद्रीय नियंत्रणाखाली आणण्याचा होता. ही नवी व्यवस्था लागू करताना ऊस उत्पादक,राज्यांच्या अधिकारांचा आणि लहान उद्योगांचा विचार केला गेला नाही, ही भूमिका उशिरा का होईना; पण सरकारने विचारात घेतली. मोठ्या कारखान्यांवर साखरेचा साठा किती ठेवावा, कधी आणि कोणत्या दराने विकावा याचे सरकारी नियंत्रण असते. हेच नियम छोट्या खांडसरींना लावले, तर त्यांच्या मालाच्या विक्रीवर मर्यादा आल्या असत्या.नियमांचे थोडे जरी उल्लंघन झाले किंवा कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळली, तर अवाढव्य दंड,साठा जप्त करणे किंवा युनिट सील करणे अशा कारवाया प्रस्तावित होत्या.हा आर्थिक फटका पेलण्याची क्षमता छोट्या घटकांमध्ये नसते. दोन साखर कारखान्यांमधील किमान हवाई अंतर सध्याच्या १५ किलोमीटरवरून वाढवून २५ किलोमीटर करण्याचा प्रस्ताव होता. त्यामुळे अनेक नवीन प्रकल्पांना किंवा विद्यमान कारखान्यांच्या विस्ताराला अडचणी आल्या असत्या. भारतात एकूण उत्पादित उसापैकी सुमारे ३१ टक्के ऊस हा गूळ, खांडसरी आणि गुऱ्हाळांमध्ये वापरला जातो. उत्तर प्रदेशातील प्रमुख १० ते १२ ऊस उत्पादक जिल्ह्यांमध्ये प्रत्येक जिल्ह्यात अशी २ ते ३ हजार गुऱ्हाळे आहेत. सरकारच्या निर्णयामुळे स्थानिक उद्योगांचे आणि ग्रामीण रोजगाराचे रक्षण झाले आहे. कृषी आणि साखर उद्योग हा राज्यांच्या अर्थकारणाचा आणि राजकारणाचा कणा असल्याने अनेक राज्य सरकारांनीही या मसुद्यावर आक्षेप नोंदवले होते.सरकारने केवळ कारखानदारांच्या हिताचा विचार न करता शेतकरी संघटना,खांडसरी चालक आणि राज्य सरकारे यांना विश्वासात घेतले पाहिजे.नव्या मसुद्यात उसाच्या उपपदार्थांचे मूल्य एफआरपीच्या सूत्रात समाविष्ट करणे आणि छोट्या खांडसरी उद्योगांचे अस्तित्व टिकवून ठेवणे,या दोन्ही गोष्टींचा मेळ घालावा लागेल.

# जागतिक तणावात भारतीय अर्थव्यवस्था तग धरेल का?



**भारताकडे मोठी बाजारपेठ, मनुष्यबळ, डिजिटल क्षमता, वाढती उत्पादनक्षमता आणि मजबूत लोकशाही आहे, मात्र केवळ उच्च विकासदर हा आर्थिक यशाचा निकष ठरू शकत नाही.**

रशिया- युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील संघर्ष, अमेरिका- चीनमधील वाढता आर्थिक व तांत्रिक संघर्ष, जागतिक पुरवठा साखळीतील अडथळे आणि हवामान बदल यांसारख्या घटकांनी जागतिक आर्थिक व्यवस्थेचे स्वरूप बदलून टाकले आहे. गेल्या काही दशकांमध्ये जागतिकीकरणामुळे व्यापार, गुंतवणूक आणि उत्पादन प्रक्रियेत मोठी वाढ झाली; मात्र सध्याच्या परिस्थितीत संरक्षणवाद, भू-राजकीय स्पर्धा आणि राष्ट्रीय हितसंबंधांना अधिक महत्त्व दिले जात असल्याने जागतिक अर्थकारणावर अनिश्चिततेचे सावट गडद होते आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अंदाजानुसार २०२५-२६ मध्ये जागतिक आर्थिक वाढ तीन टक्क्यांच्या आसपासच मर्यादित राहण्याची शक्यता असताना भारताचा आर्थिक विकासदर ६ ते ६.५ टक्क्यांच्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. अर्थात डिजिटल अर्थव्यवस्था, विकासात्मक पायाभूत खर्च आणि अंतर्गत मागणी या जमेच्या बाजू असल्या तरी महागाई, बेरोजगारी, वाढते वैयक्तिक कर्ज, रुपयाची घसरण आणि ऊर्जेचे आयात-अवलंबित्व या निश्चितपणे चिंताजनक बाबी ठरतात.

### अस्थिर जागतिक व्यापार आणि गुंतवणूक

रशिया- युक्रेन युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम झाले आहेत. रशिया हा जगातील प्रमुख तेल आणि नैसर्गिक वायू निर्यातदार देश असून युक्रेन गहू, सूर्यफूल तेल आणि खतांच्या जागतिक पुरवठ्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. युद्धामुळे ऊर्जा आणि अन्नधान्याच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाले. परिणामी अनेक देशांमध्ये महागाई वाढली आणि उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली. युरोपमधील ऊर्जा संकटामुळे औद्योगिक उत्पादनावर परिणाम झाला. त्याचवेळी पश्चिम आशियातील संघर्ष आणि लाल समुद्रातील तणावामुळे सागरी व्यापार विस्कळीत झाला. जगातील सुमारे १२ टक्के व्यापार सुएझ कालव्यातून होतो. या मार्गावरील सुरक्षाविषयक धोक्यांमुळे जहाजवाहतुकीचा खर्च वाढला असून त्याचा परिणाम जागतिक पुरवठा साखळीवर झाला आहे. महागाई नियंत्रणासाठी अमेरिकेची फेडरल रिझर्व्ह, युरोपियन सेंट्रल बँक आणि इतर प्रमुख मध्यवर्ती बँकांनी व्याजदर उच्च पातळीवर कायम ठेवले आहेत. उच्च व्याजदरांमुळे गुंतवणूक आणि कर्जवितरणाचा वेग कमी होत आहे. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अहवालांनुसार जागतिक विकासाचा वेग मंदावला असून विकसनशील देशांवरील कर्जाचा भार वाढत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या एप्रिल २०२६ च्या अहवालानुसार जागतिक सार्वजनिक कर्ज २०२५ मध्ये जागतिक जीडीपीच्या ९३.९ टक्क्यांपर्यंत, म्हणजेच सुमारे १०६.७ ट्रिलियन डॉलरवर पोहोचले असून २०२९ पर्यंत ते १०० टक्क्यांच्या पुढे जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे संरक्षण खर्चात मोठी वाढ झाली आहे. अनेक देश शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक विकासावरील खर्च मर्यादित करून संरक्षणासाठी अधिक निधी राखून ठेवत आहेत. परिणामी दीर्घकालीन विकास प्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जागतिक व्यापार आणि गुंतवणूक दोन्ही अनिश्चिततेच्या विळख्यात अडकले असून जागतिक अर्थव्यवस्था नव्या आव्हानांना सामोरी जात आहे.

### जागतिक व्यापारातील भारताची भूमिका

भारत आज चार ट्रिलियन डॉलरपेक्षा अधिक आकाराची अर्थव्यवस्था बनला आहे. मोठी लोकसंख्या, वाढती ग्राहक बाजारपेठ, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि उत्पादन क्षेत्राचा विस्तार यामुळे भारताचे जागतिक अर्थव्यवस्थेतील महत्त्व वाढत आहे. तथापि, भारताच्या अर्थव्यवस्थेतील एक मूलभूत मर्यादा म्हणजे ऊर्जा आयातीवरील अवलंबित्व. देश आपल्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के कच्चे तेल आयात करतो. जागतिक बाजारात तेलाच्या किंमती वाढल्या की त्याचा थेट परिणाम भारतातील महागाईवर होतो. वाहतूक, शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्रांतील खर्च वाढल्याने उत्पादन महाग होते. इंधन, स्वयंपाक गॅस आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंच्या किमती वाढल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांवरील आर्थिक ताण वाढतो आहे.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या आकडेवारीनुसार ग्रामीण कुटुंबांच्या खर्चातील जवळपास निम्मा हिस्सा अन्नावर खर्च होतो. त्यामुळे अन्नधान्य महागाईचा सर्वाधिक फटका ग्रामीण आणि गरीब कुटुंबांना बसतो. महागाई वाढल्यास बचतीचे प्रमाण घटते आणि कर्जावरील अवलंबित्व वाढते. परिणामी कुटुंबांच्या आर्थिक सुरक्षिततेवर परिणाम होतो. रुपयाचे अवमूल्यन ही आणखी एक गंभीर समस्या आहे. जागतिक अस्थिरतेतुन २०२६ मध्ये रुपयाचे मूल्य ९६ रुपयापर्यंत घसरले आहे. डॉलर मजबूत होत असल्याने रुपयावर दबाव वाढतो. रुपयाची किंमत घसरल्यास आयात महाग होते, परकीय कर्जफेडीचा खर्च वाढतो आणि उद्योगांच्या उत्पादन खर्चात वाढ होते. विशेषतः तेल, इलेक्ट्रॉनिक्स, संरक्षण उपकरणे आणि सेमीकंडक्टर आयातीवरील भारताचे अवलंबित्व लक्षात घेता ही बाब चिंताजनक आहे.

तथापि, जागतिक परिस्थिती भारतासाठी काही संधीही निर्माण करत आहे. चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या पर्यायी उत्पादन केंद्रांचा शोध घेत आहेत. 'चायना प्लस वन' धोरणामुळे भारताकडे उत्पादन क्षेत्रातील गुंतवणूक आकर्षित होत आहे. उत्पादन-संलग्न प्रोत्साहन (इथ्ढ) योजनांमुळे मोबाइल उत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स, औषधनिर्मिती आणि वाहन उद्योगात लक्षणीय वाढ झाली आहे. भारतातील सेवा क्षेत्र विशेषतः माहिती तंत्रज्ञान, वित्तीय सेवा आणि औषधनिर्मिती क्षेत्र जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनले आहे. सन २०२५-२६ मध्ये भारताच्या परकीय व्यापाराने १.६ ट्रिलियन डॉलरचा टप्पा ओलांडला असून वस्तू व सेवा निर्यात ८०० अब्ज डॉलर्सच्या दिशेने वाटचाल सुरू आहे.

### भारतीय बाजारपेठेतील संधी आणि धोके

जागतिक अस्थिरतेच्या काळातही भारतीय भांडवली बाजाराने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सेन्सेक्स आणि निफ्टीने विक्रमी पातळी गाठली असून देशांतर्गत गुंतवणूकदारांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. डिमॅट खात्यांची संख्या आणि म्युच्युअल फंडातील एसआयपी गुंतवणूक सातत्याने वाढत आहे. यूपीआय व्यवहारांतील विक्रमी वाढ भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या यशाचे प्रतीक आहे. लहान शहरांमध्ये आणि ग्रामीण भागातही डिजिटल पेमेंट्सचा वापर झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे आर्थिक व्यवहार अधिक पारदर्शक आणि औपचारिक होत आहेत. मात्र या चमकदार चित्रामागे काही गंभीर आर्थिक धोकेही आहेत. वैयक्तिक कर्जवाढ (वैयक्तिक कर्जदार सुमारे १५ ते २० टक्के) हा त्यातील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे. गृहकर्ज, वाहनकर्ज, ग्राहक कर्ज आणि क्रेडिट कार्ड कर्जात मोठी वाढ झाली आहे. अनेक कुटुंबे ईएमआयच्या ओझ्याखाली दबली जात आहेत. उत्पन्नाच्या तुलनेत कर्जवाढ वेगाने होत राहिल्यास भविष्यात आर्थिक स्थैर्यावर परिणाम होऊ शकतो. ग्रामीण अर्थव्यवस्था अजूनही अनेक समस्यांनी ग्रासलेली आहे. शेती उत्पादन खर्च सातत्याने वाढत असताना उत्पन्नातील वाढ मर्यादित आहे. खत, बियाणे, इंधन आणि मजुरी खर्च वाढल्याने शेतीचे अर्थकारण अधिकच कठीण झाले आहे. हवामान बदलामुळे अवकाळी पाऊस, दुष्काळ आणि पूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तींची तीव्रता वाढत आहे. याचा परिणाम ग्रामीण मागणीवर आणि पर्यायाने संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होतो.

### रोजगार आणि कौशल्यविकासाचे आव्हान

भारताची सर्वांत मोठी ताकद म्हणजे युवा लोकसंख्या. मात्र या लोकसंख्येचे आर्थिक सामर्थ्यात रूपांतर करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुणवत्तापूर्ण रोजगारनिर्मिती आवश्यक आहे. आर्थिक वाढ होत असली तरी रोजगारनिर्मितीचा वेग अपेक्षेइतका नाही. नियतकालिक कामगार शक्ती सर्वेक्षणानुसार (इथ्इए ) २०२६ नुसार देशातील बेरोजगारीचा दर सुमारे ५.१ ते ५.२ टक्क्यांच्या दरम्यान आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेशन आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे रोजगार बाजाराचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. अनेक पारंपरिक नोकऱ्यांवर दबाव निर्माण होत असताना डेटा विश्लेषण, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, हरित ऊर्जा आणि डिजिटल सेवा यांसारख्या क्षेत्रांमध्ये नवीन संधी निर्माण होत आहेत. यामुळे कौशल्यविकास आणि पुनर्कौशल्य यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शिक्षण व्यवस्था, उद्योग आणि सरकार यांनी संयुक्तपणे रोजगारक्षम कौशल्ये विकसित करण्यावर भर दिला नाही तर लोकसंख्यात्मक लाभांशाचे रूपांतर लोकसंख्यात्मक ओझ्यात होण्याचा धोका आहे.

### भारताचे आर्थिक भवितव्य

जागतिक सत्ता संघर्ष, युद्धजन्य परिस्थिती आणि आर्थिक अनिश्चितता यांमुळे जगातील बहुतांश अर्थव्यवस्था दबावाखाली आहेत. अशा परिस्थितीत भारताकडे मोठी बाजारपेठ, युवा मनुष्यबळ, डिजिटल क्षमता, वाढती उत्पादनक्षमता आणि मजबूत लोकशाही व्यवस्था आदी महत्त्वाची बलस्थाने आहेत. मात्र केवळ उच्च विकासदर हा आर्थिक यशाचा निकष ठरू शकत नाही. रोजगारनिर्मिती, ग्रामीण अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन, कृषी क्षेत्राची शाश्वतता, कौशल्यविकास, हरित ऊर्जा, तंत्रज्ञानातील स्वावलंबन आणि सामाजिक समता यांना समान महत्त्व द्यावे लागेल. ऊर्जा आयातीवरील अवलंबित्व कमी करणे, निर्यातवाढीस चालना देणे आणि उत्पादन क्षेत्र अधिक स्पर्धात्मक बनवणे ही काळाची गरज आहे. योग्य आर्थिक धोरणे, सर्वसमावेशक अंमलबजावणी जागतिक घडामोडींना प्रतिसाद देण्याच्या क्षमतावृद्धीसह अंतर्गत आर्थिक सुधारणांना सातत्यपूर्ण प्राधान्य देणे गरजेचे आहे.

**डॉ.नितीन बाबर**

# मोदींच्या सत्ताबळकटीकरणात गांधी परिवाराचाही वाटा?



प्रसिद्ध इतिहासकार आणि विचारवंत श्री. रामचंद्र गुहा यांनी नुकताच एक महत्त्वाचा लेख 'स्क्रोल' नियतकालिकासा ठी लिहिला आहे. काँग्रेस, गांधी परिवार आणि एकंदरच भाजपविरुद्ध राष्ट्रीय पर्याय म्हणून उभं राहण्याबाबत या लेखात सविस्तर चर्चा केलेली आहे. या लेखात गुहा मांडलेले ठळक मुद्दे खालीलप्रमाणे-

प्रख्यात इतिहासकार व विचारवंत रामचंद्र गुहा यांनी अलीकडेच लिहिलेल्या लेखात भारतीय लोकशाही, काँग्रेस पक्ष आणि गांधी परिवाराच्या नेतृत्वावर अत्यंत परखड भाष्य केले आहे. या लेखाचा मुख्य मुद्दा असा आहे की, भारतातील लोकशाही संस्थांच्या ऱ्हासासाठी मुख्य जबाबदारी नरेंद्र मोदी आणि भाजपची असली तरी प्रभावी विरोधक उभे करण्यात काँग्रेसच्या अपयशामुळे भाजपला दीर्घकाळ सत्ता टिकविण्यास मदत झाली आहे.

### लोकशाहीच्या -हासाची जबाबदारी कोणाची?

गुहा स्पष्टपणे म्हणतात की २०१४ नंतर भारतातील अनेक लोकशाही संस्थांचे नुकसान झाले आहे. सत्तेचे केंद्रीकरण, संस्थांची स्वायत्तता कमी होणे, विरोधी मतांबद्दलची असहिष्णुता यासाठी मोदी-शाह यांची राजकीय शैली जबाबदार आहे. मात्र त्याचवेळी ते असेही म्हणतात की, जर विरोधी पक्ष सक्षम, संघटित आणि विश्वासार्ह असता, तर सत्ताधारी पक्षाला इतकी एकतर्फी ताकद मिळाली नसती.

### काँग्रेसची ऐतिहासिक घसरण

एकेकाळी देशाच्या जवळपास प्रत्येक राज्यात मजबूत संघटन असलेली काँग्रेस आज अनेक राज्यांत दुय्यम किंवा तृतीय क्रमांकाचा पक्ष बनली आहे. गुजरात, मध्य प्रदेश, हरियाणा यांसारख्या राज्यांत भाजप हा आता नैसर्गिक सत्ताधारी पक्ष बनला आहे. काँग्रेसचा सामाजिक आणि संघटनात्मक पाया सतत कमकुवत होत गेला, असे गुहा नमूद करतात.त्यांच्या मते, या घसरणीला थांबविण्यात राहुल गांधी अपयशी ठरले आहेत. नेतृत्वाच्या काळात काँग्रेसच्या आमदारांची संख्या मोठ्या प्रमाणात घटल्याचे ते निदर्शनास आणतात.

### राहुल गांधींबद्दल सहानुभूती, पण शंका

गुहा राहुल गांधींवर वैयक्तिक टीका करत नाहीत. उलट ते त्यांना सभ्य आणि चांगला माणूस म्हणतात. वडील आणि आजी यांच्या हत्यांसारख्या वैयक्तिक शोकांतिकांबद्दल ते सहानुभूती व्यक्त करतात.मात्र राजकीय नेतृत्वाच्या दृष्टीने ते राहुल गांधींना अपुरे मानतात. त्यांच्या मते:राष्ट्रीय नेतृत्वासाठी आवश्यक सातत्य कमी दिसते.एखादा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर त्याचा दीर्घकालीन पाठपुरावा होत नाही.पक्षसंघटना उभारण्यावर पुरेसा भर दिला जात नाही.प्रशासकीय अनुभव आणि कार्यकारी जबाबदाऱ्यांचा अभाव आहे.

गुहा यांना असे वाटते की राहुल गांधी स्वतंत्र राजकीय व्यक्तिमत्त्व म्हणून पूर्णपणे उभे राहू शकलेले नाहीत.गांधी परिवारावर अवलंबून असलेली काँग्रेस लेखातील एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे काँग्रेस पक्षाची घराणेशाहीवर असलेली अवलंबित्वाची मानसिकता. पक्षातील अनेक नेत्यांना गांधी परिवाराशिवाय काँग्रेसची कल्पनाच करता येत नाही, अशी गुहा यांची टीका आहे.त्यांच्या मते, पक्षात अंतर्गत लोकशाही कमी झाली असून नेतृत्वाची निवड व्यापक चर्चेपेक्षा परिवारनिष्ठेच्या आधारे होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

### प्रियंका गांधी पर्याय ठरू शकतील का?

काँग्रेसमधील काही कार्यकर्त्यांना राहुल गांधींऐवजी प्रियंका गांधी अधिक प्रभावी नेता वाटतात. त्यांचे वक्तृत्व, विशेषतः हिंदी भाषेतील संवादकौशल्य, अधिक प्रभावी असल्याचे मानले जाते.

परंतु गुहा याबाबतही सावध आहेत. त्यांच्या मते:त्या देखील त्याच घराणेशाहीच्या प्रतिमेशी जोडलेल्या आहेत.

केवळ गांधी आडनावामुळे निवडणुका जिंकता येत नाहीत.उत्तर प्रदेशातील निवडणूक कामगिरीने त्यांची निवडणूकक्षमता सिद्ध केलेली नाही.

### राष्ट्रीय पर्यायाची गरज

लेखाचा शेवटचा आणि सर्वात महत्त्वाचा संदेश असा आहे की भारतासारख्या मोठ्या लोकशाहीत मजबूत सत्ताधारी पक्षाइतकाच मजबूत विरोधी पक्षही आवश्यक असतो. जर विरोधक कमकुवत राहिले तर सत्तेवर आवश्यक लोकशाही अंकुश राहत नाही.गुहा यांना वाटते की काँग्रेसने गांधी परिवाराच्या पलीकडे जाऊन नेतृत्व, संघटना आणि धोरणात्मक पुनर्बांधणी केली नाही तर ती भाजपला प्रभावी राष्ट्रीय आव्हान देऊ शकणार नाही.

**-मकरंद देसाई**

## लोकनेते गोपीनाथ मुंडे



कोणताही राजकीय वारसा नसताना, स्वकर्तृत्वाने राजकारणाचे शिखर गाठणारे नेते भारतीय राजकारणात हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच असतील यात लोकनेते म्हटले जाणारे एकमेव नेते म्हणजे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे. महाविद्यालयीन निवडणुकीद्वारे त्यांचे नेतृत्व उदयास आले. याच सुमारास त्यांची ओळख भाजप नेते प्रमोद महाजनांशी झाली.महाजनांनी मुंडे यांच्यातील नेतृत्वगुण हेरून त्यांना अखील भारतीय विद्यार्थी परिषदेशी जोडले.१९७८ साली मुंडे जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून निवडून आले.त्यानंतर दोन वर्षांनी म्हणजे १९८० साली ते रेणापूर मतदारसंघातून पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आले. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही.दरम्यान त्यांनी भाजपला घराघरात पोहचवण्याचे काम केले. भाजप हा ब्राह्मणांचा पक्ष आहे. ही ओळख खोडून काढण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रात 'माधव' चा प्रयोग केला आणि भाजपला बहुजनांचा पक्ष बनवला. १९९१ ते १९९५ या काळात ते विरोधी पक्षनेते असताना सत्ताधारी काँग्रेसपक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले होते. १९९५ साली त्यांनी महाराष्ट्रभर दौरे करून जनमत तयार केले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच १९९५ साली राज्यात युतीचे सरकार आले. या सरकारमध्ये ते उपमुख्यमंत्री बनले शिवाय गृहमंत्रीपदाची जबाबदारी देखील त्यांचावरच होती.गृहमंत्री म्हणूनही त्यांची कारकीर्द गाजली. २०१४ साली ते जेंव्हा केंद्रात कॅबिनेट मंत्री बनले तेंव्हा संपूर्ण महाराष्ट्राला आनंद झाला मात्र हा आनंद फार काळ टिकू शकला नाही. ३ जून २०१४ रोजी एका अपघातात त्यांचे निधन झाले आणि संपूर्ण महाराष्ट्र शोक सागरात बुडाला.लोकनेते गोपीनाथ मुंडे यांना अभिवादन !

**श्याम ठाणेदार**

# घरीच बनविले तब्बल ७ लाखांचे सेंद्रीय कीटकनाशक

## शेतकरी गटांची फार्मर कप स्पर्धेत दमदार कामगिरी

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

पाणी फाउंडेशन, कृषी विभाग आणि उमेद यांच्या संयुक्त पुढाकारातून चांदूर रेल्वे तालुक्यात स्थापन झालेल्या शेतकरी गटांनी सेंद्रिय शेतीच्या दिशेने एक मोठे पाऊल टाकत तब्बल ७ लाख २० हजार रुपयांच्या दशपर्णी अर्काची निर्मिती केली आहे. फार्मर कप स्पर्धेअंतर्गत राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये सेंद्रिय कीटकनाशक निर्मितीबाबत जागरूकता निर्माण झाली असून उत्पादन खर्च कमी करण्यासही मोठी मदत होणार आहे.

चांदूर रेल्वे तालुक्यात पुरुष व महिला मिळून एकूण ४२ शेतकरी गटांची स्थापना करण्यात आली असून, या गटांद्वारे एकत्रित व सुधारित



शेतीचे विविध उपक्रम राबविले जात आहेत. डिजिटल शेती शाळा आणि व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून कृषी तज्ज्ञांचे सातत्याने मार्गदर्शन मिळत असल्याने शेतकरी नव्या तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे अवलंब करीत आहेत. फार्मर कप स्पर्धेचा प्रारंभ दशपर्णी अर्क निर्मितीच्या उपक्रमाने झाला. त्यात १८ शेतकरी गटांनी प्रत्येकी २०० लिटरप्रमाणे एकूण ३,६०० लिटर दशपर्णी अर्क तयार केला. बाजारभावानुसार या सेंद्रिय कीटकनाशकाची किंमत प्रतिलिटर २०० रुपये धरल्यास त्याचे एकूण मूल्य सुमारे ७ लाख २० हजार रुपये इतके होते. या उपक्रमासाठी कृषी विभागाचे मेंटर अमोल चौकडे, उमेदच्या सविता थेटे व मोनाली मुनघाटे, तसेच पाणी फाउंडेशनचे जयकुमार सोनुले आणि रेणूका पोहोकार यांनी शेतकरी गटांना मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांनी स्वबळावर तयार केलेल्या या सेंद्रिय कीटकनाशकामुळे चांदूर रेल्वे तालुक्यातील गटशेती उपक्रमाला नवी दिशा मिळाली असून, फार्मर कप स्पर्धेत या गटांची कामगिरी विशेष कौतुकास्पद ठरत आहे.

**पिकांसाठी प्रभावी संरक्षण कवच**

दशपर्णी अर्क हे नैसर्गिक कीटकनाशक व बुरशीनाशक म्हणून प्रभावी मानले जाते. पिकांवर कीड येण्यापूर्वी याची फवारणी केल्यास त्याच्या तीव्र वासामुळे आणि औषधी गुणधर्मांमुळे किडींचा प्रादुर्भाव कमी होतो. तसेच करपा (ब्लाइट), मुळकूज, भुरी, पानांवरील ठिपके यांसारख्या रोगांवर नियंत्रण मिळविण्यासही हा अर्क उपयुक्त ठरतो. त्यामुळे रासायनिक कीटकनाशकांवरील खर्च कमी होऊन शेती अधिक सुरक्षित व पर्यावरणपूरक बनण्यास मदत होते.

**असा तयार केला दशपर्णी अर्क**

कडुलिंब पाने ५ किलो, सीताफळ पाने ३ किलो, धोत्रा पाने २ किलो, निरगुडी पाने २ किलो, रुई पाने २ किलो, पपई पाने २ किलो, रायमुंगणी पाने २ किलो, गुळवेल पाने २ किलो, लाल कन्हेर पाने २ किलो, करंज (कडू बदाम) पाने २ किलो हे दहा वनस्पतींचे पाने घेऊन यामध्ये २ किलो हिरवी मिरची, १ किलो लसूण, ५ किलो ताजे गाईचे शेण आणि ५ ते १० लिटर गोमूत्र हे प्लास्टिक ड्रम मध्ये २०० लिटर पाण्यात मिसळून हा दशपर्णी अर्क तयार केला आहे. हे मिश्रण ४० दिवस सावलीमध्ये ठेवायचे आहे. दिवसातून दोन वेळा ढवळायचे आहे आणि ४० दिवसानंतर गाळून २० लिटर स्प्रे पंपामध्ये ६०० ते ७०० मिली हे द्रावण वापरून पिकावर फवारणी करायची आहे.

## अतिरिक्त कामांच्या ताणामुळे शिक्षकांचे मानसिक आरोग्य बिघडले

**अमरावती/का.प्र.**

शिक्षकांवर वाढत चाललेले बीएलओ, जनगणना आणि ऑनलाइन कामांचे ओझे ही शिक्षण व्यवस्थेसाठी गंभीर चिंतेची बाब बनत आहे.उन्हाळी सुट्टीतही शाळा पूर्वतयारी, सततचे ऑनलाईन अहवाल आणि प्रशासकीय जबाबदाऱ्यामुळे शिक्षकांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे.प्रभावी अध्यापनासाठी शिक्षकांना मानसिक विश्रांती आणि कुटुंबासोबत वेळ मिळणे तितकेच आवश्यक आहे.

राज्यातील शिक्षकांवर दिवसेंदिवस अध्यापना व्यतिरिक्त विविध शासकीय कामांचा वाढता बोजा पडत असून त्याचा थेट परिणाम त्यांच्या मानसिक आरोग्यावर होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. निवडणूक कामे, जबाबदाऱ्या, जनगणना, विविध सर्वेक्षणे, ऑनलाईन माहिती भरणे, पोर्टल अपडेट करणे आदी कामांमुळे शिक्षकांवरील ताण मोठ्या प्रमाणात वाढला आहे. शिक्षकांचे मुख्य काम विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हे असले, तरी प्रत्यक्षात त्यांना अनेक प्रशासकीय आणि तांत्रिक कामांमध्ये गुंतवले जात आहे. सततच्या ऑनलाईन नोंदी, अहवाल सादर करणे, वेळोवेळी येणाऱ्या सूचना आणि विविध शासकीय मोहिमांमुळे शिक्षकांना स्वतःसाठी आणि कुटुंबासाठी वेळ मिळणे कठीण झाले आहे.

ग्रामीण भागातील अनेक शिक्षकांना इंटरनेट समस्या, तांत्रिक अडचणी आणि वेळेच्या मर्यादांमुळे अधिक तणावाचा सामना करावा लागत आहे. दिवसभर शाळेतील अध्यापन आणि त्यानंतर रात्री उशिरापर्यंत ऑनलाईन माहिती भरण्याचे काम करावे लागत असल्याने मानसिक थकवा वाढत असल्याचे शिक्षकांकडून सांगितले जात आहे. मानसिक ताण वाढल्याने शिक्षकांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

## उड्डाणच्या माध्यमातून 'कृषी सारथी'चे मेळघाटातील शेतकऱ्यांना आधुनिक व शाश्वत शेतीचे मार्गदर्शन

**चिखलदरा/वार्ताहर**

मेळघाटातील दुर्गम व आदिवासीबहुल भागातील शेतकऱ्यांना आधुनिक, वैज्ञानिक व शाश्वत शेती पद्धतींची माहिती उपलब्ध करून देण्यासाठी उड्डाण इंजिनिअर्स मल्टिपर्पज सोसायटी, अमरावती यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शेती, शिक्षण व आरोग्य जनजागृती शिबिरात 'कृषी सारथी'च्या माध्यमातून विशेष कृषी मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. चुरणी येथे संपन्न झालेल्या शिबिरात स्थानिक शेतकरी, युवा व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

विदर्भातील नामांकित कृषी क्षेत्रातील संस्था म्हणून ओळख असलेल्या 'कृषी सारथी'ची स्थापना विदर्भातील शेतकरी पुत्र




तसेच उड्डाणचे सक्रिय सदस्य इंजि. परशराम आखरे यांनी केली आहे. त्यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामध्ये शेतकऱ्यांना माती परीक्षणाचे महत्त्व, जमिनीच्या आरोग्यानुसार खत व्यवस्थापन, उत्पादन खर्चात बचत करून अधिक उत्पन्न मिळविण्याच्या आधुनिक पद्धती, पीक नियोजन, जलसंवर्धन, सेंद्रिय व संतुलित शेती तसेच पारंपरिक पिकांसोबत पूरक व नगदी पिकांची लागवड करून आर्थिक उत्पन्नात वाढ करण्याचे विविध मार्ग याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कृषी क्षेत्रातील बदलत्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करून शेती अधिक उत्पादक, फायदेशीर व पर्यावरणपूरक कशी बनविता येईल याबाबतही शेतकऱ्यांना उपयुक्त माहिती देण्यात आली.

मार्गदर्शन सत्रात कृषी सारथीचे तज्ञ मार्गदर्शक पंकज अरज,धनंजय कोरडे व निवृत्ती उपासे यांनी शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधत त्यांच्या विविध समस्या, अडचणी व शंकांचे निरसन केले. स्थानिक हवामान, मातीची रचना आणि उपलब्ध संसाधने लक्षात घेऊन शेतीचे नियोजन कसे करावे याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. आधुनिक कृषी तंत्रज्ञान, पीक संरक्षण, योग्य खत व्यवस्थापन, बाजारपेठेतील संधी आणि उत्पादनवाढीसाठी आवश्यक उपाययोजनांवर त्यांनी विशेष भर दिला. याचबरोबर या शिबिरात सहभागी झालेल्या स्वयंसेवक, नियोजक आणि व्यवस्थापकांसाठीही हा अनुभव अत्यंत प्रेरणादायी व जीवनदायी ठरला.शिबिराचे नियोजन उड्डाणचे सचिव इंजि. अभिजित देशमुख यांनी संस्थेचे अध्यक्ष इंजि. निलेश चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत नियोजनबद्ध व प्रभावी पद्धतीने केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी स्वयंसेवकांनी गावागावांत जाऊन जनजागृती केली तसेच विविध उपक्रमांचे सुयोग्य व्यवस्थापन सांभाळले. शिक्षण, आरोग्य आणि कृषी या तिन्ही क्षेत्रांचा समन्वय साधत ग्रामीण विकासाचा व्यापक दृष्टिकोन या शिबिरातून मांडण्यात आला.

## अंजनगाव सुर्जीच्या नगरसेवकांना येणार 'सुगीचे दिवस?

### स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीमुळे राजकीय वातावरण तापले

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधी**

अमरावती स्थानिक स्वराज्य मतदारसंघाच्या निवडणुकीची रणधुमाळी आता खऱ्या अर्थाने सुरू झाली असून, याचे पडसाद अंजनगाव सुर्जी नगरपालिकेत उमटू लागले आहेत. सोमवार १ जून रोजी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी काही उमेदवारांनी अपक्ष म्हणून शड्डू ठोकल्याने राजकीय समीकरणे वेगाने बदलली आहेत. या अनपेक्षित घडामोडीमुळे अंजनगावच्या नगरसेवकांच्या चेहऱ्यावर आता 'सुगीचे दिवस' आल्याचे हास्य फुलले आहे.

अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेमध्ये सध्या कोणत्याही एका राजकीय पक्षाचे स्पष्ट बहुमत नाही. अशा त्रिशंकू परिस्थितीमुळे येथील प्रत्येक नगरसेवकाचे मत उमेदवारांसाठी निर्णायक ठरणार आहे. सुरुवातीला असे वाटले होते की, नगरसेवक आपापल्या पक्षाच्या आदेशानुसार मतदान करतील. मात्र, निवडणुकीत अपक्ष उमेदवारांच्या एन्ट्रीमुळे आता पक्षीय निष्ठा बाजूला सारून 'आर्थिक' गणितांना महत्त्व प्राप्त होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असल्याचा इतिहास आहे. अंजनगावचे अनेक नगरसेवक सध्या अशाच संधीच्या शोधात असल्याचे समजते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काही नगरसेवक आधीच एका आर्थिकदृष्ट्या प्रबळ असलेल्या अपक्ष उमेदवाराच्या संपर्कात आहेत. पक्षाच्या विरोधात जाऊन गुप्त मतदानाचा फायदा घेत आपला 'स्वार्थ' साधण्याची दाट शक्यता नगरसेवकांमध्ये दिसून येत आहे. काही दिवसांपूर्वीपर्यंत ज्या नगरसेवकांना कोणी विचारत नव्हते, त्यांना आता अचानक महत्त्व प्राप्त झाले आहे. मोठे उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी आता या नगरसेवकांच्या भेटीगाठी घेत आहेत. सुरुवातीला दुर्लक्षित वाटणाऱ्या या नगरसेवकांसाठी ही निवडणूक आता जणू काही लॉटरीच ठरली आहे. परिणामी, नगरपालिकेच्या वर्तुळात सध्या



विकासकामांपेक्षा 'निवडणुकीच्या वाटाघाटींची' चर्चा अधिक रंगताना दिसत आहे.आता या 'सुगीच्या दिवसात' कोण कोणाच्या गळाला लागतो आणि निवडणुकीच्या निकालात काय चमत्कार घडतो, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# आरोग्य व शिक्षण सुविधांच्या बळकटीकरणासाठी

## आयुक्तांची विविध ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिकेतर्फे शहरातील आरोग्य व शैक्षणिक सुविधा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी शहरातील विविध दवाखाने व शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन तेथील कामकाज, सुविधा, स्वच्छता व्यवस्था तसेच नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सेवांचा सविस्तर आढावा घेतला. या पाहणी दौऱ्यात आयसोलेशन दवाखाना, महानगरपालिका शाळा जेवड, महानगरपालिका शाळा बडनेरा तसेच मोदी हॉस्पिटलचा समावेश होता.



पाहणी दौऱ्याची सुरुवात आयसोलेशन दवाखान्यापासून करण्यात आली. यावेळी आयुक्त वर्षा लड्डा यांनी रुग्णांसाठी उपलब्ध वैद्यकीय सुविधा, उपचार व्यवस्था, औषधसाठा, मनुष्यबळाची उपलब्धता, स्वच्छता व्यवस्था तसेच रुग्णसेवेची गुणवत्ता यांची सखोल तपासणी केली. दवाखान्यातील विविध विभागांना भेट देऊन त्यांनी डॉक्टर, परिचारिका व कर्मचाऱ्यांशी संवाद साधत आवश्यक सूचना दिल्या. रुग्णांना वेळेत, दर्जेदार व परिणामकारक आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी यासाठी सर्व यंत्रणांनी अधिक जबाबदारीने कार्य करण्याचे निर्देश त्यांनी दिले. दवाखाना परिसरात स्वच्छता राखण्यासोबतच रुग्णांसाठी आवश्यक सुविधा अधिक सक्षम करण्यावर भर देण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

याच परिसरातील महानगरपालिका शाळेचीही त्यांनी पाहणी केली. शाळेच्या इमारतीची दुरुस्ती आवश्यक असल्याचे निदर्शनास आल्याने बांधकाम विभागाने तातडीने नियोजन करून आवश्यक दुरुस्तीची कार्यवाही सुरू करावी, असे निर्देश आयुक्तांनी दिले.

त्यानंतर मनपा शाळा जेवड येथे भेट देऊन शैक्षणिक वातावरण, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा, स्वच्छता व्यवस्था तसेच सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा घेतला. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून सुरू असलेल्या शाळेच्या बांधकामाची तपासणी करताना कामाची गुणवत्ता, दर्जा व वेळेत पूर्णत्व यावर विशेष भर देण्यात आला. सदर शाळा भविष्यात अमरावती जिल्ह्यातील आदर्श व उत्कृष्ट शाळा म्हणून विकसित व्हावी, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.यानंतर महानगरपालिका शाळा बडनेरा येथे विद्यार्थ्यांची उपस्थिती, अध्यापन पद्धती, मूलभूत सुविधा, शासकीय योजनांची अंमलबजावणी तसेच शैक्षणिक गुणवत्ता यांचा आढावा घेण्यात आला.

पाहणी दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात आयुक्त वर्षा लड्डा यांनी मोदी हॉस्पिटलला भेट देऊन तेथील विविध विभागांची पाहणी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, उद्यान अधीक्षक अजय विंचुरकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वाती कोवे, डॉ.देवेंद्र गुल्हाणे, डॉ.अश्विनी खडसे, मालमत्ता अधिकारी सचिन मांडवे, उपअभियंता शरद तिनखेडे, लक्ष्मण पावडे, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक शारदा गुल्हाणे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक व महानगरपालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

## संक्षिप्त

### बोरकरी नाल्यासाठी मंगरुळ दस्तगीर येथे बेमुदत उपोषण



**धामणगाव रेल्वे**-बोरकरी नाल्याचा कायमस्वरूपी प्रश्न मार्गी लागावा आणि स्थानिक नागरिकांना न्याय मिळावा या मागणीसाठी सोमवार १ जून पासून नागरिकांच्या वतीने तीव्र संताप व्यक्त करत सामूहिक प्राणांतिक उपोषण सुरू करण्यात आले आहे. उपविभागीय अधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनानंतरही बोरकरी नाल्याची समस्या न सोडविल्याने प्रशासनाच्या वारंवार दिलेल्या पोकळ आश्वासनांना कंटाळून हा टोकाचा निर्णय घेण्यात आल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले आहे. पावसाळ्यापूर्वी पाटबंधारे विभागाकडून शेतात पावसाचे पाणी शिरणार नाही, याकरिता तात्काळ दुरुस्ती करून देण्यात यावी. मागील वर्षी पूरसदृश कामकाजामुळे झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीची रक्कम निश्चित करून सर्व शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई मिळावी. आजवर नमूद घटलेल्या घटनेच्या संदर्भाने हलगर्जीपणा करणाऱ्या सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची खातेनिहाय चौकशी करून त्यांची सेवा पुस्तिकेत नोंद घेण्यात यावी. प्रशांत खंडारे यांच्या नेतृत्वाखाली उपोषण आधीच सुरू आहे, तर सुरू झालेल्या 'सामूहिक प्राणांतिक उपोषणात प्रशांत खंडारे, उमेश खांडेकर, अभिलाष लोमटे, राहुल लोमटे, उमेश मारोडकर, सुधाकर मोरे, पंकज खंडारे, उमेश शिसोदे, बंडू पचारे, विजय धोबे, एकनाथ भेदकर, गजानन खांडेकर, बबन महात्मे आणि सुरेशराव गोडसे या नागरिकांचा समावेश आहे.

### 'पुस्तक तुमच्या दारी' उपक्रमाला प्रचंड प्रतिसाद



**अमरावती**-वाचनाचा छंद मुलांना घडवतो . आजच्या काळात वाचन संस्कृती लोप पावते आहे . अशा वेळी श्री विठ्ठलानंद फिरते वाचनालयाच्या सहकार्याने पुस्तक तुमच्या दारी यासारखा स्तुत्य उपक्रम गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येत आहे हे सोपे कार्य नाही.असे उपक्रम राबविणे काळाची गरज आहे.कारण पुस्तकेच आपल्याला घडवितात , असे प्रतिपादन प्रा.चित्रा चौधरी यांनी केले.उपक्रमाचा समारोप खरकाडी पुरा येथे वाचन संस्कृती जोपासणाऱ्या रंजना छकन पांडे यांच्या निवासस्थानी संपन्न झाला. व्यासपीठावर प्रा चित्रा चौधरी,मुख्या.प्रसाद देशमुख,वाचनालय सचिव विनोद वैद्य आणि अनिता कुळकर्णी होते. त्यांचे स्वागत आसावरी टेकाळे , रंजना पांडे,अंकुश इंगोले यांनी केले.मुख्या प्रसाद देशमुख म्हणाले,भाषा ज्ञान, शब्दसंग्रह वाढवणारा हा छंद जोपासा,असे आवाहन मुख्या .प्रसाद देशमुख यांनी केले.अनिता कुळकर्णी आणि विनोद चौधरी यांनी देखील बालवाचकांचे कौतुक करून त्यांना भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.बाल वाचनालयाचा लाभ १२० मुलांनी घेत एक महिना या बाल वाचकांनी रोज नियमित वाचन केले. तसेच जिज्ञासा पोटे,जान्हवी शेरेकर, आस्था कढाणे,प्रशांत वायधनी यांनी मनोगत व्यक्त केले.संचालन आणि आभार प्रदर्शन सुजाता पांडे यांनी केले.

### श्री दत्तसंस्थान कुंभारवाडा येथे दत्तयागास प्रारंभ



**अमरावती**-श्री दत्त संस्थान कुंभारवाडा येथे अधिक मासनिमीत्त दत्त यागास यज्ञास धार्मिक वातावरणात प्रारंभ झाला. अधिक मासास अनन्य साधारण महत्व आहे या पुण्यपर्वात अनेक धार्मिक कार्यक्रम होत असतात हेच औचित्य साधत दत्त संस्थान येथे आज मुख्य पुरोहित वे. शा. सं. राजेंद्र शांडील्य यांचे समवेत ७ ब्रम्हवृंदाद्वारे मुख्य यजमान रोहीत बांडे व सौ. दिप्ती बांडे यांनी यज्ञाची सुरुवात केली. यावेळी संस्थानचे पदाधिकारी चंद्रशेखर हेबर्डे,प्रभाकर केवले,मनोज केवले, मधुकर साऊरकर, दिपक हुंडीकर,अनंत साऊरकर,धनंजय चतारे, अभिनेदन पेंढारी, सोमेश्वर गौड, नरेश अतकरे,प्रदीप खेडकर, सुनील जोशी, संदीप खेडकर, किरण साऊरकर, संजय भंडारजकर, अद्वैत साऊरकर, नितीन मराठे, नागोरावजी पुसदकर यांची प्रमुख उपस्थिती होता.

### पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळ्याचे ६ जून रोजी

**अमरावती** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत ६ जून, २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळ्याचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर दृकश्राव्य सभागृहात आयोजन करण्यात आले आहे. यासोबतच विभागातील विविध शैक्षणिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया देखील सुरु झाली आहे. आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत एम.ए. आजीवन अध्ययन व विस्तार, एम.ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा व व्यवस्थापन, एम.ए. समुपदेशन व मानसोपचार, एम.ए. योगशास्त्र, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा - मानसोपचार, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा - योगथेरपी, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा - इंग्लिश कम्युनिकेशन आदी अभ्यासक्रमांकरीता प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.तरी इच्छुकांनी विहित वेळेत आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी विद्यापीठाच्यावतीने केले आहे.

# ऊर्जेची तरतूद, पण शेतकरी चिंतेत

देशातील ऊर्जेच्या वाढत्या मागणीची पूर्तता करताना कार्बन फुटप्रिंट कमी करण्यासाठी अणुऊर्जेकडे वळण्या शिवाय पर्याय नाही. २०४७ पर्यंत ठरवलेले शंभर गिगावॅट ऊर्जेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी अणुऊर्जा प्रकल्पांमध्ये २५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक हवी आहे. दरम्यान, साखरेवरील निर्यातबंदीने साखर कारखाने कर्जबाजारी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्याच वेळी लंडनमध्ये इंग्रजांइतकीच भारतीयांची मालमत्ता उभी रहात असल्याची रंजक माहिती समोर आली आहे.

**भारताचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य**

भारताने २०४७ पर्यंत शंभर गिगावॉट अणुऊर्जा क्षमता उभारण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य निश्चित केले आहे; मात्र हे लक्ष्य गाठण्यासाठी केवळ राजकीय इच्छाशक्ती पुरेशी ठरणार नाही. त्यासाठी अभूतपूर्व आर्थिक गुंतवणूक, वेगवान प्रकल्प अंमलबजावणी, तांत्रिक आत्मनिर्भरता आणि दीर्घकालीन धोरणात्मक सातत्य आवश्यक असेल.

'द एनर्जी अँड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट' (टीईआरआय) यांनी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालात भारतासमोरील याच आव्हानांचा परामर्श घेतला आहे. या अहवालानुसार, २०४७ पर्यंत शंभर गिगावॅट अणुऊर्जा क्षमता निर्माण करण्यासाठी देशाला तब्बल २३ ते २५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करावी लागणार आहे. आजच्या घडीला भारताची अणुऊर्जा निर्मिती क्षमता केवळ ८.८ गिगावॉट इतकी आहे. सध्या सुरू असलेल्या आणि बांधकामाधीन प्रकल्पांची पूर्तता झाल्यास २०३०-३२ पर्यंत ही क्षमता सुमारे २२ गिगावॅटपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे; परंतु त्यानंतरचा टप्पा अधिक कठीण आणि निर्णायक ठरणार आहे. कारण उर्वरित कालावधीत शंभर गिगावॅटचे लक्ष्य गाठण्यासाठी दरवर्षी सरासरी ४.५ गिगावॅट इतकी नवीन क्षमता सातत्याने वाढवावी लागणार आहे. भारतीय ऊर्जा क्षेत्राच्या इतिहासात एवढ्या मोठ्या प्रमाणावर आणि एवढ्या वेगाने अणुऊर्जा विस्तार करण्याचा हा पहिलाच प्रयत्न असेल. अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे, की भारताने आतापर्यंत ज्या गतीने अणुऊर्जा प्रकल्प उभारले आहेत, त्या तुलनेत भविष्यातील अपेक्षित विस्ताराचा वेग अनेक पटींनी अधिक असेल. त्यामुळे केवळ पारंपरिक प्रशासकीय पद्धतींनी हे उद्दिष्ट साध्य होणे कठीण आहे. त्यासाठी जमीन संपादन, पर्यावरणीय मंजुरी, प्रकल्प वित्तपुरवठा, तांत्रिक उपकरणांची उपलब्धता, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि सुरक्षा विषयक मानके या सर्व बाबींमध्ये व्यापक सुधारणा कराव्या लागतील.

**ऊर्जा गरजांमध्ये वाढ**

भारताच्या ऊर्जा गरजा झपाट्याने वाढत आहेत. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि डिजिटल अर्थव्यवस्थेच्या विस्तारामुळे विजेची मागणी सातत्याने वाढणार आहे. त्याच वेळी कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी आणि हवामान बदलाच्या संकटाला उत्तर देण्यासाठी स्वच्छ ऊर्जेकडे वळणेही अपरिहार्य झाले आहे. अणुऊर्जेची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे ती कमी कार्बन उत्सर्जनासह मोठ्या प्रमाणात वीज निर्माण करू शकते. कोळशावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि ऊर्जा सुरक्षेला बळकटी देण्यासाठी भारताला अणुऊर्जेचा विस्तार करणे आवश्यक आहे; मात्र या क्षेत्रातील गुंतवणूक अत्यंत भांडवली स्वरूपाची असते. एका मोठ्या अणुऊर्जा प्रकल्पासाठी हजारो कोटी रुपयांची आवश्यकता भासते आणि त्याची उभारणी पूर्ण होण्यासाठी अनेक वर्षे लागतात. त्यामुळे दीर्घकालीन वित्तपुरवठा आणि धोरणात्मक स्थैर्य ही यशाची प्रमुख अट ठरणार आहे. भारताच्या अणुऊर्जा क्षेत्राचा आतापर्यंतचा इतिहास पाहिला, तर या क्षेत्राचा विकास तुलनेने मंद गतीने झाला आहे. यामागे तांत्रिक निबंध, आंतरराष्ट्रीय निबंध, इंधन पुरवठ्यावरील मर्यादा आणि स्थानिक विरोध अशा अनेक कारणांचा प्रभाव राहिला आहे. २००८ मधील भारत-अमेरिका अणुकरारानंतर परिस्थितीत काही प्रमाणात बदल झाला असला तरी अपेक्षित गतीने विस्तार झालेला नाही. आता पुढील दोन दशके भारताच्या ऊर्जा धोरणासाठी निर्णायक असतील. भारताने योग्य वेळी योग्य गुंतवणूक आणि धोरणात्मक निर्णय घेतले, तर अणुऊर्जाक्षेत्र देशाच्या हरित विकासाचा मजबूत पाया बनू शकते. अन्यथा, शंभर गिगावॉटचे लक्ष्य केवळ कागदावरचे स्वप्न ठरण्याची भीती नाकारता येणार नाही.



**देशातील ऊर्जेच्या वाढत्या मागणीची पूर्तता करताना अणुऊर्जेकडे वळताना २०४७पर्यंत ठरवलेले शंभर गिगावॅट ऊर्जेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी अणुऊर्जा प्रकल्पांमध्ये २५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक हवी आहे. दुसरीकडे, साखरेवरील निर्यातबंदीने साखर कारखाने कर्जबाजारी होण्याचा धोका निर्माण झाला. त्याच वेळी लंडनमध्ये इंग्रजांइतकीच भारतीयांची प्रॉपर्टी उभी रहात असल्याची रंजक माहिती समोर आली आहे.**

**केंद्राची साखर निर्यातीवर बंदी**

अर्थनगरीतील दुसरी लक्षवेधी बातमी म्हणजे केंद्र सरकारने ३० सप्टेंबरपर्यंत साखरेच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. देशांतर्गत बाजारात साखरेचा पुरवठा वाढवून दर नियंत्रणात ठेवण्याच्या उद्देशाने सरकारने हा निर्णय घेतला असला, तरी साखर उद्योगातील तज्ज्ञांनी अचानक घेतलेल्या या निर्णयावर तीव्र टीका केली आहे. या निर्णयामुळे देशांतर्गत बाजारात साखरेचे दर मोठ्या प्रमाणात घसरतील, साखर कारखान्यांवरील कर्जाचा भार वाढेल आणि त्याचा थेट फटका ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बसेल. देशांतर्गत बाजारात साखरेचे दर आधीच घसरू लागले आहेत. अचानक लागू करण्यात आलेल्या निर्यातबंदीमुळे जागतिक बाजारपेठेत भारतीय साखर उद्योगाची प्रतिमा खराब होईल.

भारतातून मुख्यतः श्रीलंका, बांगला देश, अफगाणिस्तान, नेपाळ आणि अरब देशांना साखरेची निर्यात केली जाते. या बंदीमुळे या देशांबरोबर आधीच व्यवहार निश्चित केलेल्या व्यापाऱ्याचे मोठे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

निर्यात थांबल्यामुळे साखर कारखान्यांच्या रोख प्रवाहावर परिणाम होईल आणि शेतकऱ्यांना द्यावयाच्या 'एफआरपी' अर्थात 'फेअर अँड रेम्युनरेटिव्ह प्राइस'च्या देयकांमध्ये मोठा अडथळा निर्माण होऊ शकतो. केवळ महाराष्ट्रातील साखर कारखान्यांवर एफआरपीची सुमारे १,५५० कोटी रुपये थकबाकी आहे, तर देशभरात ही थकबाकी जवळपास बारा हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. अशा परिस्थितीत कारखान्यांना शेतकऱ्यांचे पैसे वेळेवर देणे अत्यंत कठीण होणार आहे. ऊस लागवडीचे क्षेत्र कमी होणार नसले, तरी शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनातून अपेक्षित नफा मिळणे कठीण होईल.

✍ **महेश देशपांडे**

सरकारने साखरआधारित इथेनॉल खरेदी वाढवावी, अशी मागणी साखर उद्योगातून केली जात आहे. सध्या पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रण केले जाते, ते वाढवून ३० टक्के करावे, त्यामुळे साखर कारखान्यांना आर्थिक आधार मिळू शकेल, अशी मागणीही जोर धरत आहे.

आता एक लक्षवेधी बातमी. लंडनमध्ये आज इंग्रजांइतक्याच प्रमाणात भारतीयांचीही मालमत्ता दिसून येत आहेत. मेफेअर आणि मेरीलेबोनसारख्या उच्चभ्रू भागांपासून लंडनच्या बाहेरील परिसरांपर्यंत भारतीयांचा प्रभाव वाढला आहे. चांगल्या शाळा, मोकळी जागा आणि परवडणारे बजेट लक्षात घेऊन भारतीय आता नॉर्थ लंडनमधील हॅरो, साउथ लंडनमधील क्रॉयडन आणि वेस्ट लंडनमधील हाउंसलोपर्यंत मोठ्या प्रमाणात स्थायिक होत आहेत. भारतीयांची लंडनमधील वाढती गुंतवणूक ही केवळ आर्थिक कारणांमुळे नाही, तर त्याला सांस्कृतिक मानसिकताही मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहे. ज्या देशाने कधी काळी भारतावर राज्य केले, त्या देशात मालमत्ता असणे हे आज स्थैर्य, प्रतिष्ठा आणि यशाचे प्रतीक मानले जाते. मुलांचे शिक्षण, व्यावसायिक संबंध, सुरक्षित परतावा आणि पुढील पिढ्यांसाठी संपत्ती निर्माण करण्याची भारतीय परंपरा ही यामागील मुख्य कारणे मानली जातात. बहुतेक भारतीय गुंतवणूकदार तीन ते पाच कोटी रुपयांच्या बजेटमध्ये गुंतवणूक करत असून, एक ते तीन बेडरूमचे फ्लॅट सर्वाधिक लोकप्रिय आहेत; मात्र हा कल केवळ घरांपुरता मर्यादित नाही. नव्याने परदेशात स्थायिक होणारे काही लोक गुंतवणूक करत आहेत, तर काही श्रीमंत भारतीय लंडनमधील ऐतिहासिक आणि अतिमहागड्या मालमत्ता विकत घेत आहेत. आता भारतीय गुंतवणूकदार हॉटेल्स, वृद्धाश्रम, स्टुडंट हाउसिंग आणि व्यावसायिक प्रकल्पांमध्येही मोठ्या प्रमाणात पैसा गुंतवत आहेत; जेणेकरून दीर्घकालीन उत्पन्न मिळू शकेल.

**लंडन भारतीयांसाठी आकर्षण**

भारतीय गुंतवणूकदार केवळ दिखाव्यासाठी मालमत्ता घेत नाहीत, त्यांचा भर भाडे उत्पन्न आणि भविष्यातील किंमतवाढ यावर असतो. एका स्थानिक एजंटच्या मते, भारतीय गुंतवणूकदार पिढ्यानपिढ्यांचा विचार करून गुंतवणूक करतात. त्यामुळे ते अल्पकालीन नफ्यापेक्षा उद्यानांच्या जवळची घरे किंवा पेंटहाउससारख्या मालमत्तांना पसंती देतात. लंडन भारतीयांसाठी आकर्षण ठरण्याचे आणखी एक मोठे कारण म्हणजे ते शिक्षण आणि व्यवसायाचे जागतिक केंद्र मानले जाते. येथील इंग्रजी भाषा आणि कायदेशीर व्यवस्था भारतीयांसाठी परिचित आहे. ब्रिटिश सत्ताकाळामुळे भारतीयांना ब्रिटिश इंग्रजी आणि तेथील प्रणालीशी जवळीक वाटते. महागाई आणि वाढत्या खर्चामुळे तरुणांसाठी घर खरेदी करणे काहीसे कठीण झाले असले तरी लंडनमध्ये घर असावे, हे स्वप्न आजही अनेक भारतीय मोठ्या उत्साहाने पाहत आहेत.

# जनतेचा पैसा अपात्र बहिणींना का वाटला ?

'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत दरमहा महिलांना दिल्या जाणाऱ्या धनामुळे सरकारी तिजोरीवर प्रचंड प्रमाणात ताण येत आहे. तो ताण कमी करण्यासाठी सरकारने ज्या महिलांच्या खात्यात दरमहा पैसे येत आहेत अशांना इकेवायसी करण्याचे आवाहन केले. ज्यांची मिळकत अधिक होती अशा महिलांनी इकेवायसी करणे टाळले. शिवाय योजनेअंतर्गत घालून दिलेल्या अटीनुसार छाननी केली असता अपात्र ठरलेल्या ८० लक्ष बहिणींना दरमहा पैसे येणे बंद होणार आहे. लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या अपयशाचा परिणाम विधानसभा निवडणुकीवर व्हायला नको म्हणून निवडणुकीच्या तोंडावर सरकारने घिसाडघाईने ही योजना आणली. मागील दीड वर्षाहून अधिक काळ सुरु असलेल्या या योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवर मोठ्या प्रमाणात भार पडत आहे. योजना मध्येच बंद करून सरकारची नाचक्की व्हायला नको म्हणून आजतागायत ही योजना सुरु ठेवण्यात आली आहे; मात्र ही योजना सुरु ठेवण्यासाठी अन्य अनेक योजनांचा निधी सरकारने कमी केल्याचे बोलले जाते. सणासुदीच्या निमित्ताने दिला जाणारा 'आनंदाचा शिधा' लृप्त झाला आहे. रेवडी संस्कृतीला पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमीच विरोध करत असतात. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' म्हणजे रेवडीचे वाटप नाहीतर काय आहे असाही प्रश्न त्यावेळी विरोधकांकडून करण्यात आला होता. 'लाडकी बहीण' योजना सुरु केली तेव्हा राज्यावर ७ लाख कोटी रुपयांचे कर्ज होते आज हेच कर्ज ११ लाख कोटींच्या घरात गेले आहे. हा आकडा महाराष्ट्रापेक्षा आकाराने आणि लोकसंख्येने अधिक असलेल्या राज्यांवरील कर्जापेक्षा कितीतरी अधिक आहे.

यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस होणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे ज्यामुळे अनेक भागांत दुष्काळ पडण्याची दाट शक्यता आहे. थोड्या थोडक्या कर्जासाठी शेतकरी मृत्यूला कवटाळत आहेत. बेरोजगारीचा प्रश्न आ वासून उभा आहे, अशा परिस्थितीत केवळ सरकारची इभ्रत राखण्यासाठी राज्यावरील कर्जाचा आकडा का वाढवला जात आहे असा प्रश्न आज अनेकांना पडला आहे. माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ महायुती सरकारला विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य




संस्थांच्या निवडणुकांत मोठ्या प्रमाणात मिळाला असे राजकीय तज्ज्ञांचे मत आहे. या योजनेअंतर्गत जो पैसा राज्यातील माता भगिनींना प्रतिमाह दिला जातो तो महायुतीतील घटक पक्षांच्या तिजोरीतून नव्हे, तर सरकारी खजिन्यातून दिला जातो. सर्वसामान्य नागरिक दिवसभर राब राब राबून महिन्याला जे वेतन कमावतो त्या वेतनातून कररूपाने पैसा सरकारी खजिन्यात जमा होत असतो. या जनतेच्या घामातुन आलेल्या पैशाचा विनियोग योग्य रीतीनेच व्हायला हवा. त्यासाठी योग्य नियोजन करण्याचे काम सरकारचे असते. मात्र माझी लाडकी बहीण योजना अमलात आणताना सरकारमधील घटक पक्षांनी केवळ निवडणूक डोळ्यासमोर ठेवून हा पैसा कोणतीही छाननी न करता मुक्त हस्ताने वाटला. या योजनेसाठी सरकारने जे निकष ठरवले होते त्या निकषात बसणाऱ्या महिलांनीच खरेतर योजनेसाठी अर्ज करणे अपेक्षित होते; मात्र सरकारी सेवेत गलेलठ्ठ वेतन घेणाऱ्या, घरात मोलकरीण ठेवणाऱ्या, चारचाकी गाडीतून फिरणाऱ्या महिलांनीही या योजने अंतर्गत अर्ज करून या योजनेचा गैरफायदा घेतला.

✍ **जगन घाणेकर**

काही ठिकाणी तर पुरुषांनी महिलांच्या नावाने अर्ज दाखल करून या योजनेचा पैसे लाटला.

ही केवळ सरकारचीच फसवणूक नसून देशाच्या विकासासाठी आपल्या मिळकतीमधून कररूपाने सरकारला धन देणाऱ्या प्रत्येक सामान्य नागरिकांचीही फसवणूक आहे, त्यामुळे अशा महाभागांवर कारवाई करून त्यांच्याकडून दंडासहित रक्कम वसूल करायला हवी.

# ऊर्जा वापरातील विषमता चिंताजनक

अलीकडेच जागतिक ऊर्जा व्यवस्थेमध्ये एक अत्यंत अस्वस्थ करणारे चित्र ऑक्सफॅमच्या अहवालातून जगापुढे मांडण्यात आले. एकीकडे जगभरातील कोट्यवधी कुटुंबे वाढत्या वीज बिलाच्या ओझ्याखाली दबत आहेत. तर दुसरीकडे इंधन कंपन्यांचा नफा प्रत्येक सेकंदाला नवनव्या उंचीवर जात आहे. २०२६ मध्ये जगातील सहा सर्वात मोठ्या इंधन कंपन्या दर सेकंदाला तब्बल २९६७ डॉलर म्हणजे सुमारे अडीच लाख रुपयांचा नफा कमावणार आहेत. या अहवालामुळे आर्थिक विरोधाभासाचे चित्रही स्पष्ट झाले आहे. मागील वर्षाच्या तुलनेत या कंपन्यांना नफ्यामध्ये दररोज सुमारे साडेतीनशे कोटी रुपयांची वाढ होत आहे. आणि एकत्रित वार्षिक नफा ८.९ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. ही केवळ कागदावरील आकडेवारी नसून तिचा खरा अर्थ समजून घेण्यासारखा तुलनात्मक विचार होणे गरजेचे आहे.

या इंधन कंपन्यांच्या नफ्यातून अफ्रीका खंडातील पाच कोटी लोकांना सौर ऊर्जा उपलब्ध करून देता येऊ शकेल. जे जगभरातील देश आज ऊर्जा संकटाशी झुंज देत आहेत. तिथे हा नफा प्रकाश पोहोचवू शकतो. मात्र, तसे न होता सध्या हा अफाट पैसा मूठभर लोकांच्या संपत्तीत आणखी भर घालत चालला आहे. ऑक्सफर्म कंपनीने सात देशांमध्ये केलेल्या सर्वेक्षणात असे आढळले की, ती तिप्पट अधिक

✍ **मधुकर चुटे**

लोकांना असे वाटते कीं, सरकारांनी जीवाश्म इंधनाचे उत्पादन वाढवण्याऐवजी नवीकरणीय ऊर्जेत गुंतवणूक करावी. म्हणजे सामान्य माणसांना भविष्याचा मार्ग माहीत आहे. मोठ्या तेल, गॅस कंपन्यांना नफ्यावर अधिक कर लावला जावा आणि त्या पैशातून स्वच्छ ऊर्जेच्या दिशेने वाटचाल व्हावी, असे बहुसंख्य लोकांचे मत पडले. परंतु, आंतरराष्ट्रीय स्तरावरील इंधन कंपन्या त्याच्या अगदी उलट दिशेने वाटचाल करत आहेत. ही बाब जगभरातील लोकशाहीवादी देश आणि लोकांसाठी गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ऊर्जा संकट हे केवळ आर्थिक समस्येपुरते मर्यादित राहिलेले नाही. बहु-राजकीय अस्थिरतेचे इंधनाच्या किमती अनिश्चित केल्या आहेत. सामान्य कुटुंबावर ऊर्जेच्या किमतीचा भर असह्य होत चालला आहे. तिसऱ्या जगाची तर परिस्थिती आणखीनच गंभीर आहे.

जगभरात सुरु असलेली ऊर्जा वापरातील विषमता जागतिक चिंतेचा विषय झाला आहे. नैसर्गिक साधनसंपत्ती ओरबाडून ठराविक श्रीमंत लोक अधिक श्रीमंत होत आहेत. तर घरामध्ये पुरेशी वीज नसल्याने गरीब कुटुंबांची परवड सुरु असल्याचे विदारक चित्र आहे.

नागपूर
मो.९४२०५६६४०४

# प्रार्थना !कुणी कुणाकडे !!...

***मंदिर, मस्जिद, गुरुद्वारे।***
***चर्च, विहार घरदारे।।***
***जेथे प्रार्थी भाकती सारे।***
***थकलो म्हणून बिचारे।।***

माणसाला थकवा निचरा करण्यासाठी काही तरी निवांतपणाचा आधार हवा असतो. थकवा हा देहाचा असेल तर आराम असावा. कमजोरी असेल तर त्याला पुष्टी करणारा आहार असावा. आहाराला पचवणारा व्यायाम अथवा श्रमाचा सराव असावा. अशी रचना सशक्त मानवी देहासाठी आहे. त्यासाठी संस्कारित करणारी व्यवस्था असल्यास घरदार(कुटुंब)ते समाजव्यवस्था सुदृढ राहू शकते असे उदाहरण जगाच्या पाठीवर विकसित देशात बघायला मिळते ज्यांचे आयुर्मान निसर्ग नियमाच्या पालनामध्ये समृद्ध आहे. उदा. जपान, भूतान सारखी काही देश आहेत.

मानवाला देहासोबत जेव्हा मनोभाव असतो, तेव्हा तो मानवी कक्षेत उन्नतीच्या उंबरठ्यावर येऊन त्याच्या विकासाची वाट मोकळी करु लागतो. मन हे मानवी जीवनाचे आस्वादन केंद्र आहे. त्याला कर्मेंद्रिये व ज्ञाणेंद्रिये द्वारे जे प्राप्त होते त्यानुसार त्याची कार्यप्रणाली सुरू असते. त्याद्वारे मनुष्य आपली हालचाल करतो.

'मन धावे तिकडे धावे तन, हे तर सर्वसामान्य वर्तन, याचे होईल चिंतन मनन, तेव्हा येईल जान मानव कार्याची !! असा प्रवास सर्वसाधारण जगण्यात असतो. मात्र मनाची स्थिती स्थिरावली की मानवी विकासाची गती स्थित होऊन मानवाच्या जीवनाचा उद्देश पूर्ण होतो. म्हणून मानवी जीवनाचा उद्देश ओळखण्यासाठी जे काही करावे लागते त्याचा अभ्यास, सराव किंवा त्याचा परिपाठ ज्या ज्या महानुभांनी मांडला, त्याला उपासना किंवा आराधना म्हणून आपल्या भारतीयपरंपरेत प्रचलित केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे विसाव्या शतकातील अत्यंत उच्च कोटीचे महानुभाव होते. त्यांनी आपल्या आयुष्यात अखिल मानव जीवनाचा उद्देश स्पष्ट करून दिला. त्यासाठी त्यांनी परिपाठ घालून दिला. पहाटे ध्यान, सांजवेळी प्रार्थना.

'ध्यान का पाठ' मध्ये त्यांनी मानवी ध्येय स्पष्ट केले.

अंत में तुझं में समरस हो जाये यही हमारा ध्येय हैं, उद्देश हैं त्इसके लिये तुझ को स्मरके निश्चय करते हैं प्रतिज्ञा करते हैं.. ही त्यांच्या भावनांची उत्कंठा मानवी उद्देशाचा परिचय देते. तर सांजवेळी प्रार्थना अष्टकात मानवी जीवनाच्या व्यवहारचे स्वर्गसम संसार करण्याचे प्रतिपादन केले. ज्याचा उद्देश पूर्ण होण्यासाठी हो छोडे नहीं घरबार पर, हो मस्त गुरु चरणार में. अशी भावपूर्ण प्रार्थना गुरुदेवला संबोधित करतात.



गुरु म्हणजे मोठा, दीर्घ, विस्तारित, विशाल अशा सर्वमान्य अर्थाचा शब्द. लघु म्हणजे लहान, एकक किंवा अंश अशा अर्थाचा शब्द. त्यामुळे लघु गुरु ची ओळख सर्वांस आहे.

म्हणून गुरु देव म्हणजे मोठा देव. देव म्हणजे देणारा अशी सहज समजणारी भाषा तुकडोजी महाराजांनी सर्वसामान्यांना समजून देण्यासाठी मांडली. त्याचा आधार घेऊन आपल्या जीवनाचा उद्धार, विकास, उन्नती, जे काही ध्येय उराशी बाळगून पशुयोनीतून आलेला मानव करू शकतो. त्यासाठी त्याला संस्कारित करण्यासाठीची प्रणाली सामुदायिक स्वरूपात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी उपलब्ध करून दिली. त्यासाठी ग्रामगीतेत त्यांनी प्रमाण दिले आहे.

मानव विश्व कुटुंबाचा घटक ।ऐसे समजोनि वर्तावे सम्यक । शक्ती द्यावया प्रार्थवी भाक । शक्तिवंता पुढे ।।

तेव्हा प्रार्थना कुणी कुणाकडे करावी याचा विचार करणारी प्रवृत्ती समाजात विकसित झाली नसल्याने नाना पंथ, भिन्न धर्म, जात पात ही मानवी समाजाची कपात होत आहे. त्यासाठी सामुदायिक जीवनाची एकरूपता विधात्याकडे आर्तरूपाने करणारी प्रणाली म्हणजे प्रार्थना. प्रार्थना ही स्वार्थ साधण्याची भीक नसून ती सर्वार्थ साधण्याची भाक आहे.

सर्वार्थ म्हणजे तन, मन, धन समृद्ध होण्यासाठी सृष्टीतील सकल संसाधनांचा उपयोग सर्वांच्या पोषणार्थ व्हावा. त्यापोषणातून सर्वांचाविकास व्हावा ही सामुदायिक धारणा सामाजिकस्तरावर पूर्ण होऊ शकते. त्यासाठी मानवी उद्देश समजून घेणे प्रत्येक माणसाला गरजेचे आहे. म्हणून महात्मे, महा मानव, महानुभावी हे त्या उद्देशाची ओळख करून देण्यासाठी मानवी परंपरेत वसवली आहे. फक्त त्यांचा अभ्यास होण्याची गरज आहे.

संत साहित्य त्याचा आधार आहे. साहित्य ज्यांना समजले ते प्रार्थना करू शकतात ज्यांना समजले नाही त्यांना...

तीच प्रार्थना लघु गुरु ची एकरुपात पूर्ण करू शकते. म्हणून लघु ने गुरुमध्ये समावेशित होण्यासाठी केलेली आर्त भावनेतील भाक म्हणजे प्रार्थना. ज्याला राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सार्वजनिक पटलावर

✍ **डॉ. प्रवीणकुमार राऊत**

सामुदायिक प्रार्थना म्हणून त्यांनी निर्माण केलेल्या प्रत्येक आश्रमात सुरू केली होती. त्याच प्रार्थनेची व्याप्ति राष्ट्रसंत तुकडीजी महाराजांनी गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने सामुदायिक प्रार्थना ही किती गोड ही प्रणाली म्हणून रुजवली.

शेवटी त्याला जय गुरु! या महत्तम संबोधनाने वंदनीय केले. कारण गुरु हा व्यापक वस्तुस्थिती दर्शक शब्द संस्कार वहन करतो. तेव्हा प्रार्थना कुणी कुणाकडे करावी ह्याचे उदाहरण स्पष्ट करताना ज्याने त्याने आपले अनुभव पडताळणी करणे हीच माझी सामाजिक प्रार्थना आहे.

प्रार्थना ही आर्त भावना असल्याने त्याबद्दल ची संवेदना असणे आवश्यक सुद्धा आहे. त्याच संवेदनशीलतेचा आधार सर्वहीतार्थ, बहुजन सुखाय बहुजन हिताय असेल तर त्या संवेदना प्रार्थनेचे रूप धारण करते. कारण त्या संवेदना सम वेदनाचा भाव होऊन सर्वांच्या भावना समान स्तरावर येतात. त्यावेळी आपल्या व्याप्तीचा प्रवास सुरू होऊन लघू गुरु चे प्रमाण समान होऊन उद्देशपूर्ती होते. पूर्णमदः पूर्णमिदम ह्या श्लोकाची आठवण येते. कारण याची पूर्तता सुद्धा सर्वेत्र सुखेन संतू या प्रार्थनेची परंपरा जोडते. त्यामुळे प्रार्थना करताना कुणी कुणाकडे करण्यासाठी तयार आहे याची निश्चिती होणे आवश्यक आहे. तेव्हाच त्या प्रार्थनेचे फलित आहे. ज्याला विकासाच्या गतीची ऊर्जा उपलब्ध झालेली असेल. त्याचे सामुदायिकीकरण किंवा केंद्रीकरण एकच ऊर्जा प्रवाहित करेल. हीच प्रार्थना समाज, शासन आणि जन रीतीचे माध्यम असेल. त्यासाठी आपापल्या भूमिका निश्चित असल्यास जागतिक किंवा संसारिक रंग मंचावर आयुष्यभराच्या कालावधीत मिळालेल्या जीवनाचा खेळ लिलया आणि रंजक होईल. ज्याचा आनंद आपणच द्रष्टा म्हणून या भूमांचावर घेऊ शकतो यासाठी विश्वारचनाराकडे प्रार्थना करण्याचा हक्क सर्वांना आहे. जन्मतः आपला नाट्य प्रवेश झाला. मृत्यू हा प्रवेश संपण्याची सूचना आहे. तेव्हा हे प्रवेश संबंधित पात्राशी सुसंवादित व सलोख्याचे राहतील ही प्रार्थना सुद्धा लक्षात असावी म्हणून प्रार्थना हा आर्त भाव प्रतीकांशिवाय स्वकेंद्रित असल्यास ती खरी प्रार्थना फलित होण्याची शास्वती महानुभावी देत आलेत. नुकत्याच सामुदायिक प्रार्थना उपक्रमाच्या निमित्ताने उद्देशकडे लक्ष गेले. त्याचा मनोभाव विस्तृत करण्याचा हेतू जनता जनार्दन व हरिपद अन् रवि (अंशू) असलेल्या मानवाकडे उत्तरदेई आहे, अशी



# बेघर २१५ कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी आ. साजिद खान पठाण यांचा पुढाकार

## जिल्हाधिका-यांसोबत बैठक ; तात्पुरत्या निवा-यासह कायमस्वरूपी पुनर्वसनाचे आश्वासन

■ प्रतिनिधी | अकोला ■

*रेल्वे प्रशासनाच्या अतिक्रमण हटाव कारवाईमुळे बेघर झालेल्या तारफैल आणि गडंकी परिसरातील २१५ कुटुंबांच्या पुनर्वसनाचा प्रश्न अखेर प्रशासनाच्या पातळीवर गांभीर्याने चर्चिला गेला. ऐन पावसाळ्याच्या तोंडावर उघड्यावर आलेल्या या कुटुंबांच्या प्रश्नासाठी आक्रमक भूमिका घेत आमदार साजिद खान पठाण यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष बैठक आयोजित करून प्रशासनाचे लक्ष वेधले. त्यांच्या पाठपुराव्यानंतर जिल्हाधिकारी यांनी तातडीने तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था करण्याबरोबरच कायमस्वरूपी पुनर्वसनासाठीही सकारात्मक पावले उचलण्याचे आश्वासन दिले.*

दोन दिवसांपूर्वी रेल्वे प्रशासनाने तारफैल परिसरातील १७० आणि गडंकी येथील ४५ अशा एकूण २१५ कुटुंबांवरील अतिक्रमण हटाव कारवाई केली. परिणामी अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेली ही कुटुंबे एका क्षणात बेघर झाली. सोमवारी सायंकाळी झालेल्या अवकाळी पावसाने या कुटुंबांची झालेली परवड पाहता त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे.

याच पार्श्वभूमीवर आ. पठाण यांनी जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन प्रभावित नागरिकांचे पुनर्वसन तातडीने करण्याची मागणी केली. यावेळी त्यांनी प्रशासनाला यापूर्वी झालेल्या बैठकींची आठवण करून दिली. रेल्वेच्या जागेवरील अतिक्रमण हटविण्यापूर्वी संबंधित कुटुंबांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय पूर्वी अनेक बैठकींमध्ये घेण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात पुनर्वसनाची प्रक्रिया न राबविता अतिक्रमण हटविण्यात आल्याने शेकडो कुटुंबांवर संकट कोसळल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

आ. पठाण यांनी प्रभावित कुटुंबांना तात्काळ शहरातील शासकीय अथवा ई-क्लास जमिनीवर जागा उपलब्ध करून



देण्याची मागणी केली. त्याचबरोबर तात्पुरत्या स्वरूपात का होईना, नागरिकांना राहण्यासाठी जागा देऊन कच्चे बांधकाम उभारण्याची परवानगी देण्यात यावी, अशी आग्रही भूमिका त्यांनी मांडली. पुढे सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून या कुटुंबांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

बैठकीत जिल्हाधिकारी यांनीही संवेदनशील भूमिका घेत तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले. तसेच कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी आवश्यक प्रस्ताव तातडीने तयार करून हा विषय 'हार्ड अँड फास्ट बेसिस'वर मार्गी लावण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. पुनर्वसन प्रक्रियेत महापालिकेची भूमिका महत्त्वाची राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीस महापालिका, भूमी अभिलेख विभाग, उपविभागीय दंडाधिकारी कार्यालयाचे अधिकारी, प्रभावित नागरिकांचे शिष्टमंडळ तसेच माजी नगरसेवक मोहम्मद इरफान, समाजसेवक मोईन खान, नगरसेवक गुड्डू पठाण, युसुफ खान आदी उपस्थित होते.

### पुनर्वसनाशिवाय कारवाई न करण्याचा होता निर्णय

तारफैल परिसरातील रेल्वे जागेवरील अतिक्रमणाचा विषय गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत होता. यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालय आणि महापालिका स्तरावर विविध बैठका झाल्या होत्या. सन २०१८ मध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महापौर, आमदार, पोलीस अधीक्षक, विरोधी पक्षनेते, रेल्वे व भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी उपस्थित होते. त्या बैठकीतही प्रभावित कुटुंबांचे पुनर्वसन केल्यानंतरच अतिक्रमण हटविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र त्याची अंमलबजावणी झाली नाही आणि आता शेकडो कुटुंबे बेघर झाल्याने प्रशासनासमोर पुनर्वसनाचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

### 'बेघर कुटुंबांना न्याय मिळवून देणार' : आ. पठाण

'तारफैल आणि गडंकी येथील नागरिक अनेक वर्षांपासून तेथे वास्तव्यास आहेत. पुनर्वसनाची व्यवस्था न करता त्यांना बेघर करणे अन्यायकारक आहे. या कुटुंबांना तातडीने निवारा मिळावा आणि त्यांचे कायमस्वरूपी पुनर्वसन व्हावे यासाठी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणार,' अशी भूमिका आ. साजिद खान पठाण यांनी बैठकीनंतर व्यक्त केली.

---

# वादळी वा-याचा फटका: सौरऊर्जा प्रकल्पाचे पॅनल उडाले, शेतक-याचे लाखोंचे नुकसान

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील चतारी परिसरात सोमवारी (१ जून) सायंकाळी आलेल्या वादळी वाऱ्याने चांगलाच कहर केला. या वादळात शेतकरी श्रीकृष्ण तुकाराम लासुरकर यांच्या शेतातील सौरऊर्जा प्रकल्पाचे पॅनल उडून गेल्याने मोठे नुकसान झाले आहे. या घटनेमुळे शेतातील वीजपुरवठा खंडित झाला असून सिंचन व्यवस्थेवरही परिणाम झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चतारी परिसरातील विशेष सर्वे क्रमांक ७५/२ मधील शेतात सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला होता. सोमवारी सायंकाळी अचानक वेगाने वाहणाऱ्या वादळी वाऱ्यामुळे प्रकल्पातील पॅनल जागेवरून उखडून दूर फेकले गेले. त्यामुळे संपूर्ण यंत्रणेला फटका बसला असून शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे



नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या नुकसानीमुळे शेतातील विद्युत पुरवठा बंद पडला आहे. परिणामी पिकांना पाणी देण्याचे काम ठप्प झाले असून शेतकऱ्यांसमोर नव्या अडचणी उभ्या ठाकल्या आहेत. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पिकांना नियमित पाण्याची आवश्यकता असताना सिंचन व्यवस्था विस्कळीत झाल्याने चिंता वाढली आहे.

दरम्यान, संबंधित कंपनीने तातडीने घटनास्थळी पाहणी करून पंचनामा करावा व नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी श्रीकृष्ण लासुरकर यांनी केली आहे. तसेच प्रशासनानेही या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा, अशी अपेक्षा परिसरातील शेतकरी व्यक्त करीत आहेत.

### वादळी वाऱ्यामुळे वाढल्या शेतकऱ्यांच्या चिंता

अवकाळी वादळी वाऱ्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने शेतकरी वर्ग चिंतेत आहे. शेतीसाठी उभारण्यात आलेल्या सौरऊर्जा प्रकल्पांनाही नैसर्गिक आपत्तीचा फटका बसत असल्याने अशा प्रकल्पांच्या सुरक्षेसाठी अधिक मजबूत उपाययोजना करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

---

# वादळी वा-यासह पावसाचा तडाखा ; केळी, संत्रा व लिंबू बागांचे मोठे नुकसान

## त्वरित पंचनामे करून मदत जाहीर करण्याची शेतकऱ्यांची मागणी

■ प्रतिनिधी | अकोट ■

उमरा मंडळातील पिंप्री जैनपूर, बेलुरा, पिंप्री खुर्द, गोखी व दौऊतपूर परिसरात सोमवारी (दि. १ जून) सायंकाळी झालेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने शेतकऱ्यांच्या हाती आलेले पीक हिरावून नेले आहे. विशेषतः केळी, संत्रा, लिंबू व इतर फळपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

वादळी वाऱ्याच्या तडाख्याने काढणीस आलेली तसेच वाढीच्या अवस्थेतील केळीची हजारो झाडे उन्मळून पडली असून अनेक शेतांमध्ये संपूर्ण केळी बागा जमीनदोस्त झाल्याचे चित्र आहे. संत्रा व लिंबू बागांनाही मोठा फटका बसला असून फळगळ आणि फांद्या तुटल्याने उत्पादनावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आधीच वाढत्या उत्पादन खर्चामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना या नैसर्गिक आपत्तीमुळे मोठा आर्थिक फटका बसला आहे. त्यामुळे



नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शासनाने विशेष आर्थिक मदत जाहीर करावी, तसेच विमा कंपनीच्या प्रतिनिधींमार्फत त्वरित सर्वेक्षण करून केळी पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना देण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी शेतकऱ्यांनी तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख दिलीप बोचे, ज्येष्ठ नेते साहेबराव भगत, ज्ञानेश्वर ढोले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर मानकर यांच्यासह संतोष भगत, परीक्षित बोचे, जयकुमार भगत, श्रीकृष्ण मानकर, अनंता भगत, सुरज मानकर, शरद भगत, विशाल मानकर, भास्कर पखान, अतुल मानकर, अनिल रावणकार, ऋषिकेश पखान, अमोल मानकर, प्रमोद भगत, प्रशांत भगत, पद्माकर भगत, आत्माराम जवंजाळ, सागर पखान, विठ्ठल पखान, नरेश पखान यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही यावेळी शेतकरी प्रतिनिधींनी दिला.

---

**जाहिर सुचना**

सर्व लोकांना या सुचनेव्दारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी, प्रकाश शंकर बावणे वय - ४३, व्यवसाय- खाजगी नोकरी, रा. दानापुर, ता. तेल्हारा जि. अकोला, यांचे दस्त क्रमांक ९२०/२०१९ नुसार वैयक्तिक मालकीचा, ताब्यातील, बिनबोजाचा मौजे तेल्हारा बु. येथील शेत सर्व्हे नंबर १८/ क मधील प्लॉट क्रमांक २५अ, जो एन. ए. पी. ३४/ तेल्हारा बु/ ८/२००३-०४ अन्वये दि. १३-७-२००४ चे विद्यमान एस.डी.ओ. साहेब अकोट, जि. अकोला चे आदेशानुसार अकृषक झालेला असुन त्याचे क्षेत्रफळ ११२.५० चौ. मिटर आहे. मोजमाप :- पूर्व-पश्चिम १५ मिटर (दोन्ही बाजु) ; उत्तर-दक्षिण ७-५० मिटर (दोन्ही बाजु) चतुर्सिमा : - पुर्वेस - ले आऊट रोड, पश्चिमेस - प्लॉट क्रमांक २२ अ, उत्तरेस - प्लॉट क्रमांक २४ ब, दक्षिणेस - प्लॉट क्रमांक २५ ब, वापर - पुर्वेस.

येणेप्रमाणे सदर अकृषक प्लॉट विकत घेण्याचा सौदा कायम केला असुन लवकरच खरेदिखत करून घेण्याचे ठरले आहे. तरि वरिल वर्णनाच्या अकृषक प्लॉटवर कोणाचा कोणताही हितसंबंध, हक्क, गहाण, बोजा, वारसाहक्क, भाऊबंदकी हक्क अथवा इतर कोणताही शासकिय वा निमशासकीय बोजा असल्यास हि सुचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाचे आत सबळ लेखी पुराव्यासह खालील पत्त्यावर संपर्क साधावा. त्यानंतर कोणाचा कोणताही उजर नाही असे गृहित धरून माझे पक्षकार सदर प्लॉटचे खरेदिखत लिहून व नोंदवून घेतील. त्यावर कोणाचाही उजर चालणार नाही. करीता हि जाहिर सुचना.

स्थळ-तेल्हारा
दिनांक - २-६-२०१६

पक्षकारातर्फे
**ॲड. अमोल विजय हाडोळे**
शेगांव रोड, तेल्हारा, जि अकोला
मो. ९८२२७४४९३१

**Change In Name**
I have change
My name FROM
**SHAIKH MOHAMMAD AYAAN ABDUL MATIN**
**- TO -**
**MOHAM MAD AYAAN ABDUL MATEEN SHAIKH.**
Address-
Baghicha Ke Pass, Near Mazhar Kirana Shop, Bhagat Wadi, Akola, Maharashtra - 444002

**Change In Name**
I have change
My name FROM
**SK. MUJIB SK. MEHTAB**
- TO -
**SHAIKH MUJEEB SHAIKH MEHTAB**
Address -
Near Noori Masjid Gulshan Colony, Akola, Dist. Akola- 444001, Maharashtra, India

**Change In Name**
I Have Changed
My Name From
**RAJ PRADEEP CHANDEL**
- TO-
**RAJ PRADEEP SINGH CHANDEL**
My Residential Address in:-Mothi vihir javal, Deshmukh File Vithal Mandir ke pass Akola

**Change In Name**
I have change
my name From
**Ku. Rekhatai Shripat Umale**
-To-
**Rekhabai Dinkar Ingle**
Address - C/O Rekhabai Dinkar Ingle, NAYANAGAR, Balapur, DIST: Akola, Maharashtra 444302

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १७७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# भोकर-काळेगाव रस्ता की भ्रष्टाचाराचा 'रोडमॅप' ?

## रस्त्यात 'डांबर' गायब अन कोट्यवधींचा संशयास्पद खेळ

## अधिकारी-कंत्राटदार संगनमताचे आरोप

### १.६४ कोटींच्या कामात दरफुगवटा, बोगस चाचण्या, डांबरीकरणाचा संशयास्पद खेळ



■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हा परिषद अकोला अंतर्गत तेल्हारा तालुक्यातील भोकर ते काळेगाव रस्ता व लहान पूल (स्लॅब ड्रेन) या तब्बल १ कोटी ६४ लाख ६९ हजार ९३८ रुपयांच्या कामात मोठ्या प्रमाणावर आर्थिक, तांत्रिक आणि प्रशासकीय गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष अरविंद पाटील यांनी केला आहे. कंत्राटदार संस्था श्री बालाजी कन्स्ट्रक्शन, संबंधित अभियंते आणि अधिकाऱ्यांच्या संगनमतातून शासनाच्या निधीची लूट करण्यात आल्याचा आरोप करत त्यांनी फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

ग्रामविकास मंत्री, प्रधान सचिव, मुख्य दक्षता व गुणवत्ता नियंत्रण पथक, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला यांच्याकडे सादर करण्यात आलेल्या तक्रारीत अनेक धक्कादायक मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत.

तक्रारीतील आरोपांची व्याप्ती पाहता हा प्रकार केवळ निकृष्ट दर्जाच्या कामापुरता मर्यादित नसून कोट्यवधी रुपयांच्या संघटित भ्रष्टाचाराचा नमुना असल्याची चर्चा जिल्हाभर सुरू झाली आहे.

दरम्यान, 'अंदाजपत्रकात डांबरी रस्ता, प्रत्यक्षात खडीकरण आणि अधिकाऱ्यांचे वेगळेच स्पष्टीकरण' या प्रकरणामुळे जिल्हा परिषद बांधकाम विभागातील कारभार पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला असून, भोकर-काळेगाव रस्त्यावरील डांबर नेमके कुठे गेले, हा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिकांपासून प्रशासनापर्यंत चर्चेचा विषय ठरला आहे.

**मातीचे दर सातपट वाढवून शासनाला चुना?**

तक्रारीनुसार, रस्त्याच्या अंदाजपत्रकातील मातीकामाच्या दरांमध्ये मोठ्या प्रमाणावर फुगवटा करण्यात आला आहे. शासकीय जमिनीतील मातीसाठी २२५ रुपये प्रति घनमीटर दर मंजूर असताना, खाजगी स्त्रोतांमधून आणलेल्या मातीसाठी तब्बल १,५६० ते १,५७७ रुपये प्रति घनमीटर दर मंजूर करण्यात आला आहे.

स्थानिक स्तरावर सहज उपलब्ध असलेली माती वापरूनही वाहतुकीच्या नावाखाली लाखो रुपयांचा अतिरिक्त खर्च दाखविण्यात आल्याचा आरोप आहे. खडी साहित्याच्या कामातही बाजारभावापेक्षा जास्त दर मंजूर करून शासनाची फसवणूक केल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे.

**निविदेच्या अटी धाब्यावर; अभियंते गायब, यंत्रसामग्रीचा पत्ताच नाही!**

निविदेनुसार आवश्यक असलेला हॉटमिक्स प्लांट करारनामा, सक्षम यंत्रसामग्री आणि नोंदणीकृत तांत्रिक अभियंत्यांची नियुक्ती बंधनकारक होती. मात्र प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी कोणताही पात्र अभियंता नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. कोट्यवधी रुपयांच्या सार्वजनिक कामावर तांत्रिक देखरेख नसताना काम पूर्ण झाल्याचे दाखविण्यात आल्याने संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर संशय व्यक्त होत आहे.

**शासकीय प्रयोगशाळेला बगल; खासगी अहवालांवर कोट्यवधींची बिले?**

तक्रारीतील आणखी एक गंभीर मुद्दा म्हणजे साहित्य चाचण्यांचा. शासनाच्या नियमांनुसार अशा कामांच्या चाचण्या पीएमजीएसवाय किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकृत प्रयोगशाळेतून करणे बंधनकारक असताना, या कामासाठी खासगी प्रयोगशाळांचे अहवाल वापरण्यात आल्याचा आरोप आहे. जर अधिकृत प्रयोगशाळेचे अहवाल उपलब्ध नसतील, तर बिले मंजूर कशी झाली? निकृष्ट साहित्य लपविण्यासाठी खासगी प्रयोगशाळांचे कथित 'मॅनेज' अहवाल वापरण्यात आले का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

**दोषदायित्व कालावधीच गायब!**

रस्त्यावरील माहिती फलकावर दोषदायित्व कालावधी नमूद करणे बंधनकारक असताना तो उल्लेखच करण्यात आला नसल्याचा आरोप आहे. रस्ता निकृष्ट दर्जाचा असल्यामुळे भविष्यातील दुरुस्तीची जबाबदारी टाळण्यासाठी हा प्रकार केल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

**एफआयआर, निलंबन आणि ब्लॅकलिस्टची मागणी**

या संपूर्ण कामाची कोअर कटिंगसह स्वतंत्र तांत्रिक तपासणी करण्यात यावी, अंतिम बिले व सुरक्षा ठेव गोठवावी, संबंधित कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर फसवणूक, कट रचणे, बनावट कागदपत्रे तयार करणे यांसारख्या गंभीर आरोपांखाली गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच शाखा अभियंता वैभव सोनोने, उपअभियंता प्रकाश इंगळे आणि संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करून विभागीय चौकशी सुरू करावी, तसेच श्री बालाजी कन्स्ट्रक्शन या संस्थेला काळ्या यादीत टाकावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

**सात दिवसांचा अल्टिमेटम; अन्यथा न्यायालयीन लढाई**

सदर तक्रारीवर सात दिवसांत प्राथमिक कारवाई न झाल्यास नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात येईल. तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) आणि मंत्रालय स्तरावरही स्वतंत्र तक्रार दाखल केली जाईल, असा इशारा अरविंद पाटील यांनी दिला आहे.

### डांबरी रस्ता की खडीकरण? ; अधिकाऱ्यांच्या स्पष्टीकरणाने वाढला गोंधळ

या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे रस्त्याच्या स्वरूपाबाबतच विरोधाभासी माहिती समोर आली आहे. रस्त्यावर डांबराचा थर टाकण्यात आलेला नसल्याबाबत जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रकाश इंगळे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी सदर 'रस्ता हा खडीकरणाचा रस्ता आहे,' असे सांगितल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. मात्र संबंधित कामाचे मंजूर अंदाजपत्रक तपासले असता त्यामध्ये एमपीएम (Modified Penetration Macadam) आणि ओजीसी (Open Graded Carpet) या डांबरीकरणाच्या घटकांचा स्पष्ट समावेश असल्याचे दिसून येते. डांबरीकरणासाठी स्वतंत्र निधीची तरतूदही करण्यात आली आहे. यामुळे आता प्रश्नांचा भडिमार सुरू झाला आहे. जर रस्ता खडीकरणाचाच होता, तर अंदाजपत्रकात डांबरीकरणाच्या बाबी का समाविष्ट करण्यात आल्या? आणि जर डांबरीकरण मंजूर झाले होते, तर प्रत्यक्ष रस्त्यावर डांबराचा थर कुठे गेला? अधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण आणि कागदपत्रांतील माहिती यांच्यातील विसंगतीमुळे कंत्राटदाराला वाचविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.

# ‘अरे ओ सांभा... अब क्या होगा?’ काँग्रेसची विधानपरिषदेत धाकधूक

## शैलेश अग्रवाल रिंगणात; पण पक्षातीलच दादा-राजकारण ठरणार निर्णायक

**वर्धा/जनमाध्यम**

‘अरे ओ सांभा... अब क्या होगा? हा प्रसिद्ध चित्रपटातील संवाद आता चंद्रपूर-वर्धा-गडचिरोली विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या गोटात ऐकू येऊ लागला आहे. कारण पक्षाने अखेर शेंडे-टोकस गटाशी जवळीक असलेले शेतकरी नेते शैलेश अग्रवाल यांना उमेदवारी बहाल केली असली, तरी त्यांच्या विजयाचा मार्ग विरोधकांपेक्षा पक्षातीलच गटबाजीमुळे अधिक खडतर झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

काँग्रेसमध्ये गेल्या काही महिन्यांपासून ’दादांचे राजकारण’ जोरात सुरू असल्याची चर्चा आहे. एकेकाळी पक्षाच्या निर्णय प्रक्रियेत प्रभावी मानला जाणारा शेंडे-टोकस गट काहीसा बाजूला पडल्याचे चित्र निर्माण झाले होते. अशा परिस्थितीत विधान परिषदेसाठी कांबळे गटाकडून कोणताही इच्छुक उमेदवार पुढे न आल्याने अखेर पक्षश्रेष्ठींनी शेंडे गटाकडे झुकत शैलेश अग्रवाल यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले.विशेष म्हणजे, उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच अग्रवाल यांनी मला निवडणूक लढवायची नाही, मी तिकीट मागितलेले नाही. मात्र पक्षाने जबाबदारी दिली तर नक्की लढेन,अशी भूमिका घेतली होती. त्यामुळे त्यांची उमेदवारी ही वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपेक्षा पक्षनिष्ठेचे प्रतीक मानली जात आहे.मात्र आता खरा प्रश्न उमेदवारीचा नाही, तर सहकार्याचा आहे. काँग्रेसचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध गटांतील नेते अग्रवाल यांच्या पाठीशी किती ताकदीने उभे राहतात, यावरच निवडणुकीचे भवितव्य अवलंबून राहणार आहे. विशेषतः कांबळे गटाची भूमिका सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. पक्षाचा उमेदवार म्हणून ते मनापासून काम करतील की केवळ औपचारिक पाठिंबा देतील,



याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.राजकीय विश्लेषकांच्या मते, विरोधी पक्षांपेक्षा काँग्रेसला स्वतःच्या घरातील नाराजी आणि गटबाजीवर मात करावी लागणार आहे. मतदारांपर्यंत पोहोचण्यापूर्वीच पक्षातील मतभेद मिटविण्याचे मोठे आव्हान अग्रवाल यांच्यासमोर उभे आहे.आता निकालाच्या दिवशीच स्पष्ट होईल की काँग्रेसमधील दादा-राजकारणावर पक्षनिष्ठा मात करते की गटबाजी पुन्हा एकदा पक्षाची नौका मध्य प्रवाहात अडकवते.

## अधिसूचना

**उपजिल्हाधिकारी भुसंपादन, (सामान्य)**
**जिल्हाधिकारी, वर्धा यांचे कार्यालय**

**क्र. मह. सहा./उजिभुसं/सामान्य/कावि- 374/2026**
**दिनांक :- 20/05/2026**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 अन्वये कलम 19 (1) खालील अधिसूचना**

**भूसंपादन प्रकरण क्रमांक :- 03/एलएक्यु-47/2025-26**
**मौजा- सेलसुरा, ता. वर्धा जिल्हा- वर्धा**

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या वर्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 (2013 चा 30) (यात यापुढे ज्याचा निर्देश ‘उक्त अधिनियम’ असा केला आहे) यांच्या कलम 11 च्या पोट कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना क्रमांक **11 राजपत्र 18 ते 24, डिसेंबर 2025 अन्वये पान क्रमांक 05 ते 07 अ.क्र. 858 वर प्रारंभिक अधिसूचना काढली आहे** आणि त्याद्वारे असे अधिसुचित केले आहे की, यासेबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, वर्धा (जिल्ह्याच्या) जिल्हाधिकाऱ्याने, कलम 15 च्या पोटकलम (2) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे. आणि म्हणुन, उक्त अधिनियमाच्या कलम 19 च्या पोटकलम (1) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूचि तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी ‘पुनर्वसाहत क्षेत्र’ म्हणून निर्धारीत केले असल्याचे याव्दारे घोषीत केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी **उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) सामान्य, वर्धा** यास (अधिसूचना काढण्यापूर्वी अधिकाऱ्यांचे नाव व पत्ता नमूद करावा) पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसुची एक**

**जमिनीचे वर्णन**
**भूसंपादन प्रकरण क्रमांक :- 03/एलएक्यु-47/2025-26**
**मौजा- सेलसुरा, तालुका- वर्धा जिल्हा- वर्धा**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (हे. आर.) मध्ये |
|---|---|---|
| 1 | 186/1 | 0.28 |
| | एकुण | 0.28 |

**अनुसूची दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नावः -** निम्न वर्धा प्रकल्प
**सिंचन योजना प्रकल्प कार्याचे वर्णन :** निम्न वर्धा प्रकल्पाच्या सेलसुरा लघु कालवा क्र. 02 चे मातीकाम व बांधकामाकरीता.
**समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक, :-रोजगार, पायाभूत सुविधा, सोयीसुविधा याबाबत व इतर लाभासंबंधात) :** या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणी पुरवठा सिंचीत होणार असल्यामुळे त्या परिसरातील शेतकऱ्यांना त्याचबरोबर ग्रामिण भागातील कष्टकरी, शेतकरी, शेतमजुर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असुन त्यांच्या जीवनमानात सुधारणा होणार आहे.

**अनुसूची तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**
**----निरंक-----**

**अनुसूची चार**
**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**
**----निरंक----**

(**टिप :-** उक्त जमिनीच्या आराखड्याचे भूसंपादित जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) सामान्य, वर्धा या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.)

**दिनांक :- 20/05/2026**
**ठिकाण :- वर्धा**
**जिमाका-वर्धा / 51/2016-27**

**(वान्मथी सी.)**
**जिल्हाधिकारी, वर्धा**

## ग्रामपंचायत निवडणूकीसाठी सदस्यांचा आरक्षण सोडत कार्यक्रम

**वर्धा/जनमाध्यम**

राज्य निवडणूक आयोगामार्फत सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या तसेच सन २०२६ या कालावधीत मुदत संपणा-या नवनिर्मित ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांचे आरक्षण नव्याने निश्चित करण्यासाठी सोडतीचा कार्यक्रम जाहिर करण्यात आला आहे.

आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमानुसार आरक्षण सोडत काढण्यासाठी ८ जुन रोजी विशेष ग्रामसभेची सुचना देण्यात येईल. १२ जुन रोजी विशेष ग्रामसभा बोलवून तहसिलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, अनुसुचित जाती महिला, अनुसुचित जमाती महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिलांचे आरक्षण सोडत काढण्यात येईल. १७ जुन रोजी प्रभाग निहाय आरक्षण प्रारुप अधिसुचनेला जिल्हाधिकारी मान्यता देतील.दि.१९ जुन रोजी प्रभागनिहाय आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्यात येईल व २५ जुन पर्यंत प्रभानिहाय आरक्षण निश्चितीबाबत हरकती व सूचना दाखल करता येइल. ३ जुलै रोजी उपविभागीय अधिकारी प्राप्त हरकती विचारात घेऊन अभिप्राय देईल. ८ जुलै रोजी उपविभागीय अधिकारी यांचा अभिप्राय विचारात घेऊन जिल्हाधिकारी अंतिम सुचनेस मान्यता देईल. १० जुलै रोजी जिल्हाधिकारी यांनी मान्य केलेल्या अंतिम प्रभाग रचनेला प्रसिध्दी देण्यात येईल.जिल्ह्यातील वर्धा तालुक्यातील सन २०२४ मध्ये ५९ व सन २०२६ मध्ये ३ ग्रामपंचायती, देवळी तालुक्यातील सन २०२४ मध्ये ४६ ग्रामपंचायत व सन २०२६ मध्ये ३ ग्रामपंचायतीची मुदत संपलेली असून १ ग्रामपंचायत नवनिर्मितआहे. सेलू तालुक्यात सन २०२४ मध्ये ३५ ग्रामपंचायत, सन २०२५ मध्ये १ ग्रामपंचायत व सन २०२६ मध्ये ३ ग्रामपंचायत, आर्वी तालुक्यातील सन २०२४ मध्ये २२ ग्रामपंचायत सन २०२६ मध्ये ७ ग्रामपंचायत, आष्टी तालुक्यातील सन २०२४ मध्ये २३ ग्रामपंचायत सन २०२६ मध्ये ४ ग्रामपंचायत, कारंजा तालुक्यातील सन २०२४ मध्ये ३४ ग्रामपंचायत सन २०२६ मध्ये ८ ग्रामपंचायतीची मुदत संपलेली असून १ ग्रामपंचायत नवनिर्मिती आहे.

हिंगणघाट तालुक्यातील सन २०२४ मध्ये ५६ ग्रामपंचायती व सन २०२६ मध्ये ५ ग्रामपंचायत, समुद्रपूर तालुक्यातील सन २०२४ मध्ये ४० ग्रामपंचायती व सन २०२६ मध्ये १७ ग्रामपंचायती मुदत संपलेल्या आहे.अशा एकुण सन २०२४ मध्ये ३१५ सन २०२५ मध्ये १ व सन २०२६ मध्ये ५० ग्रामपंचायती मुदत संपलेली असून २ नवनिर्मित झालेल्या ग्रामपंचायत आहे. या सर्व ग्रामपंचायतीची प्रभाग निहाय आरक्षण निश्चिती करण्यात येणार आहे, असे उपजिल्हाधिकारी तथा प्रभारी अधिकारी ग्रामपंचायत निवडणूक यांनी कळविले आहे.

## संक्षिप्त

### अधिकमासानिमित्त श्रीराम मंदिरात भागवत कथा सप्ताह

**वर्धा -** अधिकमासानिमित्त गोल बाजार येथील श्रीराम मंदिरात २ ते ८ जूनदरम्यान श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. गंगादेवी व नवलकिशोर कुलधरिया यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा धार्मिक सोहळा आयोजित करण्यात आला असून शहरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. दररोज दुपारी २.३० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत कथा प्रवचनाचा कार्यक्रम होणार आहे. प्रसिद्ध भागवताचार्य डॉ. प्रणव पटवारी (बीड) हे भागवत कथेचे निरूपण करणार आहेत. तसेच दररोज दुपारी १२ ते ४ या वेळेत प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. भागवत कथेच्या माध्यमातून धर्म, संस्कार व अध्यात्मिक मूल्यांचा प्रसार होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. या सप्ताहाचा लाभ मोठ्या संख्येने भाविकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### गॅस शेगडीच्या वादातून मायलेकीला मारहाण

**हिंगणघाट -** गॅस शेगडी बिघडविल्याच्या कारणावरून शेजाऱ्याने मायलेकीला मारहाण केल्याची घटना तरोडा येथे घडली.या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. माला गोमासे (४५) या घराबाहेर असताना शेजारी राहणारा हरीदास जोगे याने त्यांच्या घरातील गॅस शेगडी बिघडविल्याचा आरोप केला. शेगडी दुरुस्त करून दे, अशी मागणी करत त्याने शिवीगाळ सुरू केली. यावेळी माला गोमासे यांनी विरोध दर्शविल्यानंतर आरोपीने त्यांना मारहाण केली. वाद सोडविण्यासाठी आलेल्या त्यांच्या मुलीलाही मारहाण करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. जखमींनी पोलिसांत तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी प्रकरणाची नोंद घेत तपास सुरू केला आहे.

### उष्माघाताने हातगाडी चालकाचा मृत्यू

**आर्वी -** वाढत्या उष्णतेचा आणखी एक बळी गेला असून उष्माघातामुळे हातगाडी चालकाचा मृत्यू झाल्याची घटना वसंतनगर परिसरात उघडकीस आली. देवानंद डोंगरे (५१, रा. राणी लक्ष्मीबाई वार्ड) असे मृताचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, डोंगरे हे हातगाडी चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. रविवारी वसंतनगर येथील स्टेट बँक ऑफ इंडिया परिसरात त्यांचा मृतदेह आढळून आला. प्राथमिक माहितीनुसार उष्माघातामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. गेल्या काही दिवसांपासून परिसरात तापमानाचा पारा उच्चांक गाठत असल्याने नागरिकांना विविध आरोग्य समस्यांचा सामना करावा लागत आहे. या प्रकरणी आर्वी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

### वॉशआउट मोहिमेत दारूसाठ्यासह दोघे जेरबंद

**हिंगणघाट -** स्थानिक गुन्हे प्रगटीकरण पथकाने वॉशआउट मोहिमेंतर्गत कारवाई करत सावली (वाघ) शिवारातून देशी दारूसाठा व दोन दुचाकींसह सुमारे १.९० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांना सावली (वाघ) परिसरात अवैध देशी दारूचा साठा असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पथकाने छापा टाकला असता १.१० लाख रुपयांचा देशी दारूसाठा आणि दोन दुचाकी असा एकूण १.९० लाख रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. पोलिसांनी प्रकाश मन्ने (३०) व रंजित अवघडे (३३, दोघे रा. सावली वाघ) यांना ताब्यात घेतले. या कारवाईमुळे अवैध दारू व्यवसायाला आळा बसण्यास मदत होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### ती रोजच रात्री जाते...’; वीजखंडितीने नागरिक हैराण

**अल्लीपूर -** बस स्टॉप डीपीवरील ट्रान्सफॉर्मरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने अल्लीपूर परिसरातील नागरिकांना वारंवार वीजखंडितीचा सामना करावा लागत आहे. विशेषतः भवानी ट्रान्सफॉर्मरवरील एक फेस रोज रात्री खंडित होत असल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. दिवसातून दोन ते चार वेळा वीज पुरवठा खंडित होत असल्याने कुलर, पंखे आणि अन्य विद्युत उपकरणे बंद पडतात. वाढत्या उकाड्यात नागरिकांचे हाल होत असून विद्युत वितरण कंपनीविरोधात नाराजी व्यक्त होत आहे. ट्रान्सफॉर्मरचे तातडीने नूतनीकरण करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. याबाबत वरिष्ठांना माहिती देण्यात आली असून नवीन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध होताच बसविण्यात येईल, असे विद्युत वितरण कंपनीचे व्यवस्थापक आत्राम यांनी सांगितले. मात्र तो नेमका कधी उपलब्ध होईल, याबाबत त्यांनी अनिश्चितता व्यक्त केली.

## तीन सीटरमध्ये सात प्रवासी; अपघाताला जबाबदार कोण?

### एसटी-ऑटो भीषण धडकेत सात जखमी

**पुलगाव/जनमाध्यम**

पुलगाव-अमरावती मार्गावरील वर्धा नदीजवळील रेवर पॉईंट परिसरात सोमवारी झालेल्या एसटी बस आणि ऑटोच्या भीषण अपघातात सात जण जखमी झाल्यानंतर वाहतूक व्यवस्थेतील गंभीर त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या आहेत. या अपघातात जखमी झालेल्या सर्व प्रवाशांना उपचारासाठी वर्धा व सावंगी येथे हलविण्यात आले असले, तरी या घटनेनंतर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पुलगाव आगाराची चंद्रपूर-अमरावती बस (एमएच १४ एमएच २७३४) आणि एमएच ३२ एके ०५८७ क्रमांकाच्या ऑटोमध्ये जोरदार धडक झाली. धडकेमुळे ऑटोचा चक्काचूर झाला. विशेष म्हणजे, तीन प्रवाशांची क्षमता असलेल्या ऑटोमध्ये तब्बल सात जण प्रवास करत होते. त्यामुळे अपघाताची तीव्रता अधिक वाढल्याचे बोलले जात आहे.या घटनेनंतर नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. तीन सीटर ऑटोमध्ये सर्रास सहा-सात प्रवासी बसवून वाहतूक केली जाते. अनेक वाहनांकडे आवश्यक कागदपत्रे, फिटनेस प्रमाणपत्र, विमा किंवा परवाने पूर्ण नसल्याच्या तक्रारी वारंवार समोर येतात. तरीही वाहतूक पोलीस आणि परिवहन विभागाकडून अशा वाहनांवर प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोप होत आहे.तीन सीटरमध्ये सात प्रवासी बसवून वाहतूक होत असेल, तर वाहतूक पोलीस आणि परिवहन विभाग नेमके



करतात तरी काय? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. नियमांचे उघडपणे उल्लंघन होत असताना संबंधित यंत्रणा झोपेत असल्याची टीकाही केली जात आहे.दरम्यान, अपघातानंतर घटनास्थळी पोलीस पोहोचण्यास झालेल्या विलंबावरूनही संताप व्यक्त होत आहे. अपघातासाठी केवळ वाहनचालकच नव्हे, तर नियमभंगाकडे डोळेझाक करणारी यंत्रणाही तितकीच जबाबदार असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. या घटनेच्या निमित्ताने अवैध प्रवासी वाहतूक, अतिप्रवासी वाहतूक आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेवर कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १८६**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**
**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# रोहनखेडा, पर्वतापूर पुनर्वसनग्रस्तांचा नियोजन भवनात ठिय्या



**अमरावती/प्रतिनिधीः-** रोहनखेडा, पर्वतापूर पुनर्वसन ग्रस्तांची बाजू न्यायालयात योग्यरित्या सादर करण्याच्या मागणीसाठी आज मंगळवार २ जून रोजी प्रकल्पग्रस्तांनी नियोजन भवनात ठिया आंदोलन केले. भूसंपादन उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की रोहनखेडा पर्वतापूर गावाचे पुनर्वसन मौजे रामगाव येथे करायचे निश्चित केले होते. त्याचप्रमाणे ई क्लास जमीन गट नंबर ४३ गावाकरिता संपादित झाली असून त्याचे हस्तांतरण झाले तसेच गट नंबर ११९ संपादन करण्याचे ठरले होते. त्याचप्रमाणे कळम ११, १९, कलम २१ (१),जाहीर करायची नोटीस प्रकाशित झाली व एक महिन्याच्या विहित मुदत संपल्यानंतर कलम २१ (४) मोबदला नोटीस निर्गमित करणे अनिवार्य असताना मात्र जाणीवपूर्वक ढिलाई केली व संबंधित गट नंबर ११९ धारक शेतकऱ्यांना न्यायालयात जाण्यास मुभा मिळाली, असा आरोप करण्यात आला आहे. जिल्हा प्रशासन संबंधित गट नंबर ११९ धारकाकरिता काम करत आहेत असे आरोप आहे. पेढी बॅरेज करिता रोहन खेडा पर्वतापूर वासियांनी ८५० एकर जमीन दिली. त्यामुळे उदरनिर्वाहाचे साधन बाधित झाले आमच्या पुढे जीवन जगण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. रोजगार बाधित झाला आहे. दर्जेदार पुनर्वसन करणे हा कायदेशीर अधिकार असून तो मिळणे गरजेचे आहे. याकरिता रोहनखेडा, पर्वतापूर वासियांची बाजू न्यायालयात योग्य प्रकारे मांडण्याची मागणी करण्यात आली.

ठिया आंदोलन करणाऱ्यांमध्ये सुनील खडसे, जानराव खडसे, गोकुळ तायडे, लक्ष्मण खडसे, ईश्वरदास बनके, प्रकाश तायडे, परशराम सुखदेव, अतुल तायडे, बाबाराव देशभ्रतार, शैलेश गोटे, प्रल्हाद वालके, बाबू तायडे, ज्ञानेश्वर सराटे, समाधान खडसे, सुधीर तायडे, दीपक झाडे, राजेंद्र रायबोले, गजानन इंगळे, उमेश खडसे, श्रीकृष्ण रंगारे, गजानन ठोंबरे, सतीश भिलेकर, ओम तायडे, गजानन गुलसुंदरे, सुरेश अंबाडेकर, ओम तायडे, नितीन डावरे, भीमराव खडसे, पुरुषोत्तम खडसे, प्रकाश रायबोले, सुधीर सरोदे, रवी कोल्हे, धनराज खडसे, किरण तायडे सह इतरांचा मोठ्या संख्येमध्ये सहभाग होता.

# शहरात साफसफाई करून वृक्ष लागवड करा

## शिवसेना पदाधिकाऱ्यांचा मनपाला अल्टीमेटम



**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका क्षेत्रामध्ये साफसफाई करण्यात यावी तसेच येणाऱ्या पावसाळ्यामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्ष लावण्यात यावे व शहरातील मुख्य चौकामध्ये असलेल्या भटक्यांना हटविण्यात यावे, अशी मागणी शिवसेना पदाधिकाऱ्यांनी मनपा आयुक्तांना आज मंगळवार २ जून रोजी दिलेल्या निवेदनातून केलेली आहे. निवेदनात म्हटले आहे की ,महानगरपालिका क्षेत्रामध्ये सगळीकडे कचऱ्याचे ढीग दिसतात. यासंदर्भात अनेक तक्रारी प्राप्त आहे. त्याचे निवारण करण्यासाठी महापालिकेला ठोस पावले उचलण्याची गरज आहे. स्वच्छ व सुंदर अमरावती करून द्यावी. संपूर्ण शहरामध्ये पावसाळ्यात झाडे लावण्यात यावे. त्याकरिता रोपे तयार करण्याची पूर्वतयारी करावी जेणेकरून पावसाळ्यामध्ये झाडे लावता येतील. झाडांना टी गार्ड लावण्यात यावे. झाडावरती लाईट न लावण्यात यावे. राजापेठ ते बनडेरा तसेच अकोला, यवतमाळ मार्गावर प्रायोगिक तत्त्वावर निवडून सदर रोडवर जास्तीत जास्त झाडे लावावे. याचा आराखडा तयार करण्यात यावा व त्याकरिता ट्री गार्ड सुद्धा उपलब्ध करावे. शहरातील राजकमल, श्याम चौक, राजापेठ येथे मोठ्या प्रमाणात भटक्या समाजातील लोकांनी आपला कब्जा केलेला आहे. त्यांना हटविण्यात यावे अशी, मागणी करण्यात आलेली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

यावेळी संतोष बद्रे, उपनेता ज्ञानेश्वर उर्फ धाने पाटील, अजय महल्ले, सुनील राऊत, समीर कोरपे, मुकेश उसरे, रेखा खारोडे, संगीता मडावी, शारदा पेंदाम, राजेश पाठक, अमर करेसिया, चेतन कट्यारमल, सुरत बर्डे, अरुण भलावी आदि उपस्थित होते.

# ड्रायव्हर बनून आला आणि दुचाकी घेऊन गेला

## गाडगे नगर पोलिसांनी घेतले ताब्यात



**अमरावती/प्रतिनिधीः-** ज्याला ड्रायव्हर म्हणून बोलावले होते तोच दुचाकी घेऊन पळून गेल्याची घटना गाडगे नगर पोलीस ठाणे हद्दीत सुरभी विहार मध्ये समोर आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी आरोपी अनिकेत चौधरी रा.मोती नगर याला ताब्यात घेतले आहे. त्याच्या कडून चोरीची ग्रे रंगाची एक्टिवा एमएच २७ डी ७०३३ किंमत ४० हजार जप्त केली आहे.

अतुल माणिकराव आखरे (४६, सुरभी विहार, टॉवर लाईन) यांनी तक्रार दिली होती की, १८ मे रोजी त्यांना नागपूर जायचे होते. यासाठी त्यांनी फोर व्हीलर करिता ड्रायव्हरला बोलावले होते. गावाला जाण्यास थोडा वेळ असल्याने त्यांनी त्यांच्याकडील एक्टिवा त्यांचे भाचे याला पंचवटी चौक येथून आणणे करिता ड्रायव्हरला दिली होती. तो परस्पर घेऊन गेला व भाच्याला सोडून परत कठोरा नाका चौकात आला आणि तिथून एक्टिवा चोरून घेऊन गेला. पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल केले. पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या निर्देशानुसार डिबी पथकाने तपास सुरू केला आणि आरोपी अनिकेत चौधरी याला दुचाकी सह ताब्यात.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त शाम घुगे, सहाय्यक आयुक्त कैलाश पुंडकर यांच्या मार्गदर्शनात गाडगे नगरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव ,क्राईमच्या विजया पंधरे, समाधान वाठोरे यांच्या मार्गदर्शनात डिबी पथक प्रमुख उपनिरीक्षक योगेश श्रीवास, भारत वानखडे, नंदकिशोर करोची, राजेश गुरेले, मतीन शेख ,सुशांत प्रधान, धनराज कुंमरे ,महेश शर्मा यांनी केली.

# जिम ट्रेनरची गळफास घेऊन आत्महत्या

## -सरोज कॉलनी येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिम ट्रेनरने आपल्याच घरात दारूच्या नशेमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी सायंकाळी समोर आली आहे. विशाल रामेश्वर समर्थ (वय ३४,सरोज कॉलनी) असे आत्महत्या करणाऱ्या ट्रेनरचे नाव आहे. माहितीनुसार विशाल समर्थ जिम ट्रेनर म्हणून कार्य करत होते. त्यांना दारूचे व्यसन होते. शनिवारी रात्री विशालने दारूचे अति सेवन केले आणि रात्री दहा वाजता तो आपल्या रूममध्ये गेला. सकाळी आईने त्याला हाक मारली तरी तो बाहेर नाही आला. कोणताही प्रतिसाद त्याने आईला दिला नाही. थोड्यावेळ वाट पाहिल्यानंतरही तो काही प्रतिसाद देत नव्हता, यामुळे त्याची आई घाबरली आणि त्यांनी आपल्या भाच्याला फोन करून याची माहिती दिली. माहिती मिळताच विशालचा चुलत भाऊ घरी आला. त्याने सुद्धा विशालला आवाज दिली पण काही प्रतिसाद मिळाला नाही. शेवटी घरातील दाराला छिद्र पाडून त्यांनी दरवाजा उघडला तर त्यांच्या पायाखालची जमीन निघाली. विशाल त्यांना फासावर लटकताना दिसला. याची माहिती विशालच्या चुलत भावाने डायल ११२ वर दिली. पोलिसांनी घटनास्थळावर पोहोचून पंचनामा केला आणि मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात पोस्टमार्टमसाठी पाठवला. आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आत्महत्येचे कारण अजून पर्यंत स्पष्ट झाले नाही.

# पत्नीला माहेरी सोडून पती दुसरी सोबत पळाला

## तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** पत्नीला माहेरी सोडून पती गावातच राहणाऱ्या आपल्या प्रेयसीला घेऊन पळाला असल्याची घटना कुऱ्हा पोलीस ठाणे हद्दीत मालेगाव येथे समोर आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी पत्नी काजल सावंतच्या तक्रारीवरून आरोपी पती रोशन गणेश सावंत (वय २८) सासू आणि आजोबा भाजा सावंत विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आरोपी पत्नीचे घरी ठेवलेले ५० हजार रुपयेही घेऊन पळाला. माहितीनुसार आरोपी रोशन सावंत याचे अकोला जिल्ह्यातील डाळंबी गावात राहणाऱ्या संजय शिंदे यांची मुलगी काजल सोबत दोन वर्षांपूर्वी लग्न झाले होते. लग्नानंतरच आरोपी काजलला माहेर वरून पैसे आणण्यासाठी शारीरिक आणि मानसिकरिया प्रताडित करत होते. या दरम्यान आरोपीचे गावातच राहणाऱ्या एका तरुणीशी विवाहबाह्य संबंध सुरू झाले. या संबंधाचा विरोध केल्यावर आरोपी काजलला अजून प्रताडीत करू लागला. मागील आठवड्यात काजलच्या आईची प्रकृती बिघडल्याने आईला भेटण्याची इच्छा व्यक्त केली. रोशन तिला घेऊन माहेरी गेला. बायकोला माहेरी सोडून रोशन परत गावात आला आणि प्रेयसीला घेऊन काजलचे ठेवलेले पन्नास हजार रुपये घेऊन पळाला. याबाबत माहिती मिळताच काजल ने सासू आणि आजोबा सोबत फोनवर विचारपूस केली असता त्यांनी तिला सासरी न येण्याचे म्हटले आणि उलट तिलाच फटकारले व शिवीगाळ केली. यामुळे काजलने कुऱ्हा पोलीस ठाणे अंतर्गत आरोपींविरुद्ध तक्रार दिली. पोलिसांनी कलम ३५२ व ३५१ (२) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. रोशन आणि तिच्या प्रेमिकेचा सध्यातरी कुठे पत्ता लागलेला नाही. पोलिसांनी तक्रारीच्या आधारावर तपास सुरू केला आहे.

# केंद्रीय लोकसेवा आयोग नागरी सेवा परीक्षा २०२७:

## मोफत पूर्व प्रशिक्षणासाठी ऑनलाईन अर्ज मागविले

**अमरावती/प्रतिनिधीः-** केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या नागरी सेवा परीक्षा २०२७ च्या पूर्व तयारीसाठी उमेदवारांना विनामूल्य प्रशिक्षण भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, अमरावती यांच्या तर्फे देण्यात येणार आहे. या प्रशिक्षण केंद्रातील प्रवेशासाठी राज्यस्तरावर सामायिक प्रवेश परीक्षा ऑफलाईन पद्धतीने आयोजित करण्यात येणार असून यासाठी नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

या प्रवेश प्रक्रियेअंतर्गत ऑनलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु झाली असून अर्ज भरण्याची अंतिम तारीख १७ जून २०२६ ही राहील, तर परीक्षा शुल्क भरण्यासाठी १९ जून २०२६ पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे. या प्रवेशासाठीची राज्यस्तरीय प्रवेश परीक्षा दिनांक १९ जुलै २०२६ रोजी रविवारी, सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत संपूर्ण राज्यात ऑफलाईन पद्धतीने घेतली जाईल. या परीक्षेची सविस्तर जाहिरात, आवश्यक शैक्षणिक पात्रता, परीक्षेचा अभ्यासक्रम, ऑनलाईन अर्ज भरण्याबाबतची संपूर्ण माहिती व परीक्षेसंबंधी इतर सर्व महत्त्वाच्या सूचना www.siac.org.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या असून पात्र व इच्छुक उमेदवारांनी दिलेल्या मुदतीत आपले ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्राच्या संचालक डॉ. प्रतिभा भोरजार यांनी केले आहे.

# कडधान्य आत्मनिर्भरता अभियानः

## जिल्ह्यात कडधान्य प्रक्रिया युनिट उभारणीसाठी ३३ टक्के अनुदान

**अमरावती/प्रतिनिधीः-** कडधान्य पिकांच्या मूल्यवर्धनाला चालना देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने आणि काढणी पश्चात पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी 'कडधान्य आत्मनिर्भरता अभियान' राबविण्यात येत आहे. या अंतर्गत कडधान्य प्रक्रिया युनिट स्थापन करण्यासाठी ३३ टक्के अनुदान देवून आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

या योजनेअंतर्गत शेतकरी उत्पादक संस्था, क्लस्टर स्तर महासंघ, प्राथमिक कृषी पतसंस्था, वैयक्तिक उद्योजक तसेच प्रक्रिया युनिट स्थापन करण्यास इच्छुक इतर पात्र व्यक्ती व संस्थांना सहाय्य देऊन कडधान्य मूल्यसाखळी अधिक कार्यक्षम व सक्षम करणे हा मुख्य उद्देश आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी गट लाभार्थ्यांमध्ये संबंधित संस्था किमान मागील दोन वर्षांपासून विधिवत नोंदणीकृत व कार्यरत असावी, तसेच प्रकल्प खर्चाच्या किमान १५ टक्के रक्कम व कार्यभांडवलासाठी आवश्यक मार्जिन मनी स्वतः उभारण्याची आर्थिक क्षमता असावी. वैयक्तिक लाभार्थ्यांचे वय किमान २१ वर्षे पूर्ण असावे आणि एका कुटुंबातील केवळ एकाच व्यक्तीस हे आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात येईल. यामध्ये अनुसूचित जाती, जमाती, महिला, डोंगराळ क्षेत्रे व आकांक्षी जिल्हे यांना प्राधान्य दिले जाईल.

या अभियानांतर्गत पात्र युनिटला प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल रुपये २५ लाख प्रति युनिट, यापैकी जे कमी असेल ते अनुदान केवळ यंत्रसामग्री खरेदी तसेच इमारत, गोदाम व साठवणूक पायाभूत सुविधा बांधकामासाठी दिले जाईल; तर जमीन, वीज आणि मनुष्यबळ इत्यादी खर्चासाठी अनुदान देय राहणार नाही. तसेच, इमारत व गोदामाच्या बांधकामासाठी अनुदानाचा जास्तीत जास्त हिस्सा एकूण पात्र अनुदानाच्या ३० टक्क्यांपर्यंतच मर्यादित असेल. शासकीय अनुदान एकूण प्रकल्प खर्चापैकी ठराविक खर्चाची पूर्तता करीत असल्याने उर्वरित रकमेसाठी लाभार्थ्यांचे स्वतःचे भांडवल योगदान किमान १५ टक्के असणे आणि वित्तीय संस्थांकडून मुदत कर्ज घेणे अनिवार्य राहील. या योजनेचा लाभ घेणाऱ्या नवीन प्रक्रिया युनिटची किमान क्षमता ३०० किलो प्रति तास असणे आवश्यक असून, सर्व यंत्रसामग्री राष्ट्रीय मानकीकरण संस्था किंवा समतुल्य गुणवत्ता मानकानुसार असणे बंधनकारक आहे. यासोबतच भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण व इतर सुरक्षा, पर्यावरणीय व वैधानिक नियमांचे पालन करणे आवश्यक राहील. लाभार्थ्याला युनिट उभारणीच्या दिनांकापासून किमान ३ वर्षे सदर मालमत्ता जतन करणे बंधनकारक असून, निधीचा गैरवापर झाल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी, शेतकरी गट, कंपन्या आणि संस्थांनी या योजनेचा लाभ घ्यावा आणि अधिक माहितीसाठी आपल्या संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

# कर वसुलीला गती द्या; थकबाकीदारांवर कठोर कारवाई करा- आयुक्त वर्षा लड्डा



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त वर्षा लड्डा यांनी मंगळवारी महानगरपालिकेच्या कर विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेत महसूल वाढ आणि थकबाकी वसुलीसाठी कठोर व परिणामकारक उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे झालेल्या बैठकीत कर वसुलीची सद्यस्थिती, थकबाकी वसुली, महसूल वाढ तसेच झोननिहाय प्रगतीचा आढावा घेण्यात आला.

बैठकीत मालमत्ता कर वसुलीची सविस्तर आकडेवारी सादर करण्यात आली. उद्दिष्टांच्या तुलनेत कमी वसुली असलेल्या वार्डांची स्वतंत्र समीक्षा करत आयुक्त वर्षा लड्डा यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने वसुली वाढविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिले. प्रत्येक झोनने निश्चित उद्दिष्टांसह कार्य करून नियमित प्रगती अहवाल सादर करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महानगरपालिकेच्या आर्थिक बळकटीसाठी कर वसुली हा प्रमुख आधारस्तंभ असल्याचे नमूद करत आयुक्तांनी मोठ्या थकबाकीदारांची स्वतंत्र यादी तयार करून विशेष वसुली मोहीम राबविण्याचे आदेश दिले. नियमानुसार जप्ती, सीलिंग आणि अन्य कायदेशीर कारवाई करून थकबाकी वसुलीची प्रक्रिया अधिक प्रभावी करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

नागरिकांना कर भरण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने ऑनलाइन कर भरणा प्रणालीचा अधिक प्रचार, व्यापक जनजागृती मोहीम तसेच कर भरणा प्रक्रियेचे सुलभीकरण करण्यावर भर देण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

बैठकीदरम्यान महसूल वाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या विशेष उपक्रमांचीही समीक्षा करण्यात आली. नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण करून करदात्यांना दर्जेदार व सुलभ सेवा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. तसेच सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांनी मालमत्ता कर विभागाशी आवश्यक समन्वय ठेवून मालमत्ता कर वसुली मोहिमेस पूर्ण सहकार्य करावे, असे निर्देश आयुक्त वर्षा लड्डा यांनी दिले.

यावेळी आयुक्त वर्षा लड्डा यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना महसूल वाढीचे उद्दिष्ट शंभर टक्के पूर्ण करण्यासाठी जबाबदारीने व समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले. शहरातील विकासकामांसाठी आवश्यक आर्थिक स्रोत उपलब्ध करून देण्यासाठी कर वसुलीत कोणतीही ढिलाई खपवून घेतली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीस अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक संचालक नगररचनाकार सागर वानखडे, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, नितीन बोबडे, धनंजय शिंदे, मनोज शहाळे, सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी, उपअभियंते, कर वसुली लिपिक तसेच संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--
(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २६५**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**जाहीर नोटीस**

आम जनतेस जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात आहे की मौजे हसनपूर ता. दर्यापूर जि. अमरावती येथिल गट क्र. १४३ शेत क्षेत्र ०.४३ आर नंदकिशोर महावीर कनोजे व इंदुबाई गणेश प्रजापती ०.४३ आर यांच्या प्रस्तुत शेतविक्रीचा व्यवहार अजिंक्य विनोद साखरे रा. हसनपूर ता. दर्यापूर जि अमरावती मो. नं. ९६८९८५६५८० यांच्या सोबत पक्का झालेला असून प्रस्तुत व्यवहाराच्या बळकटीकरीता व कायदेशिरपणे प्रक्रिया पूर्ण झाली आहे. प्रस्तुत शेता संदर्भात इतर कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीने व्यवहार करुन हितसंबंध प्रस्थापित करु नये अथवा शेतीबाबत व्यवहार करु नये तसे केल्यास याची संपूर्ण जबाबदारी व्यवहार करणाऱ्यावर राहील. प्रस्तुत व्यवहार हा आमचेवर बंधनकारक असणार नाही

**अजिंक्य विनोद साखरे**
रा. हसनपूर पो. माहुली (धांडे )
ता. दर्यापूर
मो. नं. ९६८९८५६५८०

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

**फेरफार अर्ज क्रमांक - 212/26 कलम -22**
**सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक - शाक्यमुनी सम्यक महिला बहुउददेशिय संस्था व्यंकैयापुरा अमरावती ता.जि.अमरावती एफ 16681**
**अर्जदार - सौ.सुमन नामदेवराव ठवळे**
**गैरअर्जदार - १) सौ.सुनिता मधुकर गुळधे २) सौ.वंदना विनायक भरडे**

या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, मा.सहायक धर्मादाय आयुक्त-३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल अर्जासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये चौकशी करणार आहे.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये आपणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा दयायचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीच्या आत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक २७.०५.२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**

**जाहीर नोटीस**

या जाहीर सुचना व्दारे सर्व लोकांना सुचीत/कळविण्यात येते की, **अखतर बानो सयद सत्तार सयद, रिजवान, सयद इरफान, सयद इमरान सर्व रा.चपराशीपुरा अमरावती ता.व जि. अमरावती** यांचे मालकीचा व ताब्यात असलेला कॅम्प चपराशीपुरा येथील **शिट नं.१८ डी मधील प्लॉट नं. १४ (चौदा)** (धारणाधिकार-अ) चा.उ. द.वाटणीचा उत्तरेकडील भाग व **प्लॉट नं. १५ (पंधरा)** (धारणाधिकार-अ) विकत असुन, **दिनांक ०५.०६.२००६** ला रक्कम स्विकारुन खरेदी खत नोदविणार आहे व माझे पक्षकार सदर्हू खरेदी खत नोदवुन घेणार आहे. त्या **मालमत्तेचे** वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

नोंदणी पोट तुकडी अमरावती महानगरपालिका व जिल्हा परिषद च्या हददीतील अमरावती कॅम्प चपराशीपुरा येथील **शिट नं.१८ डी मधील मालमत्ता (अ) प्लॉट नं.१४ (चौदा)** (धारणाधिकार-अ) **एकुण क्षेत्रफळ ११९.३० चौ.मिटर पैकी,** पश्चिमेकडील भाग ज्याचे **क्षेत्रफळ ५९.६४ चौरस मीटर/ ६४१.७२ चौरस फुट** जागा बांधकामासह असुन **मालमत्ता पत्रक / पि.आर.कार्ड** यावर **अखतर बानो सयद सत्तार, सयद रिजवान, सयद इरफान, सयद इमरान** यांच्या नावाची नोद असुन वारसा हक्काने मिळाले आहे. यावर विटा-मातीचे अंदाजित ४० वर्षे जुने कवलाचे दोन रुम असून विज व पाणी पुरवठा आहे तसेच दक्षिणेस मोकळी जागा आहे याची चर्तुःसिमा खालीलप्रमाणे .....
पुर्वेस - प्लॉट नं. १४ चा पुर्वेकडील भाग — पश्चिमेस - प्लॉट नं.१३ (तेरा)
उत्तरेस - राज्य महामार्ग — दक्षिणेस- प्लॉट नं.१५(पंधरा)

**आणि मालमत्ता (ब) शिट नं. १८ डी मधील प्लॉट नं.१५ (पंधरा)** (धारणाधिकार-अ) **एकुण क्षेत्रफळ ६६.०० चौ.मिटर/७१०.१६ चौरस फुट** जागा बांधकामासह असुन **मालमत्ता पत्रक / पि.आर.कार्ड** यावर **अखतर बानो** यांच्या नावाची नोद असुन, यावर अंदाजीत २३ वर्षे जुने आर.सी.सी.स्लॅबचे एक हॉल, दोन रुम, संडास,बाथरुम असुन विज व पाणी पुरवठा आहे तसेच दक्षिणेस रस्ता आहे याची चर्तुःसिमा खालीलप्रमाणे .....
**पुर्वेस** - प्लॉट नं.१६ (सोळा) — **पश्चिमेस** - प्लॉट नं.१३ (तेरा)
**उत्तरेस** - प्लॉट नं.१४ चा पश्चिमेकडील भाग — **दक्षिणेस**- रस्ता

येणे प्रमाणे वरील वर्णनी मालमत्ता बांधकामासह माझे पक्षकार दिनांक ०५.०६.२०२६ ला किंवा त्या पूर्वी माझे पक्षकार खरेदी खत नोंदवुन घेणार आहे. तरी सदर्हू मिळकत/ जमीन संबंधी कोणताही कोणत्याही प्रकारचा वारसा हक्का, हितसंबंध, हक्क, बोंझा,ताबा, हक्कसंबंध, इजमेंटल राईट,सरकारी वा निमसरकारी संस्थेचे/बॅकेचे कर्ज किंवा गहाण अथवा इतर कुठलाही अधिकार असल्यास दिनांक ०५.०६.२०२६ च्या पुर्वी संपुर्ण कागदपत्रासह पुरावासह खालील नमुद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत **(सकाळी - ०७ ते ११ व संध्याकाळी-०७ ते ०९) लिखित स्वरुपात, प्रत्यक्ष किंवा अधिवक्ताव्दारे** आवश्यक कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. अन्यथा माझे पक्षकार सदर्हू मिळकत/जमीन खरेदी करुन घेईल व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर चालणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

**दिनांक ०२/०६/२०२६**

**SYED A. S. AASIF (Advocate)**
**A-10, Vastuship Society, Katol Road,**
**Nagpur- 440013, Mob.- 9975759551**

# मुऱ्हा देवी येथील महिलांचा एल्गार

## अवैध दारूबंदीसाठी ग्रामसभेत घेतला एकमताने ठराव

### सौदागर कुटुंबाच्या दहशतीला कंटाळून महिला एकवटल्या

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी तालुक्या तील मुऱ्हा देवी येथे गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या अवैध दारू विक्री आणि गुंडगिरीला कंटाळून अखेर गावातील महिलांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. गावात दहशत माजवणाऱ्या सौदागर कुटुंबाच्या कृत्यांविरुद्ध सर्व महिलांनी एकत्र येत दि. १ जून रोजी ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभा बोलावली आणि गावात पूर्णतः दारूबंदी करण्याचा ऐतिहासिक ठराव एकमताने मंजूर केला.

मिळालेल्या माहितीनुसार, मुऱ्हा देवी गावात सौदागर कुटुंबातील व्यक्तींनी गेल्या काही दिवसांपासून हैदोस घातला आहे. या कुटुंबातील सर्व सदस्य अवैध दारू विक्रीच्या व्यवसायात गुंतलेले असून, यामुळे गावातील शांतता धोक्यात आली आहे. विशेष म्हणजे याच कुटुंबातील मतीन सौदागर याने गावातील बचत गटाच्या महिलांची सुमारे एक कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा गंभीर आरोप आहे. याप्रकरणी महिलांनी पोलीस तक्रार केली असता, सौदागर कुटुंबातील इतर व्यक्तींकडून तक्रारदार महिलांना धमकावण्याचे सत्र सुरू झाले होते.गावकऱ्यांच्या आरोपानुसार, सौदागर कुटुंबाचे स्थानिक पोलिसांसोबत आर्थिक हितसंबंध असल्याने त्यांच्यावर



कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही. पोलिसांच्या आशीर्वादानेच या कुटुंबाची परिसरात दहशत वाढली असून, सामान्य नागरिकांचे जगणे कठीण झाले आहे.

या दहशतीला उत्तर देण्यासाठी अखेर गावातील माता-भगिनींनी संघटित होऊन ग्रामसभेत दारूबंदीचा ठराव संमत केला.ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतम कदम यांनी जिल्ह्यातील सर्व अवैध धंदे तात्काळ बंद करण्याचे कडक निर्देश सर्व ठाणेदारांना दिले आहेत. असे असतानाही रहिमापूर चिंचोली पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या मुऱ्हा देवी गावात अवैध दारू विक्री जोमाने सुरू आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाला स्थानिक पोलीस केराची टोपली दाखवत असल्याचे यावरून स्पष्ट होत आहे.

आता या प्रकरणाची दखल घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक दोषी ठाणेदारावर आणि अवैध दारू विक्रेत्यांवर काय कारवाई करतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. गावातील महिलांनी घेतलेल्या या आक्रमक पवित्र्यामुळे प्रशास नावर आता मोठा दबाव निर्माण झाला आहे.

# काऊच पफीमध्ये डिस्काउंट धमाका...






**अमरावती/ का.प्र.**

Couchpuffy ची महाराष्ट्रा तील सर्वात मोठ्या १ लाख स्क्वेअर फुटांच्या फर्निचर मॉलमध्ये ग्राहकांसाठी जबरदस्त ऑफर्स सुरू आहेत.फक्त ४९,९००/- मध्ये संपूर्ण बेडरूम सेट-ज्यामध्ये वेड, साईड टेवल, ड्रेसिंग टेवल आणि अलमारी समाविष्ट आहे. इकोनॉमी बेडरूम सेट फक्त ५९,९००/- मध्ये उपलब्ध. महाराजा सोफा सेटच्या ५० पेक्षा अधिक व्हरायटी उपलब्ध असून आता प्रत्येकाच्या वजेटमध्ये महाराजा सोफा मिळणार.सोफा कम बेड फक्त २९,९००/- पासून. कॉर्नर सोफा फक्त ३३,१००/- पासून सुरू.४ सीटर, ६ सीटर, ८ सीटर डायनिंग सेट, मार्बल टॉप, राउंड, ओव्हल आणि स्क्वेअर शेपमध्ये उपलब्ध.४ सीटर

### बेडरूम सेट आणि महाराजा सोफ्यावर भारी सूट...

डायनिंगची सुरुवात फक्त १६,९००/- पासून. सेंटर टेबल, टीटबल, टीव्ही रॅक, झुले आणि इतर अनेक फर्निचर व्हरायटी वाजवी दरात उपलब्ध. स्पेशल ऑफिस फर्निचर मॉलमध्ये ऑफिस टबल, इंडियन आणि इम्पोर्टेड चेअर्स, विविध रंग आणि डिझाइन्समध्ये उपलब्ध. विजिटर चेअरवर 'एक खरेदी करा एक मोफत' ऑफर सुरू. गिफ्ट आर्टिकल्समध्ये स्टॅच्यू, पेंटिंग्स, प्लांट्स, ब्रास मूर्ती, बॉटर फाउंटन, मेटल आर्ट, ग्लास आणि वुडन डेकोरची मोठी रेंज उपलब्ध.बजाज फायनान्स सुविधा आणि एक्सचेंज ऑफर उपलब्ध.

पत्ता: काऊच पफी, B5 ड्रीमलैंड मार्केट, रहाटगाव रोड, अमरावती.

सूचना:प्रत्येक रविवारी मॉल सुरू राहील.

### दीक्षाभूमीच्या छायाचित्राशी छेडछाड

# भीम ब्रिगेडची जिल्हाकचेरीसमोर निदर्शने

**अमरावती/ का.प्र.**

नागपूर येथील ऐतिहासिक दीक्षाभूमीच्या छायाचित्राशी छेडछाड करून पंचशील ध्वजाऐवजी भगवा ध्वज दाखविण्याच्या विरोधात सोमवारी भीम ब्रिगेड संघटनेतर्फे जिल्हाकचेरी समोर निदर्शने करण्यात आली.

संबंधितांवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

२६ मे २०२६ रोजी नागपूर येथे आइटिक लक्क कॉंडे तुच्या पत्रकार परिषदेसाठी वापरण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रकात दीक्षाभूमी स्तूपाच्या शिखरावर असलेल्या पंचशील ध्वजाऐवजी भगवा ध्वज दाखविण्यात आला. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा डावा हात समोर दाखवून प्रतिमेमध्येही बदल करण्यात आला असल्याचे निवेदनात म्हटले आहे.



### काँग्रेस पदाधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी

दीक्षाभूमी आंबेडकरी अनुयायी व बौद्ध समाजाचे श्रद्धास्थान असून समता, बौद्ध धम्म आणि सामाजिक अस्मितेचे प्रतीक आहे. अशा ऐतिहासिक व धार्मिक महत्त्वाच्या स्थळाच्या मूळ स्वरूपात बदल करून छायाचित्र प्रसिद्ध करणे हे धार्मिक भावना दुखावणारे तसेच इतिहासाचे विकृतीकरण करणारे कृत्य असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

युवक काँग्रेसचे प्रभारी अजय छिकारा, सहप्रभारी नवज्योत सिध्दू,शिवराज मोरे यांच्यावर ॲट्रॉसिटी ॲक्टसह संबंधित कायद्यांनुसार तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी निवेदनातून आली करण्यात आहे. आंदोलनात भीम ब्रिगेडचे अध्यक्ष राजेश वानखडे, जिल्हा सचिव ज्ञानेश्वर रंगारी, केवल हिवराळे, अविनाश जाधव, अनिल राणे, अमित कुलकर्णी, शुभम राऊत, आकाश कांबळे, अजय तायडे, रोशन गवई, अजय खडसे, विजय खंडारे, आदेश तेलंग, सुरज खिराडे, विशाल खंडारे, अंशुमन इंगळे, मुकेश नितनवरे, प्रणय पाटील, राहुल नाईक, अक्षय मोरे, बाबाराव मेश्राम, विकी वासनिक, प्रमोद बडगे, नितेश मोकलकर यांच्यासह बहुसंख्येने भीम ब्रिगेडचे पदाधिकारी कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते.

# १ ते ३० जून दरम्यान 'शेती बचाव अभियान'

**अमरावती/ का.प्र.**

जिल्ह्यातील शेती अधिक उत्पादनक्षम, किफायतशीर व पर्यावरणपूरक व्हावी तसेच शेतकऱ्यांमध्ये संतुलित खत व्यवस्थापन, माती परीक्षण व जैवखतांच्या वापराबाबत जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूर (बडनेरा), जि. अमरावती व प्रकल्प संचालक, आत्मा यांच्या समन्वयाने 'शेती बचाव अभियान' १ ते ३० जून २०२६ या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात येत आहे.

सध्या ही मोहीम कृषी विज्ञान केंद्राच्या कार्यक्षेत्रातील विविध तालुक्यांमधील २९ पेक्षा अधिक गावांमध्ये यशस्वीरित्या राबविण्यात येत असून शेतकरी मेळावे, प्रशिक्षण कार्यक्रम, प्रात्यक्षिके, चर्चासत्रे व जनजागृती उपक्रमांच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत आहे.सद्यस्थितीत अनेक शेतकरी डीएपी व युरिया खतांचा अती व असंतुलीत वापर करत असल्याचे निदर्शनास आले आहे. या असंतुलीत वापरामुळे जमिनीतील अन्नद्रव्यांचे संतुलन बिघडून मातीची भौतिक, रासायनिक व जैविक गुणवत्ता घटत आहे. परिणामी पिकांची वाढ मर्यादित राहते, उत्पादन खर्च वाढतो व दीर्घकालीन उत्पादनक्षमतेवर विपरीत परिणाम होतो. यावर प्रभावी उपाय म्हणून शास्त्राधारित संतुलित खत व्यवस्थापनाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. के. पी. सिंह यांनी केले. ते शेती बचाव अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना बोलत होते.

यावेळी विषय विशेषज्ञ डॉ. हर्षद ठाकूर यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना, शास्त्रीय शिफारशींनुसार संतुलित खतांचा वापर, अन्नद्रव्यांचे योग्य प्रमाण, खतांचा योग्य वेळ व पद्धत तसेच सूक्ष्म व दुय्यम अन्नद्रव्यांचा समावेश करणे आवश्यक आहे. यासोबतच जमिनीची सुपीकता नैसर्गिकरीत्या वाढविण्यासाठी हिरवळीचे खत, जीवामृत, कंपोस्ट, शेणखत यांसारख्या सेंद्रिय उपायांचा अवलंब करणे. या पद्धतींमुळे जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढतो, मातीची रचना सुधारते आणि पिकांची उत्पादनक्षमता दीर्घकाळ टिकून राहते असेही त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी डॉ. अर्चना काकडे, प्रफुल महल्ले, महेश आखूड, राहुल घोगरे, संतोष देशमुख, आकाश धरमकर, सुरेश वैद्य, आरती वर्मा, कैलास शेखावत, संजय घरडे, प्रणाली देशमुख, विशाखा पोहरे, स्नेहल कांबळे, अश्विनी रंगे, ऋषिकेश शिंदे, महेंद्र सेंगर, राहुल जगताप, उमेश तायडे, निशा राठोड, विशाल राऊत, विशाखा राणोटकर, श्याम भुरके, ऋषिराज शेखावत, आशीष रंगारी, सिद्धार्थ गडलिंग आदी विशेष परिश्रम घेत आहेत.

# संक्षिप्त

## आर्वी आगारातून कौंडण्यपूर - पंढरपूर बस सेवा सुरु

**कुऱ्हा** -विदर्भाची पंढरी आई रुख्मीणी मातेचे माहेर अशा पावन प्राचीन तिर्थक्षेत्र असलेल्या कौंडण्यपूर श्री. विठ्ठल रुख्मीणी मंदिर असून या ठिकाणी बऱ्याच दूर वरून येणारे भाविक वारकरी भक्त मंडळी दर्शना करिता येतात. तसेंच दर पंधरवाडी एकादशी निमित्त विठ्ठलाच्या दर्शना करिता जाणारे वारकरी भक्त मंडळी करिता या पंचक्रोशीतील प्रवासी प्रवाशां करिता अतिशय आवश्यकता असणारी आर्वी आगारातून कौंडण्यपूर मार्ग पंढरपूर ही सेवा नियमित करण्याची काही दिवसा पासून वृत्त पत्राव्दारे मागणी केली असता त्याची आर्वी आगाराने त्वरित आर्वी कौंडण्यपूर ते पंढरपूर अशी बस सेवा गेल्या आठ दिवसांपासून अधिकमास महिन्याच्या पर्वावर सुरू केल्यामुळे या पंचक्रोशीतील वारकरी भाविक प्रवासी जनतेनी बस सुरू केल्या बद्दल आर्वी आगर प्रमुखाचे अभिनंदन करून हि बस सेवा नियमित सुरू राहावी अशी विनंती केली.

## विद्यापीठात ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांची पुण्यतिथी

**अमरावती** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृति संशोधन केंद्रामध्ये ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांची पुण्यतिथी संपन्न झाली.याप्रसंगी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले.पुण्यतिथी कार्यक्रमाला विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.व्ही.एम. मेटकर, उपकुलसचिव (विधी) मंगेश जायले, डॉ. श्रीकांत जिचकार स्मृति केंद्राचे प्रभारी संचालक डॉ.एस.पी. जोशी तसेच विद्यापीठातील कर्मचारी उपस्थित होते.



## कौंडण्यापूर येथे अधिकमास पर्वावर हजारो भाविकांची गर्दी

**कुऱ्हा** -विदर्भाची पंढरी लाखो भाविकांचे श्रध्दा स्थान आई रुक्मीणी मातेचे माहेर अशा पुरातन प्राचीन तिर्थक्षेत्र असलेल्या श्री. विठ्ठल रूख्मीणी मंदिरामध्ये गेल्या १७ मे २०२६ पासून सुरु झालेल्या अधिकमास व पुरुषोत्तममास पर्वावर मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम महाअभिषेक 'महाआरती श्रीमद् भागवत कथा, पारायण, हरिपाठ, किर्तन तसेंच वारकरी भजनी मंडळ, महिला भजनी मंडळा चे भजनाचे कार्यक्रम भरगच्च नियमित सुरू आहे. तसेच अधिक मास महिन्यातील २७ मे २०२६ च्या पंधरवाडी एकादशी निमीत्त हजारो भाविक वारकरी महिला भक्तांची अलोट गर्दी असून दर्शना करिता संस्थानचे वतीने उत्तम व्यवस्था करून भाविक रांगेत दर्शनाचा लाभ घेत आहेत. पंचक्रोशीतील भाविक उन्हाचा तडाखा असून सुद्धा भाविक अधिक मास महिन्यात दर्शना करिता येऊन स्नान, करणे, आणि विठ्ठल रूख्मीणी अंबिका देवी मंदीर, शिव मंदिर, गजानन महाराज मंदीर, अवधुत महाराज मंदिर येथे दर्शन घेतात.याकरिता कुऱ्हा पोलिस स्टेशन तर्फे चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.परतूर, सातोना बु., उस्मानपूर, सालगांव, रेवलगांव, आष्टी, शिवाजीनगर, फुलवाडी, दतानगर हिस्सी, मापेगांव चांदेश्वर, गुळखंड, देवनांदा, दाकेफळ, वाकी, धनेगाव, धामनगांव, कावजवळा, खांडवी या गावाचा समावेश आहे.



## प्रा. मनोरमा सानप यांना आचार्य पदवी

**अमरावती** - स्थानिक श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयातील संशोधन केंद्राच्या संशोधिका मनोरमा पांडुरंग सानप यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या आंतर विद्याशाखेतील शिक्षणशास्त्र विषयातील आचार्य पदवी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने घोषित करून सन्मानित केले आहे. प्रा. मनोरमा सानप यांनी 'अमरावती विभागातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सामाजिक -आर्थिक स्तर, शालेय जीवन व शैक्षणिक संपादन यांच्या सहसंबंधाचा अभ्यास' या शीर्षकांर्गत प्राचार्य डॉ. संजय भीमराव खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली आपला शोध प्रबंध विद्यापीठाला सादर केला.मनोरमा सानप यांना पीएच.डी.शोध प्रबंध पूर्ण करण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले संशोधक व प्रशिक्षण संस्था, (महाज्योती) नागपूर यांची फिलोशीप प्राप्त झाली होती.त्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल त्यांचे प्राचार्य डॉ.विनय राऊत, संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. अमित गावंडे, संशोधन केंद्रातील सर्व तज्ञ प्राध्यापक, उपजिल्हाधिकारी डॉ.गरकल, बहिण डॉ. सीमा व डॉ. प्रमोद घुगे, वेदांत घुगे, यांच्या सह नातेवाईक व मित्रपरिवाराने अभिनंदन केले आहे.शिक्षण क्षेत्रातील पीएच.डी.पदवी प्राप्त झाल्याबद्दल प्रा. मनोरमा सानप यांनी यशाचे श्रेय पती उमाकांत घुगे, वडील पांडुरंग सानप व मार्गदर्शक प्राचार्य डॉ.संजय खडसे यांना दिले आहे.



## राखेच्या प्रदूषणाने मासोदकर हैराण; आरोग्य धोक्यात, आंदोलनाचा इशारा



**अंजनगाव बारी/ वार्ताहर**

मासोद गावात गेल्या अनेक वर्षांपासून बाहेरून मोठ्या प्रमाणात आणून टाकण्यात येणाऱ्या राखेमुळे नागरिकांचे जीवन अक्षरशः धुळीला मिळाले असून गावकऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. राखेच्या धुळीमुळे श्वसनाचे विकार, दमा, त्वचारोग, डोळ्यांचे आजार तसेच फुफ्फुसांशी संबंधित आजार वाढत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गावाच्या परिसरात टाकण्यात येणारी राख वाऱ्यामुळे संपूर्ण गावात पसरते. अनेक वेळा धुळीचे प्रमाण इतके वाढते की रस्तेही दिसेनासे होतात. त्यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून अनेक लहान-मोठे अपघात घडल्याचेही नागरिकांनी सांगितले. या राखेमुळे लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचा दावा करत ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, तहसीलदार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा खनिकर्म अधिकारी तसेच ग्रामपंचायत प्रशासनाकडे निवेदन सादर केले आहे. गावात राख आणणे व टाकणे तात्काळ बंद करावे, तसेच यापूर्वी साठवून ठेवलेल्या राखेची योग्य विल्हेवाट लावावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.दरम्यान, ग्रामपंचायतीने ग्रामसभा व मासिक बैठकीत याबाबत ठराव मंजूर करून संबंधितांना नोटीस बजावावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन कारवाई न केल्यास ग्रामस्थांच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.यावेळी गिरीश चौधरी, सामाजिक कार्यकर्ते राहूल पुरी व सुरज गवळी,गौरव नंदनवार, अविनाश मसराम, अक्षय कुंभरे,अनिकेत अनिकेत वैद्य, महेश केवतकर मासोद कर निवेदन देताना उपस्थित होते.

# प्रलंबित मागण्यांकडे दुर्लक्ष; आरटीओ कर्मचाऱ्यांचे निदर्शने

**अमरावती/ का.प्र.**

राज्यभरातील प्रादेशिक परिवहन कार्यालयांमधील (आरटीओ) कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवारी निदर्शनांचे आयोजन करण्यात आले. त्यानुसार अमरावतीसह राज्यातील विविध आरटीओ कार्यालयांसमोर कर्मचाऱ्यांनी निदर्शने करून आपल्या मागण्यांचा आवाज बुलंद केला.

कर्मचाऱ्यांच्या विविध प्रशासकीय व सेवाविषयक प्रश्नांवर शासनाकडून अद्याप ठोस निर्णय घेण्यात आलेला नसल्याने ही आंदोलनाची भूमिका स्वीकारण्यात आल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.संघटनेच्या माहितीनुसार आंदोलन तीन टप्प्यांत उभारण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात २ जून रोजी दोन तासांची निदर्शने करण्यात आली. दुसऱ्या टप्प्यात ९ जून रोजी एक दिवसाचा लाक्षणिक संप पुकारण्यात येणार असून, मागण्यांची पूर्तता न झाल्यास १६ जूनपासून बेमुदत संप आंदोलन सुरू करण्यात येणार आहे.कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी व प्रशासकीय अधिकारी या २३ पदांच्या



पदोन्नती प्रस्तावांना तातडीने मंजुरी देणे, कार्यालय अधीक्षक व सहाय्यक मोटार वाहन अभियोजक पदांसाठी सेवा प्रवेश नियम तयार करणे, वर्ग-३ संवर्गातील सर्व पदांचे सेवा प्रवेश नियम निश्चित करणे, लिपिक टंकलेखक व वरिष्ठ लिपिक पदांचे पदनाम बदल करणे, आश्वासित प्रगती योजनेचे लाभ प्रलंबित कर्मचाऱ्यांना देणे, प्रतिनियुक्ती रद्द झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करणे तसेच बदली कायदा २००५ ची अंमलबजावणी करणे यांचा समावेश आहे.प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष तथा अमरावती विभागाचे अध्यक्ष अनिल मानकर यांनी दिला.यावेळी अभिजीत गावंडे, अक्षय राठोड, स्वप्निल खडसे, अमोल माटोडे, अनिल मेश्राम, आशिष माथुरकर, अरुण वाघमारे, ज्ञानेश्वर काळे, अश्विनी चव्हाण, रस्मिता पवार, शारदा हेडाऊ, प्रतिभा ठाकरे, प्रीती डोंगरे, मीनल गिरे, वर्षा कोटरंगे, यशवंत रामटेके, देवानंद खंडारे, प्रवीण मुंगळे, सोहम हेमणे, प्रवीण तायवाडे, मनोज खोब्रागडे, संजय चौधरी, जयसिंग राठोड, पराग जाधव, देवेंद्र कळमकर, शिला रणदिवे आदी कर्मचारी आंदोलनात सहभागी झाले होते.

### जिल्ह्यात ७५०० रुग्ण एचआयव्ही बाधित

**अमरावती**-जिल्ह्यात एचआयव्हीबाधित रुग्णांची संख्या सात हजार पाचशे इतकी मोठी असून, आरोग्य यंत्रणेच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यांतील तब्बल दीड हजार रुग्णांनी उपचार अर्धवट सोडल्याने चिंता वाढली असून, नियमित उपचार घेणाऱ्यांची संख्या केवळ पाच हजारांच्या आसपास आहे. जिल्हा रुग्णालयातील एआरटी केंद्राद्वारे एचआयव्हीबाधित रुग्णांची नोंदणी, समुपदेशन, तपासणी आणि औषधोपचार केले जातात, तसेच ग्रामीण भागातही सोयी उपलब्ध असल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात रुग्ण उपचार सोडून जात आहेत. राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमांतर्गत रुग्णाना अँटी रेट्रोव्हायरल थेरपी पूर्णपणे मोफत दिली जाते. ही औषधे नियमित घेतल्यास विषाणूचे प्रमाण नियंत्रणात राहते, परंतु रुग्णांमध्ये सातत्य नसल्याने आरोग्य विभागाचे प्रयत्न निष्फळ ठरत आहेत.



# हापूसला मागे टाकत पायरीची सरशी

**अमरावती/ का.प्र.**

शहरातील फळे, भाजी बाजारात फेरफटका मारला तरी मंद मधूर सुगंध सहजच कोणालाही आकर्षित करीत आहे. फळांचा राजा आंब्याचा हा सुगंध असून सध्या शहरात दररोज किमान ४० टन आंब्याची आवक होत आहे. त्यामुळे खवय्यांची चंगळ असून रस खाण्यासोबतच आंब्याच्या फोडी चाखण्याचा आनंद घरोघरी घेतला जात आहे.

गेल्या वर्षीच्या तुलने १५ टक्क्याने यंदा आंब्याला मागणी वाढल्याची माहिती ठोक विक्रेत्यांद्वारे देण्यात आले. बरे आवक ही मागणीनुसार होत असल्यामुळे विविध प्रजाती व चवीच्या आंब्यांचे भावही स्थिर आहेत. त्यामुळे ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात मागणी आहे.कोकणातून हापूस तसेच पायरी आंबा येत असून कर्नाटक, आंध्र प्रदेशातून दशेरी, बैगनपल्ली आंब्याची मोठया प्रमाणात आवक सुरू आहे. बहुतेक फळ विक्रेत्यांकडे आंब्याच्या सर्वच

### शहरात दररोज ४० टन आंब्यांची आवक!

प्रजाती उपलब्ध आहेत. सध्या आंब्याच्या रसाचा पाहुणचार करण्याचे दिवस असल्यामुळे दोन ते तीन किलो आंबे ग्राहकांकडून सहज खरेदी केले जात आहेत. यातही सुगंध व गोड चवीच्या पायरी, दशेरी, केशर, लालपट्टा या आंब्यांना जास्त पसंती दिली जात आहे. कोकण, आंध्रप्रदेश, कर्नाटकातून आवक सध्या रसदार मधूर आंबे खाण्याची चंगळ असून बाजारपेठेत सर्वत्र पायरी, दशेरी, केसर, लालपट्टा, तोतापुरी असे विविध प्रजातीचे आंबे दिसून येत आहेत.

कोकणातून दशेरी, काही प्रमाणात केसर, तर आंधप्रदेश व कर्नाटकमधून लालपट्टा, तोतापुरी, बैगनपल्ली आंब्याची शहरात आवक होत असून दिवसभरात हे आंबे खपत आहेत. यावरून सध्या आंबे खाण्याकडे शहरवासीयांचा वाढलेला कल दिसून येत आहे.

जनमाध्यम
जाहिरात व बातम्या करिता संपर्क
चांदूर रेल्वे तालुका प्रतिनिधी
सुभाष जैन- ९७६६६७०२६१

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# तपोवन टेकडी परिसरात आढळला तरुणीचा संशयास्पद मृतदेह

## हत्या करून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न?

### अर्धवट जळालेला होता मृतदेह; लोखंडी रॉड जप्त





**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील तपोवन टेकडी परिसर मंगळवारी सकाळी एका धक्कादायक घटनेने हादरला. येथील जंगल भागात एका अज्ञात तरुणीचा संशयास्पद परिस्थितीत अर्धवट जळालेला मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. मृतदेहाजवळ लोखंडी रॉड आढळल्याने हा अपघाती मृत्यू नसून घातपाताचा प्रकार असण्याची शक्यता आहे.

प्राथमिक माहितीनुसार, सकाळच्या सुमारास परिसरातून जाणाऱ्या एका युवकाच्या निदर्शनास जंगलातील झुडपांमध्ये पडलेला मृतदेह आला. त्याने तत्काळ पोलिसांना माहिती दिल्यानंतर घटनास्थळी पोलिसांची धावपळ सुरू झाली. काही वेळातच परिसरात मोठ्या संख्येने नागरिक जमा झाल्याने उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले. मृत तरुणीचे वय अंदाजे २५ ते ३० वर्षे दरम्यान असल्याचे सांगितले जात आहे. मृतदेहाची अवस्था पाहता मृत्यूनंतर अथवा मृत्यूपूर्वी गंभीर स्वरूपाचा हल्ला झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. घटनास्थळी मिळालेला लोखंडी रॉड पोलिसांनी जप्त केला असून☞(पान २ वर)

# ४८ कोटींचा दंड चिमोटेच्या सातबाऱ्यात कैद

## चांडक यांच्यावर कारवाईचे चक्र थांबले कुठे?

### गाजीपूर अवैध उत्खनन प्रकरणात महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

### -वसुली प्रक्रियेतील कथित विसंगती चर्चेत




**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला** : अकोट तालुक्यातील पोपटखेड गट ग्रामपंचायतीअंतर्गत मौजे गाजीपूर येथील कथित अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणात शासनाने ठोठावलेल्या तब्बल ४८ कोटी रुपयांच्या दंडाची वसुली प्रक्रिया पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. या प्रकरणात जमीनमालक विलास कालू चिमोटे यांच्या जमिनीवर शासनाने महसुली बोजा नोंदविल्याची माहिती समोर आली असताना, त्याच प्रकरणातील भाडेपट्टाधारक संतोष चांडक यांच्या मालमत्ता, उद्योग किंवा आर्थिक स्रोतांवर कोणती कारवाई करण्यात आली की यामधून त्यांना 'व्हीआयपी पास' देण्यात आली याबाबत प्रशासनाकडून स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

मौजे गाजीपूर येथील गट क्रमांक २७ व ३८ मधील खदानीतून कथितपणे मोठ्या प्रमाणावर गौण खनिजाचे उत्खनन झाल्याचा ठपका ठेवत शासनाने कोट्यवधी रुपयांचा दंड आकारला होता. संबंधित जमिनीचे मालक विलास चिमोटे असून, या जागेवर भाडेपट्टाधारक म्हणून संतोष चांडक यांचे स्टोन क्रशर आणि डांबर हॉट मिक्स प्लांट कार्यरत असल्याचे नोंदीत नमूद असल्याची माहिती आहे.

दंड आदेशानंतर हे प्रकरण विविध स्तरांवरील नोटिसा, अपील, पुनर्विचार अर्ज आणि प्रशासकीय पत्रव्यवहारात अडकले. अनेक वर्षे प्रत्यक्ष वसुलीची ठोस कारवाई दिसून न आल्याने या प्रकरणाबाबत सातत्याने चर्चा सुरू होती. दरम्यान, उपविभागीय अधिकारी लोणारकर यांनी तहसील प्रशासनाला आरसीसी (Revenue Recovery Certificate) उघडून दंड वसुलीची प्रक्रिया सुरू करण्याबाबत निर्देश दिल्याची माहिती समोर आली.

या निर्देशांनंतर महसूल प्रशासनाने कोणत्या हालचाली केल्या याची मात्र माहिती देण्यास महसूल प्रशासन तयार नाही. तर नुकतेच मिळालेल्या माहितीनुसार यामधील जमिनमालक विलास चिमोटे यांच्या संबंधित जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर शासनाच्या ४८ कोटी रुपयांच्या दाव्याचा बोजा नोंदविण्यात आल्याचे समोर आले आहे. तर चांडक यांना यामधून सोयीस्कर 'व्हीआयपी पास' करण्यात आले असल्याचे समोर आले आहे.

### एकाच सातबाऱ्यावर शासनाचा दावा; दुसऱ्या पक्षकाराचे काय?

मात्र याच ठिकाणी अनेक प्रश्न उभे राहत आहेत. दंड आदेशात नाव असलेल्या दुसऱ्या पक्षकार संतोष चांडक यांच्या विरोधात महसूल विभागाने कोणती कारवाई केली? त्यांच्या नावावरील अथवा नियंत्रणाखालील मालमत्तांची तपासणी झाली का? उद्योगाशी संबंधित आर्थिक व्यवहारांची छाननी करण्यात आली का? या प्रश्नांची उत्तरे अद्याप समोर आलेली नाहीत.

स्थानिक महसूल वर्तुळात अशी चर्चा आहे की, जर दंडाची जबाबदारी दोन्ही पक्षांवर निश्चित करण्यात आली असेल, तर वसुलीची प्रक्रिया देखील दोघांविरुद्ध समान निकषाने राबविणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात एका व्यक्तीच्या सातबाऱ्यावर शासनाचा बोजा नोंदविला गेला, तर दुसऱ्या व्यक्तीविरोधातील कारवाईबाबत मौन असल्याचे चित्र दिसत आहे.

### महसूल प्रशासनाने खुलासा करावा

या संपूर्ण प्रकरणात आता काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यामध्ये ४८ कोटी रुपयांच्या दंड आदेशात जबाबदारीचे स्वरूप नेमके काय आहे? दोन्ही पक्षांवर समान पद्धतीने वसुलीची प्रक्रिया सुरू आहे का? संतोष चांडक यांच्या नावावरील अथवा नियंत्रणाखालील मालमत्तांची चौकशी झाली का? स्टोन क्रशर आणि हॉट मिक्स प्लांटची मालकी व आर्थिक व्यवहारांची पडताळणी करण्यात आली का? बँक खाती, वाहने आणि यंत्रसामग्री यांचा शोध घेण्यात आला का? आरसीसीची अंमलबजावणी नेमक्या कोणत्या टप्प्यावर आहे? या प्रश्नांची अधिकृत उत्तरे समोर आल्यानंतरच गाजीपूर येथील बहुचर्चित अवैध उत्खनन प्रकरणातील वसुली प्रक्रियेचे संपूर्ण चित्र स्पष्ट होणार आहे. तोपर्यंत '४८ कोटींचा दंड चिमोटेच्या सातबाऱ्यात कैद; मग चांडक यांच्यावरील कारवाईचा मागोवा हरवला कुठे?' अशी एकच खमंग चर्चा रंगू लागली आहे.

### क्रशर, हॉट मिक्स प्लांट आणि आर्थिक व्यवहारांची चौकशी झाली का?

संतोष चांडक यांच्या नावावर स्थावर मालमत्ता नसल्याचा युक्तिवाद काही स्तरांवर केला जात असल्याची चर्चा आहे. परंतु महसूल वसुलीची प्रक्रिया केवळ जमिनीपुरती मर्यादित नसते, असे जाणकार सांगतात. स्टोन क्रशर, डांबर हॉट मिक्स प्लांट, यंत्रसामग्री, व्यावसायिक वाहने, बँक खाती आणि इतर आर्थिक स्रोत यांचाही वसुली प्रक्रियेत विचार होऊ शकतो. त्यामुळे संबंधित उद्योगांची मालकी, आर्थिक व्यवहार आणि उपलब्ध मालमत्तांची पडताळणी करण्यात आली का, हा महत्त्वाचा मुद्दा ठरत आहे. विशेष म्हणजे, कोट्यवधी रुपयांच्या दंडाच्या प्रकरणात वसुली यंत्रणेने उपलब्ध सर्व पर्यायांचा वापर केला का, याबाबतही आता चर्चा सुरू झाली आहे.

### अपील प्रलंबित; पण वसुली शक्य ?

या प्रकरणात अपील याचिका प्रलंबित असल्याची माहिती आहे. मात्र कायदेशीर जाणकारांच्या मते, अपील दाखल केल्याने वसुलीची कारवाई आपोआप थांबत नाही. सक्षम प्राधिकाऱ्याने स्थगिती आदेश दिल्यासच वसुलीला विराम मिळतो. म्हणूनच एका बाजूला सातबाऱ्यावर शासनाचा दावा नोंदविला जातो आणि दुसऱ्या बाजूला इतर मालमत्तांबाबत कारवाईचे चित्र स्पष्ट दिसत नाही, यामुळे महसूल प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

# चार बळी घेणारी वाघीण मेळघाटात नको

### टीटी सेंटरला आमदार केवलराम काळे यांची भेट



**अचलपूर/प्रातिनिधीः-** चंद्रपुर जिल्हयात चार महिलांचा बळी घेणा-या वाघीणीला परतवाडा येथील ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर मध्ये उपचार केंद्रात आणण्यात आले आहे. या वाघिणीला भविष्यात मेळघाटातील अति संरक्षीत क्षेत्रात सोडण्यासाठी वन्यजीव विभाग तयारीत ☞(पान २ वर)

# दर्यापूरच्या महिलेने नागपूरात पेटवली नातेवाईकांची कार

### दहा लाखाचे झाले नुकसान आरोपी महिला पोलिसांच्या ताब्यात



**नागपूर/प्रतिनिधीः-** दोन दिवसांपूर्वी नागपूरतील मानकापूर पोलीस ठाण्याचे हद्दीतील गोधणी भागात एका कारला आग लागलेली होती. शॉर्ट सर्किट आणि उष्णतेमुळे आग लागली असावी, असं प्राथमिकदृष्ट्या वाटत होते. पोलिसांनी या संपूर्ण प्रकरणाचा तपास केला. एका महिलेनं रागाच्या भरात कार पेटवून दिल्याचंही तपासात समोर आलेलं आहे. निखिलेश राजूरकर यांच्या मालकीची कार आगीत पूर्णपणे जळून राख झाली. त्यांचे दहा लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी ☞(पान २ वर)

# विप्लव बाजोरिया यांचा नामांकन अर्ज रद्द

## जिल्हाधिकारी कार्यालयात हाय व्होल्टेज ड्रामा,

### दोन तासाच्या सुनावणी नंतर निर्णय



**अमरावती/प्रतिनिधीः-** विधान परिषद स्थानिक प्राधिकरण मतदार संघ निवडणुकीसाठी माजी आमदार विप्लव बाजोरिया यांनी सोमवारी अपक्ष म्हणून उमेदवारी दाखल केली होती. त्यांच्या नामांकनावर माजी आमदार आणि भाजप उमेदवार प्रवीण पोटे यांनी आक्षेप घेतला होता. या आक्षेपवर आज मंगळवार २ जून रोजी जिल्हाधिकारी आणि निवडणूक अधिकारी आशिष येरेकर यांच्या समक्ष सायंकाळी पाच वाजता सुनावणी सुरू झाली. दोन तास झालेल्या सुनावणीनंतर व दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर शेवटी जिल्हाधिकाऱ्यांनी बाजोरिया यांचा नामांकन☞(पान २ वर)

### ९ नगरसेवक बाजोरियांचे सूचक

अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेतील शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक पुनम येऊल, प्रियंका आंवडकर ,रमण्य आवंडकर ,समाजवादीचे आवेदाबी मो.आरिफ, शिवसेना उबाठाचे सीमा गजानन विजेकर, मो.रेहान अब्दुल मुनाफ, श्रीकांत जुनघरे ,सुनीता भास्कर बाळे, रूपाली देवगिरे यांनी बाजोरियांचे सूचक म्हणून समर्थन केले होते.

# अमरावती पोलिस दलात मोठा फेरबदल

### १६४ पोलिस शिपायांच्या बदल्या

### निरीक्षकांच्या बदल्यांचीही तयारी

शिपायांच्या सामान्य बदल्यांनंतर आता विविध पोलीस ठाणे आणि शाखांमध्ये कार्यरत असलेल्या पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांबाबतही हालचाली सुरू झाल्या आहेत. पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, पुढील आठवडाभरात काही महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांतील निरीक्षकांच्या बदल्यांचे आदेश निघण्याची शक्यता आहे. या संभाव्य फेरबदलामुळे शहर पोलीस दलात उत्सुकता आणि चर्चेला उधाण आले असून, आगामी बदल्यांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहर पोलीस आयुक्तालयात मंगळवारी मोठ्या प्रमाणावर प्रशासकीय फेरबदल करण्यात आला. सामान्य बदली प्रक्रियेअंतर्गत☞(पान २ वर)

# चांदूर बाजारात १३.७८ लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

### -एक अटकेत, मुख्य आरोपी फरार



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती ग्रामीण पोलिसांनी अवैध गुटखा तस्करीविरोधात मोठी कारवाई करत चांदूर बाजार येथे तब्बल १३ लाख ७८ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, वाहन आणि अन्य साहित्य जप्त केले आहे. या प्रकरणात एका आरोपीला अटक करण्यात आली असून मुख्य आरोपींसह इतर फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी जिल्ह्यातील अवैध गुटखा विक्री व वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने ही धडक मोहीम राबविली. माहितीनुसार, चांदूर बाजार शहरातून अमरावतीकडे प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक होत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक नितीन इंगोले यांच्या पथकाने चांदूर बाजार पोलिसांच्या मदतीने अमरावती रोडवरील रेल्वे फाटकाजवळ सापळा रचला. यावेळी संशयित बोलेरो पिकअप (एमएच-४८ सीबी-३२४७) थांबविण्याचा प्रयत्न केला असता चालकाने पोलिसांना पाहून वाहन भरधाव वेगाने गल्ल्यांमधून पळवून नेले. मात्र पोलिसांनी पाठलाग करून वाहन अडविले. दरम्यान चालक आणि क्लिनर पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना पोलिसांनी क्लिनर शोएब अली अशफाक अली (वय २४) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार वाहनाची पंचासमक्ष☞(पान २ वर)

# ग्रामीण पोलिसांची अवैध दारू व्यवसायावर मोठी कारवाई

### -७.११ लाखांचा मुद्देमाल जप्त

### मेघा नदीकाठ, पारधी बेड्यांवर धडक कारवाया

### -६४५ लिटर गावठी दारू आणि ६ हजार लिटर मोहाचा सडवा नष्ट



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती ग्रामीण जिल्ह्यात अवैध गावठी हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी व्यापक मोहीम हाती घेत मोठी कारवाई केली आहे. विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत करण्यात आलेल्या छापेमारीत तब्बल ७ लाख ११ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, मोठ्या प्रमाणात गावठी दारू, मोहाचा सडवा तसेच दारू निर्मितीसाठी लागणारे साहित्य नष्ट करण्यात आले. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या निर्देशानुसार राबविण्यात आलेल्या या विशेष मोहिमेत शिरजगाव कसबा, मंगरूळ चवाळा आणि ब्राम्हणवाडा पोलिसांनी समन्वयाने कारवाई केली. शिरजगाव कसबा पोलिसांनी पाळा येथील मेघा नदीकाठी छापा टाकून संजु काशीनाथ ☞(पान २ वर)

# मेळघाटातील आरोग्य व्यवस्थेच्या दुरावस्थेला जबाबदार कोण?

### -महसूल मंत्र्यांचा संतप्त सवाल!

### -नागपूर, अमरावतीतील आरोग्य विभागाचे प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढण्याचे निर्देश

**मुंबई/प्रतिनिधीः-** 'मेळघाटातील आरोग्य व्यवस्थेतील गंभीर त्रुटी आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या मूलभूत सुविधांच्या अभावाबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत या दुरावस्थेला अखेर जबाबदार कोण?' असा आक्रमक सवाल महसूल मंत्री तथा नागपूर, अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत केला. नागरिकांच्या आरोग्याशी होणारी हेळसांड थांबवून, तिथल्या आरोग्यविषयक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी तातडीने युद्धपातळीवर कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.

मंत्रालयात आज सार्वजनिक आरोग्य विभागाकडील नागपूर आणि अमरावती जिल्ह्यांच्या प्रलंबित विषयांबाबत बैठक पार पडली. या बैठकीला आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्यासह आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत महसूलमंत्र्यांनी आक्रमक पवित्रा घेत दोन्ही जिल्ह्यांतील आरोग्य प्रकल्पांच्या रखडलेल्या कामांवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

मेळघाटातील आरोग्य यंत्रणेच्या त्रुटींवर बोट ठेवत महसूल मंत्र्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. अमरावती जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा बळकट करण्यासाठी येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयामध्ये रेडिओथेरपी आणि डेकेअर किमोथेरपी पीपीपी तत्वावर☞(पान २ वर)



'ग्रामीण जनतेचा जीव टांगणीला लावणारा आरोग्य यंत्रणेतील ढिसाळपणा खपवून घेतला जाणार नाही. मेळघाट आणि विदर्भातील आरोग्य सुधारणेसाठी आवश्यक असणारे विकास कामांचे सर्व प्रस्ताव तातडीने सादर करा आणि कामाला लागा'

**-चंद्रशेखर बावनकुळे,** महसूल मंत्री

# प्रसन्नच्या मृत्यूची निष्पक्ष चौकशी करा

### कुटुंबियांची पोलीस आयुक्तालयावर धडक, मित्रांवर व्यक्त केला घातपातचा संशय



**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या वरुडा येथील प्रसन्न किशोर काललकर (वय १६) याचा मृतदेह दुर्गापुर मंदिराच्या मागे एका शेताच्या विहिरीत हात पाय बांधलेल्या अवस्थेत आढळला होता. त्याचा नाकातून रक्त वाहत होते. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून मुलाला न्याय देण्याच्या मागणीसाठी कुटुंबीयांनी आज मंगळवार २ जून रोजी पोलीस आयुक्तालयावर धडक दिली.

निवेदनात म्हटले आहे की ,२९ मे रोजी सायंकाळी ५ वाजता दुर्गापुर मंदिराच्या मागे किशोर जगदाळे यांच्या शेतातील विहिरीत प्रसन्नचा मृतदेह आढळला होता. २९ मे रोजी सकाळी त्याचे काका श्याम कालकर यांनी त्याला सकाळी म्हटले होते की तू माझ्यासोबत फॅब्रिकेशनच्या☞(पान २ वर)